सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. ३१ ऑक्टोबर २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १९५ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

बद्रीनाथहून निघालेले हेलिकॉप्टर दुर्घटनेमध्ये सहा जणांपैकी चौघांचा मृत्यू, दोन प्रवासी गंभीर जखमी

उत्तराखंड: उत्तराखंडच्या चमोली जिल्ह्यातून एक महत्त्वाची बातमी समोर येत आहे. चमोली जिल्ह्यातील बद्रीनाथ धाम मधून परत येत असलेले एक हॅलिकॉप्टर कोसळल्याची दुर्घटना बद्रीनाथ आणि ज्योतीर्मठ दरम्यान झाल्याचे वृत्त आहे. ट्रान्स भारत कंपनीच्या असलेल्या या हेलिकॉप्टरमध्ये एक पायलट आणि पाच प्रवासी असे सहा जण होते. सर्व प्रवासी बंगळूरचे रहिवासी असल्याचे सांगितले जात आहे. हेलिकॉप्टर बद्रीनाथहून डेहराडूनला जात होते आणि सहस्रधारा हेलिपॅडवर उतरणार होते. हेलिकॉप्टर खडकावर आदळून कोसळल्याची शक्यता वर्तवली जात आहे. परंतु अद्याप नेमक्या कोणत्या कारणामुळे, हॅलिकॉप्टर कोसळले? ही माहिती समोर आली नाही. SDRF, इतर पथकांसह आणि लष्कर पथक सुद्धा बचाव कार्यात आणि मदतकार्यात व्यग्र आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून, ट्रान्स भारत एव्हिएशन प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या सर्व हेलिकॉप्टर्सचे सुद्धा उड्डाण रद्द करण्यात आले आहेत.

पायलटसोबत संपर्क साधण्याचे प्रयत्न सुरू असून घटनास्थळी आणखी एक पथक पाठवण्यात आले असल्याची माहिती उत्तराखंड नागरी विमान वाहतूक विकास प्राधिकरणाचे (UCADA) सीईओ प्रतीक जैन यांनी दिली. कॅप्टन हिमांशु (पायलट) आणि प्रथापा, अरुण, शंकर गौडा, सुधीर के आणि एसएस नटराजा (प्रवासी) असे सहा प्रवासी हॅलिकॉप्टरमध्ये होते. उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर करत

अपघाताविषयी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, "जोशीमठ येथील चाई गावाजवळ हेलिकॉप्टर कोसळल्याची दुर्दैवी बातमी मिळाली. जिल्हा प्रशासन, आपत्ती व्यवस्थापन विभाग आणि एसडीआरएफ हे तिन्ही पथक बचावकार्य एकत्रित रित्या करत आहेत. मी सुद्धा या संपूर्ण घटनेवर सतत लक्ष ठेवून आहे. मी गंभीर जखमींना पुढील उपचारांसाठी तातडीने रुग्णालयामध्ये दाखल करण्याचे निर्देश देत असून रुग्णांना एअरलिफ्ट करून रुग्णालयात दाखल करण्याचे निर्देश देत आहे. मी जखमींच्या उत्तम आरोग्यासाठी देवाकडे प्रार्थना करतो."

नेमकी घटना काय घडली ?

खराब हवामान असूनही, शुक्रवारी बद्रीनाथसाठीची विमानसेवा सुरू होती. दुपारी 01.05 वाजता एक हेलिकॉप्टर डेहराडूनला पोहोचले. त्यानंतर दुसरे हॅलिकॉप्टर दुपारी 01.12 वाजता डेहराडूनच्या दिशेने निघाले आणि ते जोशीमठ परिसराजवळ अचानक रडारवरून बेपत्ता झाले. जोशीमठच्या मारवाडी भागाजवळील चाय गावच्या टेकडीजवळ या हॅलिकॉप्टरचा पुर्णपणे संवाद तुटला. सुरूवातीला हॅलिकॉप्टर बेपत्ता झाल्याची भिती व्यक्त केली जात होती. मात्र तात्काळ चमोली जिल्हा प्रशासनाकडून तात्काळ राबवण्यात आलेल्या शोध मोहिमेदरम्यान ते हॅलिकॉप्टर दुर्घटनाग्रस्त होऊन कोसळल्याचे निष्पन्न झाले.

न्यूझीलंडविरुद्धच्या चौथ्या टी20 सामन्यात श्रेयस अय्यरचा विक्रम

मुंबई : न्यूझीलंडविरुद्धच्या टी20 मालिकेत श्रेयस अय्यरचं नशिब जोरदार असल्याचं दिसत आहे. खरं तर या मालिकेत मिचेल सँटनरला आपल्या मनासारखा निर्णयच घेता आला नाही. कारण आतापर्यंत चारही सामन्यात कर्णधार श्रेयस अय्यर त्याच्यापेक्षा वरचढ ठरला आहे.

न्यूझीलंडविरुद्ध खेळत असलेल्या टी20 मालिकेतील चौथ्या सामन्यात नाणेफेकीचा कौल जिंकला आणि एक अनोखा विक्रम नावावर केला.

श्रेयस अय्यर पहिल्या 25 सामन्यात सर्वाधिक नाणेफेकीचा कौल जिंकणारा कर्णधार ठरालआहे. त्याच्या नेतृत्वात भारताने आतापर्यंत 25 टी20 सामने खेळले आणि 19 सामन्यात विजय मिळवला. त्याने डॅरेन सॅमी आणि सलमान आगाचा विक्रम मोडीत काढला. या दोघांनी प्रत्येकी 17 टॉस जिंकले होते.

त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याच्या धर्मध्वजारोहण सोहळ्याची जय्यत तयारी

नाशिक : त्र्यंबकेश्वर येथे आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर धर्मध्वजारोहण सोहळ्याची जय्यत तयारी सुरू झाली आहे. शनिवार, ३१ ऑक्टोबर रोजी दुपारी १२ वाजून २ मिनिटांनी कुशावर्त तीर्थ येथे हा भव्य धार्मिक सोहळा पार पडणार आहे. या कार्यक्रमाला दक्षिण श्रृंगेरी शारदा पीठाचे जगद्गुरू शंकराचार्य श्री श्री विधुशेखर भारती, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह विविध मंत्री, लोकप्रतिनिधी आणि दहा आखाड्यांचे साधू-महंत उपस्थित राहणार आहेत. या धर्मध्वजारोहणाने सिंहस्थ कुंभमेळ्याच्या प्रारंभाची नांदी देशभरासह जगभरात पोहोचणार आहे.

धर्मध्वजाचे धार्मिक महत्त्व काय ?

धर्मध्वजारोहणासाठी पितळेपासून तयार करण्यात आलेल्या ध्वजस्तंभाची प्रतिष्ठापना यापूर्वीच करण्यात आली आहे. या स्तंभावर आकर्षक धर्मध्वज विराजमान होणार आहे. ध्वजावर विविध देवता, धार्मिक प्रतीके आणि शुभचिन्हांचा समावेश करण्यात आला असून, त्यांचे आध्यात्मिक महत्त्व या सोहळ्याचे विशेष आकर्षण ठरणार आहे. धर्मध्वजावर सूर्य, चंद्र, बृहस्पती, सिंह, मगर, ओंकार, स्वस्तिक आणि दशदिशा यांसारखी प्रतीके आहेत. सूर्य आणि चंद्र ही अमृतकुंभाच्या रक्षणाशी संबंधित प्रतीके मानली जातात. बृहस्पतीचा सिंह राशीतील प्रवेश हा सिंहस्थ कुंभमेळ्याच्या कालचक्राशी जोडला गेला आहे. सिंह हे सिंह राशीचे प्रतीक असून, त्याचा संबंध गुरूच्या वाहनाशीही जोडला जातो.

मगर हे गोदावरी नदीशी संबंधित प्रतीक मानले जाते. त्यामुळे त्र्यंबकेश्वरच्या तीर्थपरंपरेचा संदर्भ त्यातून व्यक्त होतो. ओंकार हे पवित्र आध्यात्मिक चिन्ह, तर स्वस्तिक हे मांगल्याचे प्रतीक आहे.

चारा टंचाईवर मात करण्यासाठी 5 टक्के निधीची तरतूद, राज्य सरकारचा कृती आराखडा जाहीर

मुंबई: अल-निनोच्या प्रभावामुळे यंदा पावसाचे प्रमाण घटल्याने राज्यात गंभीर दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता कायम ठेवण्यासाठी राज्य शासनाने एक व्यापक कृती आराखडा तयार केला आहे. जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत चारा उत्पादन, उपलब्ध चाऱ्याचे संवर्धन आणि पर्यायी चारा स्रोत विकसित करण्यासाठी किमान 5 टक्के निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी याविषयी माहिती देताना सांगितले की, दुष्काळी परिस्थितीवर उपाययोजना सुचविण्यासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्यात आली होती. या उपसमितीच्या शिफारसीनुसार 30 ऑक्टोबर 2026 रोजी शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. केवळ चारा छावण्या सुरू करण्यापुरते मर्यादित न राहता, चाऱ्याचे उत्पादन वाढवणे आणि पर्यायी स्रोत विकसित करण्यावर भर दिला जाणार आहे.

कृती आराखड्याची ठळक वैशिष्ट्ये:

चारा बँकांची स्थापना व दर निश्चित: जिल्हानिहाय चारा बँका स्थापन केल्या जाणार असून, वाहतूक खर्च वगळून सुका चारा प्रतिकिलो कमाल 12 रुपये आणि मुरघास प्रतिकिलो कमाल



8 रुपये अशी आधारभूत किंमत निश्चित करण्यात आली आहे.

हायड्रोपोनिक्स व अझोलाला प्रोत्साहन: पारंपरिक चाऱ्यावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी हायड्रोपोनिक्स, अझोला आणि बिनकाटेरी निवडुंग लागवडीसारख्या पर्यायी पद्धतींना प्रोत्साहन दिले जाणार आहे. राज्यातील पशुवैद्यकीय दवाखान्यांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर या पद्धतीने चारा उत्पादनाचे नियोजन आहे.

डिजिटल नियंत्रण: चारा छावण्यांच्या व्यवस्थापनात पारदर्शकता आणण्यासाठी राज्यस्तरीय ऑनलाइन 'चारा छावणी मॉनिटरिंग अँड मॅनेजमेंट सिस्टीम' विकसित केली जाईल. प्रत्येक छावणीत बायोमेट्रिक किंवा क्यूआर कोडद्वारे उपस्थिती आणि 24 तास सीसीटीव्ही यंत्रणा बंधनकारक असणार आहे.

व्यावसायिक वापरास बंदी: चारा टंचाईच्या काळात उपलब्ध चाऱ्याचा वापर केवळ पशुखाद्यासाठीच व्हावा, यासाठी पॅकिंग, बायोफ्युएल आणि वीजनिर्मितीसारख्या अन्य कामांसाठी चाऱ्याचा वापर करण्यास सख्त बंदी घालण्यात आली आहे. तसेच राज्यातील चारा शेजारील राज्यांमध्ये पाठविण्यास कायदेशीर प्रतिबंध करण्यात आला आहे.

चारा साक्षरता अभियान: पशुपालकांसाठी व्यापक प्रशिक्षण शिबिरे आणि प्रात्यक्षिके आयोजित करून मुरघास निर्मिती व वैज्ञानिक साठवणुकीबाबत मार्गदर्शन केले जाईल.

चारा व्यवस्थापनासाठी साखर कारखाने, दूध उत्पादक सहकारी संस्था आणि गोशाळांचा सक्रिय सहभाग घेतला जाणार असून, चारा उत्पादनासाठी सवलतीच्या दरात वीज उपलब्ध करून दिली जाणार आहे.

'बीडमध्ये लावलेली 2 लाख झाडे ठाकरे बंधूंनी दाखववावीत'; अमित साटम यांचे आव्हान

बीड : कर्जत येथील प्रस्तावित पंप स्टोरेज प्रकल्पावरून सुरू असलेल्या वृक्षतोडीच्या वादात भाजपचे मुंबई अध्यक्ष आणि आमदार अमित साटम यांनी ठाकरे बंधू आणि काँग्रेसवर निशाणा साधला आहे. मध्य वैतरणा धरणाच्या बांधकामासाठी झालेल्या वृक्षतोडीच्या बदल्यात बीड जिल्ह्यातील 13 गावांमध्ये 2 लाख झाडे लावण्यात आल्याचा दावा करत, ठाकरे बंधू आणि काँग्रेसने त्या ठिकाणी जाऊन झाडे दाखवावीत, असे आव्हान साटम यांनी दिले.

शुक्रवारी भाजप प्रदेश कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत अमित साटम यांनी कर्जत येथील प्रस्तावित पंप स्टोरेज प्रकल्पावरून राज ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांनी केलेल्या आरोपांना प्रत्युत्तर दिले. त्यांच्या म्हणण्यानुसार, मुंबई महापालिकेवर ठाकरे यांच्या शिवसेनेची सत्ता असताना मध्य वैतरणा धरणासाठी झालेल्या वृक्षतोडीच्या बदल्यात बीड जिल्ह्यातील 13 गावांमध्ये 540 हेक्टर क्षेत्रावर 2 लाख झाडे लावण्यासाठी महापालिकेने निधी खर्च केला होता. या वृक्षलागवडीच्या ठिकाणी ठाकरे बंधू आणि काँग्रेसच्या नेत्यांनी भेट द्यावी आणि प्रत्यक्ष परिस्थिती जनतेसमोर मांडावी, असे साटम म्हणाले.

कर्जत येथील प्रस्तावित पंप स्टोरेज प्रकल्प हा स्वच्छ ऊर्जेच्या निर्मितीसाठी महत्त्वाचा असल्याचे साटम यांनी सांगितले. हा 3,000 मेगावॅट क्षमतेचा प्रकल्प असून 377 हेक्टर क्षेत्रावर उभारला जाणार असल्याचा दावा त्यांनी केला.

अर्णब चक्रीवादळाचा मुंबईला फटका; विविध भागांत पावसाला सुरुवात

शहरातील अनेक भागांमध्ये धुक्याची दाट चादर पसरल्याचे चित्र पाहायला मिळाले

मुंबई : मुंबईत शुक्रवारी (30 ऑक्टोबर) सकाळी अवकाळी पावसाच्या हलक्या सरी आणि धुरकट वातावरणाचा अनुभव आला. दादर, माटुंगा आणि गोरेगावसह पश्चिम उपनगरांतील काही भागांत पावसाची नोंद झाली. मात्र, शहरातील अनेक भागांमध्ये धुक्याची दाट चादर पसरल्याचे चित्र पाहायला मिळाले. त्यामुळे दृश्यमानता कमी होण्यासोबतच हवेच्या गुणवत्तेबाबतही चिंता व्यक्त केली जात आहे.

वडाळ्यासह दक्षिण मुंबईत धुरकट वातावरण

दादर रेल्वे स्थानक आणि माटुंग्यातील निवासी परिसरात सकाळी पावसाच्या सरी कोसळल्या. वडाळ्यात धुक्याचा दाट थर असल्याने दृश्यमानतेवर परिणाम झाल्याचे दिसून आले. दक्षिण मुंबईतील काही भागांतही धुरकट वातावरण होते. शहरातील काही ठिकाणी थोड्या वेळासाठी पाऊस झाला असला, तरी प्रदूषणाची समस्या कायम असल्याचे चित्र आहे.

तापमान 33 ते 35 अंशांदरम्यान राहण्याचा अंदाज

शुक्रवारी सकाळी मुंबईचे किमान तापमान 28 अंश सेल्सिअस नोंदवण्यात आले, तर कमाल तापमान 33 अंश सेल्सिअसच्या आसपास राहण्याची शक्यता आहे. हवामानाच्या अंदाजानुसार, पुढील 5 ते 6 दिवसांत दिवसाचे तापमान 33 ते 35 अंश सेल्सिअसदरम्यान राहू शकते. त्यामुळे अलीकडील उष्णतेपासून काहीसा दिलासा मिळण्याची शक्यता असली, तरी हवेतील आर्द्रता कायम राहू शकते.

गेल्या काही आठवड्यांपासून मुंबईत उष्ण आणि दमट हवामान आहे. अद्याप शहरात हिवाळ्याची चाहूल लागलेली नाही. आयएमडी (IMD) मुंबईचे संचालक बिक्रम सिंग यांच्या माहितीनुसार, तापमानात लक्षणीय घट होऊन हिवाळ्यासारखे वातावरण निर्माण होण्याची शक्यता डिसेंबरपासून आहे.

मुंबईचा AQI 163; हवा 'खराब' श्रेणीत

शुक्रवारी सकाळी मुंबईचा हवा गुणवत्ता निर्देशांक (AQI) 163 नोंदवण्यात आला. त्यामुळे शहरातील हवेची गुणवत्ता 'खराब' श्रेणीत असल्याचे दिसून आले.

डॉ. सारिका बडे, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक; तीन वर्षांत जिल्हा रुग्णालयाची कामगिरी उंचावली; राज्यात प्रथम क्रमांकावर झेप!

परभणी: शासकीय रुग्णालय म्हटले की असुविधा, उपचारांसाठी प्रतीक्षा आणि अपुऱ्या सुविधांचे चित्र समोर येते. मात्र, परभणी जिल्हा सामान्य रुग्णालयाने मागील तीन वर्षांत आपल्या कामकाजात लक्षणीय सुधारणा घडवून आणत राज्यस्तरावर ठसा उमटविला आहे. आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या जुलै 2026 मधील मासिक मानांकनात 78 गुण मिळवत परभणी जिल्हा रुग्णालयाने राज्यात पहिला क्रमांक पटकावला आहे. विशेष म्हणजे सलग दुसऱ्या वर्षी राज्यातील पहिल्या तीन रुग्णालयांमध्ये स्थान मिळविण्याची कामगिरी रुग्णालयाने केली आहे.



राज्याच्या आरोग्य सेवा आयुक्तालयाकडून जिल्हा, सामान्य आणि उपजिल्हा रुग्णालयांच्या कामगिरीचे दरमहा मूल्यमापन केले जाते. राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांची अंमलबजावणी, विविध आरोग्य निर्देशांक, उपचार सुविधा आणि रुग्णालयांच्या एकूण कामकाजाच्या आधारे हे मानांकन निश्चित होते. जुलै महिन्याच्या मानांकनात परभणीने 78 गुणांसह प्रथम स्थान मिळविले. हिंगोली जिल्हा रुग्णालय 71 गुणांसह, तर सातारा जिल्हा रुग्णालय 70 गुणांसह क्रमांकावर आहे.

मागील तीन वर्षांत जिल्हा रुग्णालयातील आरोग्यसेवा अधिक सक्षम करण्यासाठी विविध स्तरांवर प्रयत्न करण्यात आले. जिल्हा शल्यचिकित्सकांच्या नेतृत्वाखाली वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, तंत्रज्ञ आणि अन्य कर्मचाऱ्यांमध्ये समन्वय वाढविण्यावर भर देण्यात आला. बाह्यरुग्ण विभाग, आंतररुग्ण सेवा, शस्त्रक्रिया, माता-बाल आरोग्यसेवा आणि विविध वैद्यकीय तपासणी सुविधांचा लाभ रुग्णांना मिळावा, यासाठी नियोजन करण्यात आले.

विशेषतः ग्रामीण भागातून येणाऱ्या सर्वसामान्य आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना शासकीय आरोग्य योजनांचा लाभ मिळवून देण्यास प्राधान्य देण्यात आले. विविध आरोग्य कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी, विभागांमधील समन्वय आणि रुग्णसेवेतील सातत्य यामुळे रुग्णालयाच्या मानांकनात सुधारणा झाल्याचे दिसून येत आहे.

दरम्यान, आरोग्य सेवा आयुक्तांच्या परभणी दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हा रुग्णालयाने मिळविलेले हे यश विशेष महत्त्वाचे मानले जात आहे. मर्यादित मनुष्यबळ आणि वाढती रुग्णसंख्या असतानाही राज्यस्तरावर मिळविलेले स्थान कायम राखण्याचे आव्हान आता रुग्णालय प्रशासनासमोर आहे.

राज्याच्या मानांकनात परभणीची चमक

आरोग्य सेवा आयुक्तालय, पुणे यांच्या 31 ऑगस्ट 2026 रोजीच्या पत्रानुसार जुलै महिन्याचे मानांकन जाहीर करण्यात आले.

- परभणी जिल्हा रुग्णालय 78 गुण (प्रथम क्रमांक)
- हिंगोली जिल्हा रुग्णालय 71 गुण
- सातारा जिल्हा रुग्णालय 70 गुण

सलग दुसऱ्या वर्षी पहिल्या तीन रुग्णालयांत स्थान मिळविणाऱ्या परभणी जिल्हा रुग्णालयाची ही कामगिरी जिल्ह्याच्या आरोग्य क्षेत्रासाठी अभिमानास्पद ठरत आहे.

महाराष्ट्र ही संत महंतांची ची भूमी क्षेत्र पंढरपूर येथील साक्षात पांडुरंग व वारकरी संप्रदायाच्या भक्तीचा आदर्श घेण्यासारखा': स्वामी अवधेशानंदगिरीजी महाराज

तभा वृत्तसेवा

खुलताबाद प्रतिनिधी .छत्रपती संभाजी नगर जालना रोडवरील वरुड फाटा या ठिकाणी भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताह आयोजन दि २२ ऑक्टोंबर ते २९ पर्यंत भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताह मोठ्या उत्साहात भक्तिमय वातावरणात पार पडला. यासाठी महामंडलेश्वर

स्वामी अवधेशानंदगिरीजी महाराज हरिद्वार. श्री क्षेत्र. देवगड संस्थानचे प्रमुख गुरुवर्य भास्करगिरी जी महाराज. गुरुवर्य अवधूत नंद गिरी महाराज दत्त आश्रम लांजी . यांच्या प्रमुख उपस्थितीत श्री भगवान महादेव श्री हनुमान जी श्री रेणुका माता मंदिर प्राणप्रतिष्ठान व भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वर पारायण सोहळा.

होम हवन यज्ञ अखंड हरिनाम जप सह धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते

या धार्मिक सोहळ्याचे आयोजन गुरुमाऊली दिव्य सेवा संस्था विश्वास मंडळ यांच्यावतीने करण्यात आले होते

सत्संग सोहळ्यात मार्गदर्शन करताना स्वामी अवधेशानंदगिरीजी महाराज म्हणाले की, भगवंतांचे नामस्मरण ही श्रेष्ठ साधना आहे. आजच्या संघर्षमय जीवनात नामस्मरणातून सामर्थ्य आणि

शक्ती मिळते. प्रत्येकाने जीवनात गुरूंचा आदर करावा आणि भगवंतांचे चिंतन करावे, असे आवाहन त्यांनी केले.

या सोहळ्याला विविध संत-महंत, वारकरी संप्रदायातील कीर्तनकार . श्री क्षेत्र वेरूळ येथील नाथ आश्रम प्रमुख सद्गुरु अक्काताई महाराज टाका स्वामी आश्रम विद्यानंद वामदेव तीर्थ स्वामी शिवसेना आध्यात्मिक आघाडी शिंदे गटाचे महाराष्ट्र अध्यक्ष अक्षय भोसले ह भ प जनार्धन महाराज मेटे कारभारी

भास्कर .राजू महालकर .विजय शिंदे कारभारी नवले. शिंदे मॅडम ह भ प नारायण भांबर्डे .विवेक चव्हाण .संतोष करपे पा . गायनाचार्य नकुल महाराज गव्हाणे ज्ञानेश्वर सोमवंश .संस्थानचे सेवेकरी हजारो भाविक च्या उपस्थित श्री क्षेत्र देवगड संस्थानचे प्रमुख गुरुवर्य भास्करगिरी जी महाराज यांच्या काल्याचे किर्तन सेवा पार पडली

नतर आलेल्या भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. या भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताहाचे कार्यक्रमाची सांगता करण्यात आली

ओबेन इलेक्ट्रिकच्या इको सन इव्ही शोरूमचा अहिल्यानगरमध्ये शुभारंभ

अहिल्यानगर : इलेक्ट्रिक मोटरसायकल उत्पादनामध्ये देशात अग्रेसर असलेल्या ओबेन इलेक्ट्रिक कंपनीच्या इको सन इव्ही या शोरूमचा शुभारंभ अहिल्यानगर येथील कायनेटिक चौक येथे झाला.

ओबीन इलेक्ट्रिक या अग्रगण्य इलेक्ट्रिक दुचाकी निर्मिती कंपनीचे सध्या ओबेन रोअर इवो हे मोटारसायकलचे मॉडेल बाजारात उपलब्ध असून आकर्षक स्पोर्टी लूक, मजबूत बांधणी व 200 मिमी ग्राउंड क्लिअरन्स ही या मोटरसायकलची खास वैशिष्ट्ये असल्याची माहिती इको सन इव्ही शोरूमचे संचालक अवधूत कुलकर्णी व वैभव वराळे यांनी दिली. रोअर इवो इलेक्ट्रिक मोटर सायकलचे मॉडेल एका चार्ज 180 किलोमीटर अंतर कापू शकते व तिचा कमाल वेग ताशी 110 किलोमीटर आहे. याचबरोबर फॉल अलर्ट, जीपीएस ट्रॅकिंग, रिव्हर्स मोड, 05 इंची रंगीत डिस्प्ले हे या मॉडेलचे वैशिष्ट्य असून हे मॉडेल चार आकर्षक रंगात उपलब्ध आहे. या मॉडेलच्या बॅटरीला तीन वर्ष / ४० हजार किलोमीटरची वॉरंटी असून ती अतिरिक्त 7000 रुपये देऊन आठ

वर्षे / 80 हजार किलोमीटर पर्यंत वाढवता येते. या मॉडेलच्या खरेदीसाठी नामांकीत फायनान्स कंपन्यांचा वित्तपुरवठा उपलब्ध आहे. या मॉडेल संबंधी अधिक माहितीसाठी इको सन ओबेन इलेक्ट्रिक अधिकृत शोरूम, कायनेटिक चौक, नगर - पुणे रोड, अहिल्यानगर संपर्क क्रमांक 8265089004 या येथे साधावा, असे आवाहन व्यवस्थापक शशिकांत उंडे यांनी केले आहे.

धमाकेदार दिवाळी ऑफर्सची घोषणा

गुरुग्राम: सॅमसंग इंडियाने या दिवाळीत घराघरांत उत्सवाचा आनंद अधिक उत्साहवर्धक केला आहे, जिथे ग्राहकांचे दैनंदिन जीवन अधिक सोयीस्कर आणि कनेक्टेड बनवण्यासाठी डिझाइन केलेल्या आपल्या होम अप्लायन्सेसच्या विस्तृत श्रेणीवर आकर्षक ऑफर्स आणल्या आहेत. सॅमसंग या सणासुदीच्या काळात ग्राहकांना आकर्षक फायदे आणि लवचिक फायनान्सिंग पर्यायांचा आनंद देत त्यांच्या अत्याधुनिक नाविन्यतांचा अनुभव घेण्याचे आवाहन करत आहे.या फेस्टिव्ह ऑफरचा भाग म्हणून ग्राहक निवडक सॅमसंग उत्पादनांवर २०,००० रुपयांपर्यंत कॅशबॅकचा लाभ घेऊ शकतात. तसेच, ग्राहकांना फक्त ८८८ रुपयांपासून सुरु होणारे कमी ईएमआय, शून्य डाऊन पेमेंट आणि सॅमसंग फायनान्स+ द्वारे सुलभ फायनान्सिंगचा लाभही मिळणार आहे, ज्यामुळे सॅमसंगचे अत्याधुनिक अप्लायन्सेस घरी आणणे अधिक सोपे होणार आहे.

एसबीआय लाइफची नवीन मोहीम - 'अनोखे हीरे'

मुंबई, ऑक्टोबर 2026: भारतातील सर्वात विश्वासार्ह खासगी जीवन विमा कंपन्यांपैकी एक, SBI लाइफ इन्शुरन्सने 'अनोखे हीरे' ही नवीन मोहीम सुरू केली आहे. भारतीय पॅरा-ॲथलीट्सचे अनोखे कौशल्य आणि दृढनिश्चय त्यांना आव्हानांवर मात करण्यास, त्यांच्या आकांक्षांचा पाठपुरावा करण्यास आणि त्यांच्या वचनांचा सन्मान करण्यास सक्षम बनवणारी अशी ही नवीन मोहीम आहे. डोळ्यांना जे दिसते त्याची पलीकडे जाऊन खरे कौशल्य असते, एखाद्याचा हेतू आणि त्यांना कृतीत रूपांतरित करण्याचा त्यांचा संकल्प यामुळे ते खास ठरतात. एक लहान मुलगा - अक्ष, त्याच्या निरागस कुतूहलातून तो वेगवेगळ्या अनोख्या हिऱ्यांचा शोध घेतो आहे. या शोधाचा एक हृदयस्पर्शी प्रवास म्हणजे ही मोहीम. रोजच्या जगण्यात काहीतरी वेगळे शोधणाऱ्या या मुलाला पॅरा-ॲथलीट प्रशिक्षण केंद्रात वेगळ्या प्रकारची चमक दिसून येते. पॅरा-ॲथलीट्सचा दृढनिश्चय, शिस्त आणि चिकाटीचा तो साक्षीदार आहे. त्याच्या हे लक्षात येतं, की हेच खरे 'अनोखे हीरे' आहेत - ज्यांचा संकल्प त्यांना त्यांच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी आणि आपल्या प्रियजनांना दिलेल्या वचनांचा सन्मान करण्यास सक्षम करतो. "यही तो है अनोखे हीरे, जो अपने इरादों की चमक से वादों को निभाते हैं," हा विचार जिवंत करतो, एखाद्याच्या संकल्पाची ताकद आकांक्षा कृतीत कशी बदलू शकते यावर ही मोहीम प्रकाश टाकते.

'विवो इग्नाइट 2026' अंतर्गत 10 सर्वोत्कृष्ट विद्यार्थी नवकल्पनांचा सन्मान

दिल्ली : विवो इंडियाने जाहीर केले की, गुजरातच्या सुरत येथील आरएमजी माहेश्वरी इंग्लिश स्कूलचा विद्यार्थी ध्येय शाह हा, इयत्ता ८ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या विवोच्या देशव्यापी तंत्रज्ञान आणि नवकल्पना उपक्रम 'विवो इग्नाइट २०२६' चा राष्ट्रीय विजेता ठरला आहे. ही या उपक्रमाची चौथी आवृत्ती आहे. त्याचा 'जलकार - द शेप ऑफ वॉटर: प्रेडिक्ट, अलर्ट, अँड ॲक्ट' हा प्रकल्प, भूजल उपलब्धतेचा अंदाज घेण्यासाठी मशीन-लर्निंग तंत्रज्ञान आणि भूजलाच्या ऐतिहासिक माहितीचा वापर करतो, ज्यामुळे जल व्यवस्थापन सुधारण्यास मदत होते.२८ ऑक्टोबर रोजी नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे आयोजित 'विवो इग्नाइट २०२६' च्या राष्ट्रीय अंतिम सोहळ्यात विजेत्यांची घोषणा करण्यात आली. तरुण नवोन्मेषकांच्या सर्वोत्कृष्ट १० प्रकल्पांचा सन्मान करण्यात आला, ज्यांनी वास्तविक जगातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी त्यांची सर्जनशीलता, वैज्ञानिक विचार आणि समस्या सोडवण्याची कौशल्ये प्रदर्शित केली. अंतिम फेरीत १३ तरुण नवोन्मेषकांचा समावेश होता, ज्यांनी आठ वैयक्तिक आणि दोन गट प्रकल्पांद्वारे उपाय सादर केले. या उपायांमध्ये भूजल संवर्धन, जल सुरक्षा, महिलांची ऑनलाइन सुरक्षा, रस्ते सुरक्षा आणि सहाय्यक तंत्रज्ञान या विषयांचा समावेश होता. हा कार्यक्रम ₹३५ लाख* पर्यंतच्या शैक्षणिक शिष्यवृत्ती आणि पारितोषिके प्रदान करतो.

त्वचेपलीकडील आजाराच्या भावनिक आणि सामाजिक पैलूंवर वेबिनारमध्ये चर्चा

पुणे : जागतिक सोरायसिस दिनानिमित्त सोरियाट्रीट तर्फे गुरुवारी मोफत ऑनलाइन जनजागृती वेबिनारचे आयोजन करण्यात आले. या वेबिनारमध्ये सोरायसिसच्या केवळ त्वचेवर दिसणाऱ्या लक्षणांवरच नव्हे, तर या आजाराचा रुग्णांच्या भावनिक आरोग्यावर आणि सामाजिक जीवनावर होणाऱ्या परिणामांवरही चर्चा करण्यात आली. 'सोरायसिस समजून घेणे. तुम्हाला समजून घेणे.' अर्थात 'सोरायसिस समजून घ्या, रुग्णालाही समजून घ्या' हा या उपक्रमाचा मुख्य संदेश होता. या वेबिनारमध्ये सुमारे चार दशकांचा अनुभव असलेले होमिओपॅथिक सोरायसिस तज्ज्ञ डॉ. आर. एस. सोनवणे आणि डॉ. सोनल सहभागी झाले. डॉ. सोनवणे यांच्या ध्वनिचित्रमुद्रित मार्गदर्शनासह डॉ. सोनल यांनी थेट संवाद साधत सहभागींच्या प्रश्नांना उत्तरे दिली. सोरायसिसविषयीचे गैरसमज दूर करणे, योग्य माहितीचा प्रसार करणे आणि या आजाराने ग्रस्त असलेल्या व्यक्तींकडे अधिक संवेदनशीलतेने पाहण्याची गरज अधोरेखित करणे हा या वेबिनारचा उद्देश होता. हा उपक्रम सोरियाट्रीट च्या जागतिक सोरायसिस सप्ताह २०२६ अंतर्गत राबविण्यात आलेल्या 'Look Beyond My Skin' या जनजागृती मोहिमेचा भाग होता. सोरायसिसचा परिणाम केवळ त्वचेपुरता मर्यादित नसून, रुग्णांना अनाहूत नजरा, अस्वस्थ करणारे प्रश्न, दिसण्यावरून होणारे मूल्यमापन आणि सामाजिक भेदभाव यांचाही सामना करावा लागू शकतो, याकडे या मोहिमेतून लक्ष वेधण्यात आले.

डॉ. सौरभ गाडगीळ यांच्या 'चूजिंग गोल्ड' आत्मचरित्राच्या मराठी आवृत्तीचे प्रकाशन

पुणे : 'पीएनजी ज्वेलर्स'चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ यांच्या 'चूजिंग गोल्ड' या आत्मचरित्राच्या मराठी आवृत्तीचे प्रकाशन पुण्यात प्रसिद्ध मराठी अभिनेत्री श्रेया बुगडे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. ऑगस्ट २०२६ मध्ये प्रकाशित झालेल्या इंग्रजी आवृत्तीनंतर अवघ्या तीन महिन्यांच्या आत हे पुस्तक मराठी वाचकांच्या भेटीला आले आहे. पीएनजी ज्वेलर्सच्या पौड रोड येथील दालनात हा प्रकाशन सोहळा पार पडला. याच प्रसंगी दालनाचा २५ वा वर्धापनदिनही साजरा करण्यात आला. भारतातील सर्वात जुन्या आणि प्रतिष्ठित सराफी व्यावसायिक घराण्यांपैकी एक असलेल्या पीएनजी ज्वेलर्सचा १९४ वर्षांचा वारसा पुढे नेताना डॉ. सौरभ गाडगीळ यांनी अनुभवलेले चढ-उतार, घेतलेले महत्त्वाचे निर्णय आणि नेतृत्वाचा प्रवास 'चूजिंग गोल्ड' या आत्मचरित्रातून उलगडतो. पेंग्विन रँडम हाऊस इंडियातर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या या पुस्तकाच्या इंग्रजी आवृत्तीला ऑगस्ट महिन्यात वाचकांसमोर आणण्यात आले होते. आता मराठी आवृत्तीच्या माध्यमातून डॉ. गाडगीळ यांचा हा वैयक्तिक आणि व्यावसायिक प्रवास मराठी वाचकांपर्यंत पोहोचणार आहे.

प्रोजेक्ट स्कूल संसद 2026-27 साठी नोंदणी सुरु

मुंबई — दीपस्तंभ चॅरिटेबल ट्रस्टच्या 'स्कूल संसद' या अनोख्या शैक्षणिक उपक्रमाच्या २०२६-२७ च्या आवृत्तीची घोषणा करण्यात आली असून डिसेंबर २०२६ मध्ये महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये प्रादेशिक प्राथमिक फेऱ्यांनी सुरू होईल.या स्पर्धेतून सर्वोत्तम १५० विद्यार्थी प्रतिनिधींची निवड केली जाईल. गेल्या १३ वर्षांपासून, हा प्रकल्प इयत्ता ८ वी आणि ९ वीच्या विद्यार्थ्यांना लोकशाही आणि संसदीय प्रणालीचा थेट व व्यावहारिक अनुभव देत आहे. आजच्या काळात, एकीकडे राजकारण आणि प्रशासनाविषयी सर्वसामान्यांच्या मनात नकारात्मकता पसरली आहे, तर दुसरीकडे शाळांमधील नागरिकशास्त्र केवळ पाठ्यपुस्तकातील सिद्धांतापुरतेच मर्यादित राहिले आहे.

अंबाजोगाईत अतिक्रमणांवर फिरला जेसीबी : तगडा पोलिस बंदोबस्त...!

अंबाजोगाई : अंबाजोगाई शहरातील अतिक्रमण हटाव मोहीम आज दिनांक 30 आक्टोबर शुक्रवार पुन्हा सुरु करण्यात आली आहे. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकापासून सार्वजनिक बांधकाम विभागाने ही मोहीम हाती घेतली. सदरबाजार चौकातील बहुतांश अतिक्रमणे आज काढण्यात आली. दरम्यान, सार्वजनिक बांधकाम विभागाने गेल्या काही दिवसांपासून शहरातील अतिक्रमणे काढण्यात येतील, अशा आशयाची सूचना केली होती. परंतू, या सुचनेकडे काही जणांनी दुर्लक्ष केले. आज अतिक्रमण हटाव मोहिमेत बऱ्याच जणांच्या दुकानावर आणि घरांवर जेसीबी फिरवण्यात आला.

अंबाजोगाई शहरातील संत भगवानबाबा चौक ते यशवंतराव चव्हाण चौक तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौक ते - 'स्वाराती' रुग्णालय - यशवंतराव चव्हाण चौक या मुख्य रस्त्याचे रुंदीकरण होणार आहे. यासाठी तब्बल 42 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या रस्त्याचे काम सुरु करण्यासाठी अतिक्रमणांचा अडथळा सार्वजनिक बांधकाम विभागाला होत होता. त्यामुळे गेल्या कित्येक दिवसांपासून शहरातील अतिक्रमणे पुन्हा काढली जाणार आहेत, अशी चर्चा होती. त्याला दिवाळीपूर्वी मुहूर्त सापडला आणि शहरातील अतिक्रमणे काढण्यास सुरुवात झाली. आजपासून शहरात ही मोहीम वेगाने सुरू झाली.

तगडा पोलिस बंदोबस्त

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील आणि सदरबाजार परिसरातील अतिक्रमणे काढताना तगडा पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. सार्वजनिक बांधकाम विभागाची पुर्ण टीम या ठिकाणी हजर राहून अतिक्रमणे काढत होती. सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी, कर्मचारी हजर होते. अतिक्रमणे काढताना बघ्यांची गर्दी मोठ्या प्रमाणात होती.

सफाई कामगारांच्या चेहऱ्यावरील आनंद कल्पनेबाहेरचा- सौ गीताभाभी पवार

गेवराई, दि. 30 (प्रतिनिधी)- शहरातील सर्व नागरिक ज्यावेळेस सकाळी आराम करत असतात, त्यावेळेस पहाटे चार वाजता उठून गेवराई नगर परिषदेच्या सफाई कामगार महिला व पुरुष शहरातील दिवसभर साचलेली, जमा झालेली, विखुरलेला कचरा एकत्र करून जमा करतात. ही बाब नागरिकांचे आरोग्य कायम राखण्यासाठी महत्त्वाचे आहे . अशा महिला सफाई कामगारांची दखल घेऊन नवरात्र उत्सवानिमित्त नऊ सफाई कामगारांना नवदुर्गांना साडीचोळी देऊन सन्मान करण्यात आला. अशावेळी त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद हा कल्पनेबाहेरचा आनंद आहे, अशा भावना नगराध्यक्ष गीता भावी पवार यांनी व्यक्त केल्या आहेत.

निमित्त होते रोटरी क्लब ऑफ गेवराईच्या वतीने नवरात्र उत्सवातील नऊ दिवसांचे प्रतीक म्हणून गेवराई नगर परिषदेतील नऊ सफाई कामगार महिलांची निवड करून त्यांना मान्यवरांच्या हस्ते साडीचोळी देऊन त्यांचा भव्य कार्यक्रमात सन्मान आयोजित करण्यात आला होता.

24 ऑक्टोबर 2026 रोजी नगर परिषदेच्या छत्रपती शिवाजी महाराज सांस्कृतिक सभागृहात रोटरी क्लब ऑफ गेवराई आणि जिजामाता योगा वर्ग यांच्या संयुक्त विद्यमाने भल्या पहाटे सकाळी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी गेवराई न. प.च्या अध्यक्ष गीताभाभी पवार ,उपनगराध्यक्ष सौ रेवतीताई घुंबार्डे , सामाजिक कार्यकर्त्या रत्नमाला मोटे, रोटरी क्लबचे अध्यक्ष गणेश कुलकर्णी, सचिव धर्मराज

करपे यांची प्रमुख उपस्थिती मंचावर होती.होती सुरुवातीला रोटरी इंटरनॅशनलचे संस्थापक पॉल हॅरीस यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करण्यात आली. उपस्थित मान्यवरांचे स्वागत रोटरी क्लबच्या सदस्या दक्षता वानखेडे, वंदना हिरे, भावी अध्यक्ष राजेंद्र डेंगे, कार्यकारी सचिव प्रवीण जैन, सदस्य रामकृष्ण चेडे ,राधाकिशन लड्डा, नागनाथ घसिंग,रामदास शिंदे ,निखिल काला यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविकात अध्यक्ष गणेश कुलकर्णी यांनी नवदुर्गा सन्मान सोहळ्याचे आयोजन कोणत्या उद्देशाने केले आहे याबाबत सविस्तर माहिती दिली . या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते नगर परिषदेच्या 9 सफाई महिला कामगार मंगल शिंदे, सुमित्रा सोनवणे, पिंकी कांडेकर , अनिता कांडेकर, संगीता कांडेकर, माया कांडेकर , काजल सौंदरमल,ज्योती कांडेकर, निशा कांडेकर महिलांचा साडी चोळी देऊन सन्मान करण्यात आला. सूत्र संचालन माजी अध्यक्ष तथा पब्लिक इमेज चेअरमन प्रा. राजेंद्र बरकसे यांनी केले. याप्रसंगी उपस्थित महिलांना मार्गदर्शन करताना नगराध्यक्ष गीताभाभी पवार म्हणाल्या की, रोटरी क्लब स्थापन होऊन एक वर्ष पूर्ण झाले आहे .या कालावधीत रोटरी क्लबने अनेक समाजोपयोगी आणि रोटरीची इमेज वाढविण्याचे काम मोठ्या उत्साहाने केले आहे एकाचढ एक असे उपक्रम यशस्वीपणे राबविले जात आहे .

अंबाजोगाईत 2 नोव्हेंबरला नांदी नाट्य संमेलनाचे आयोजन!

अंबाजोगाई : अंबाजोगाई येथील योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाच्या नाट्यशास्त्र विभागाच्या वतीने आणि महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांच्या प्रस्तुत सहकार्याने सोमवार, दि. २ नोव्हेंबर २०२६ रोजी नांदी नाट्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या परिसरातील नागापूरकर सभागृहात हे संमेलन होणार आहे.

या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी बीड येथील डॉ. दिपाताई क्षीरसागर राहणार असून, ज्येष्ठ नाटककार व अभिनेते योगेश सोमण यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन होणार आहे. उद्घाटन सत्राला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. संजय पाटील देवळाणकर उपस्थित राहणार आहेत. ते के. एस. महाविद्यालय, बीड येथील नाट्यशास्त्र विभागप्रमुख तथा उपप्राचार्य आहेत.

नाट्यप्रयोग, एकांकिका आणि नाट्यगीतांची मेजवानी

या नाट्य संमेलनात व्यावसायिक नाटकासह विविध कलाविष्कार सादर केले जाणार आहेत. स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची 'सामना' ही एकांकिका, राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर यांची 'बरड' ही एकांकिका सादर होणार आहे. यासोबतच नाट्यगीते आणि मूकनाट्याचेही सादरीकरण होणार असल्याने नाट्यरसिकांना विविध कलाप्रकारांचा आनंद घेता येणार आहे.

संमेलनाच्या समारोप सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. सुरेश खरसाळे राहणार असून, माजी अध्यक्ष यशवंत आणि ॲड. जगदीश चौसाळकर यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. संमेलनाचे स्वागताध्यक्ष म्हणून योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माननीय चंद्रशेखर बर्दापूरकर उपस्थित राहणार आहेत. या संमेलनासाठी स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत देशमुख, डॉ. संपदा कुलकर्णी आणि नाट्यशास्त्र विभागाचे डॉ. ज्ञानेश्वर सोनवणे यांनी पुढाकार घेतला आहे.

अंबाजोगाई परिसरातील नाट्यरसिक, अभ्यासक, वाचक, विद्यार्थी आणि शिक्षकांनी या नाट्य संमेलनाला उपस्थित राहून विविध कलाविष्कारांचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

सुंदरराव सोळंके महाविद्यालयाची भारत सरकारच्या I-STEM पोर्टलवर नोंदणी

संशोधन क्षेत्रात सोळंके महाविद्यालयाची झेप!वैज्ञानिक संशोधनाला मिळणार बळ

माजलगाव : येथील सुंदरराव सोळंके महाविद्यालयाची भारत सरकारच्या I-STEM (Indian Science, Technology and Engineering Facilities Map) या राष्ट्रीय डिजिटल उपक्रमांतर्गत नोंदणीकृत संस्था म्हणून नोंद झाली आहे. महाविद्यालयाच्या शैक्षणिक आणि संशोधनविषयक प्रगतीच्या दृष्टीने हे महत्त्वपूर्ण यश मानले जात आहे.

भारत सरकारच्या प्रधान वैज्ञानिक सल्लागार कार्यालयाच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या I-STEM या राष्ट्रीय डिजिटल व्यासपीठाचा प्रमुख उद्देश देशातील संशोधन सुविधा अधिक सुलभतेने उपलब्ध करून देणे आणि वैज्ञानिक संशोधनाला प्रोत्साहन देणे हा आहे. या पोर्टलच्या माध्यमातून देशातील विविध शैक्षणिक संस्था, संशोधन केंद्रे आणि प्रयोगशाळांमध्ये उपलब्ध असलेल्या वैज्ञानिक उपकरणांची व संशोधन सुविधांची माहिती मिळते. त्यामुळे संशोधक, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना संशोधनासाठी आवश्यक असलेल्या सुविधांचा लाभ घेण्याच्या संधी उपलब्ध होतात. महाविद्यालयासाठी I-STEM समन्वयक म्हणून वनस्पतीशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. एम. एस. वानखेडे यांची, तर प्रथम संपर्क अधिकारी म्हणून भौतिकशास्त्र विभागाचे प्राध्यापक ओ. एच. सारगे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.या नोंदणीमुळे महाविद्यालयाला संशोधनविषयक माहिती, वैज्ञानिक उपकरणे आणि तंत्रज्ञानाधारित संसाधनांपर्यंत पोहोचण्यासाठी मदत होणार आहे. तसेच विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे, तांत्रिक कौशल्यांना प्रोत्साहन देणे आणि संशोधन व नवोपक्रमांविषयी आवड निर्माण करणे यासाठी हे व्यासपीठ उपयुक्त ठरणार आहे. महाविद्यालयातील शैक्षणिक उपक्रमांना संशोधनाची जोड देण्याच्या दृष्टीनेही या नोंदणीला महत्त्व प्राप्त झाले आहे.

प्राचार्य डॉ. अभय सोळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या नोंदणी प्रक्रियेत I-STEM समन्वयक डॉ. एम. एस. वानखेडे आणि प्रथम संपर्क अधिकारी प्रा. ओ. एच. सारगे यांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले. महाविद्यालयाच्या या यशाबद्दल मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष आ. प्रकाश सोळंके, सरचिटणीस सतीश चव्हाण तसेच महाविद्यालयीन विकास समितीचे सदस्य ॲड. बी. आर. डक यांनी अभिनंदन केले आहे.

बँकेच्या अध्यक्षांनी जागवल्या अजित दादांच्या आठवणी

बीड(प्रतिनिधी)महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने आयोजित अजित स्मृती व्याख्यान मालेचे नववे पुष्प अर्पण करण्यासाठी बीड येथील छत्रपती शाहू नागरीक सहकारी बँकेचे अध्यक्ष इंजि.अजय जाहेर पाटील आणि पुर्णवादी नागरीक सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ.सुभाष जोशी यांना निमंत्रीत करण्यात आले होते. या दोन्ही मान्यवरांनी दादांच्या अनेक आठवणी जागवल्या. दादांच्या स्मृती दिनाचे औचित्य साधुन पत्रकार संघाच्या वतीने मतीमंद विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना काल दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले.

बीड येथील रुख्माईगोविंद मतीमंद निवासी विद्यालयात अजित स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे हे होते. तर कार्यक्रमाला डॉ.सुभाष जोशी, इंजि.अजय जाहेर पाटील, जेष्ठ पत्रकार विश्वनाथ माणूसमारे,राजे संभाजी बहुउद्देशिय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष धीरज चव्हाण यांची उपस्थिती होती.

या प्रसंगी बोलतांना इंजि. जाहेर पाटील म्हणाले की, अजित दादा पवार हे आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार होते.त्यांच्या विकासात्मक दृष्टीमुळे हे राज्य अनेक बाबतीत प्रगतीपथावर राहिले. एकदा त्यांनी बँकर्संची मिटिंग घेतली होती. त्याप्रसंगी मला उपस्थित राहण्याची संधी मिळाली. त्या बैठकीत मी दादांचा जो अनुभव घेतला तेव्हा मला त्यांच्यातील एक सक्षम, अभ्यासू आणि धडाडीचा अर्थमंत्री जवळून पहायला मिळाला. नागरी बँकाच्या हितासाठी दादांनी कायम पालकत्वाची भूमिका निभावल्याचे जाहेर पाटील यांनी सांगितले. पुर्णवादीचे अध्यक्ष डॉ.सुभाष जोशी म्हणाले की, अजित दादा पालकमंत्री झाल्यानंतर बीड जिल्हा झपाट्याने बदलू लागला होता. मुंडे-महाजन यांच्या काळात बीड जिल्ह्याला विकासाच्या अनेक अपेक्षा होत्या. परंतु त्यांच्या अकाली जाण्यामुळे विकासाचे स्वप्न अपुर्ण राहिले होते. अजित दादा पालकमंत्री झाल्यानंतर पुन्हा ते स्वप्न प्रत्यक्षात उतरताना दिसू लागले. अजित दादांच्या निर्णय क्षमतेमुळेच रेल्वे प्रत्यक्षात अवतरली. आज मराठवाडा भिषण दुष्काळाशी सामना करत असताना पुन्हा एकदा अजित दादांची आठवण झाल्याशिवाय राहात नाही.'झाले बहु, होतील बहु, परी या सम हा' असे दादांचे नेतृत्व होते. त्यांच्या स्मृती जिवंत ठेवण्यासाठी प्रत्येकाने त्यांच्या चांगल्या गुणांचे अनुकरण करत राहावे असे डॉ.जोशी म्हणाले.

या प्रसंगी अध्यक्षीय समारोप करताना पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे यांनी अजित स्मृती व्याख्यानमाले मागचा उद्देश सांगितला. सलग नऊ महिन्यापासून हा उपक्रम पत्रकार संघाचे सुरु ठेवला आणि पुर्ण एक वर्ष या माध्यमातून दादांच्या आठवणींचा जागर सुरु राहणार आहे. याचे कारण अजित दादांनी बीड जिल्ह्यासाठी जे करुन ठेवले आहे ते आमच्या अनेक पिढ्यांना विसरता येणार नाही. ज्यांनी दिले त्यांची जाणिव ठेवणे ही आपली संस्कृती असल्याचे वसंत मुंडे म्हणाले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन नितीन क्षीरसागर यांनी केले.

परळी औष्णिक विद्युत केंद्राच्या युनिट क्रमांक 8 ची सलग 100 दिवस अखंड वीजनिर्मिती

मुख्य अभियंता सुनील इंगळे यांचे सर्वत्र कौतुक

परळी / प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीच्या (महानिर्मिती) परळी औष्णिक विद्युत केंद्रातील संच क्रमांक ८ (युनिट ८) ने सलग १०० दिवस अखंड वीजनिर्मिती करून ऐतिहासिक कामगिरी नोंदवली आहे. परळी औष्णिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता सुनील इंगळे यांचा सर्वत्र कौतुक होत आहे.औष्णिक विद्युत केंद्र कार्यान्वित झाल्यापासून पहिल्यांदाच अशा प्रकारची विक्रमी कामगिरी नोंद झाली असुन मुख्य अभियंता सुनील इंगळे यांनी सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन केले आहे.

परळी औष्णिक विद्युत केंद्राच्या दृष्टीने सलग १०० दिवसांचे अखंड संचलन हा महत्त्वाचा टप्पा मानला जात असून, या कामगिरीमुळे केंद्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा उत्साह वाढला आहे. २९ ऑक्टोबर रोजी दुपारी १ वाजून ४० मिनिटांनी या संचाने सलग १०० दिवसांचे अखंड संचलन पूर्ण केले. वीजनिर्मिती क्षेत्रातील ही उल्लेखनीय कामगिरी केंद्रातील अधिकारी, अभियंते, कर्मचारी, कंत्राटदार आणि कंत्राटी कामगार यांच्या सामूहिक प्रयत्नांचे फलित असल्याचे नमूद करून मुख्य अभियंत्यांनी सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन केले आहे. दिवस-रात्र मेहनत घेऊन संचाचे सुरळीत आणि अखंड संचलन सुनिश्चित करणाऱ्या अभियंत्यांचे, कर्मचाऱ्यांचे आणि कंत्राटी कामगारांचे मुख्य अभियंत्यांनी विशेष कौतुक केले. उत्कृष्ट तांत्रिक कौशल्य, परस्पर सहकार्य, कामाप्रती निष्ठा आणि सातत्यपूर्ण देखभाल यांमुळे हे यश शक्य झाल्याचे त्यांनी म्हटले आहे.

बीडमध्ये 'संजीवनी आयुर्वेदिक'चा पर्दाफाश! दुसऱ्यांच्या पदव्यांचा वापर करून रुग्णांवर उपचार; एकाला ताब्यात घेतले

बीड : दुसऱ्या डॉक्टरांच्या नावाचा आणि वैद्यकीय पदव्यांचा वापर करून रुग्णांवर उपचार सुरू असल्याचा संशयास्पद प्रकार बीड शहरातील नगर रोडवरील 'संजीवनी आयुर्वेदिक चिकित्सा केंद्रा'त उघडकीस आला आहे. गुरुवारी जिल्हा शल्यचिकित्सकांच्या आरोग्य विभागाचे पथक, अन्न व औषध प्रशासन आणि पोलिसांनी संयुक्तपणे या केंद्रावर छापा टाकला. या कारवाईत प्रत्यक्ष उपचार करणाऱ्या एका व्यक्तीला ताब्यात घेण्यात आले असून, केंद्रातून औषधसाठा आणि रुग्णांच्या उपचारांशी संबंधित कागदपत्रे जप्त करण्यात आली आहेत. दुसऱ्या डॉक्टरांच्या पदव्यांचा वापर करून वैद्यकीय व्यवसाय केला जात होता का, याचा तपास सुरू आहे.

नोंदणीकृत डॉक्टरांची नावे, उपचार मात्र दुसऱ्याच व्यक्तीकडून?

नगर रोडवरील संजीवनी आयुर्वेदिक चिकित्सा केंद्रात वैद्यकीय पात्रता नसलेल्या व्यक्तीकडून रुग्णांवर उपचार केले जात असल्याची गोपनीय माहिती आरोग्य विभागाला मिळाली होती. त्यानंतर संबंधित यंत्रणांनी गुरुवारी पोलिस बंदोबस्तात या केंद्रावर छापा टाकला. तपासणीदरम्यान केंद्राचे कामकाज, डॉक्टरांची नोंदणी आणि वैद्यकीय पात्रतेशी संबंधित कागदपत्रांची पडताळणी करण्यात आली.

प्राथमिक तपासात हा दवाखाना मुंबई, पुणे आणि बुलढाणा येथील नोंदणीकृत डॉक्टरांच्या नावावर चालवला जात असल्याचे समोर आल्याची माहिती आहे. मात्र, कागदपत्रांवरील डॉक्टर आणि प्रत्यक्ष रुग्णांची तपासणी करून उपचार करणारी व्यक्ती वेगळी असल्याचेही आढळल्याचे सांगण्यात येते.

दुसऱ्यांच्या पदव्यांचा वापर केल्याचा संशय

प्रत्यक्ष उपचार करणाऱ्या व्यक्तीकडे वैद्यकीय व्यवसायासाठी आवश्यक अधिकृत पदवी किंवा पात्रता प्रमाणपत्र नसल्याचे प्राथमिक तपासात समोर आल्याची माहिती आहे. त्यामुळे दुसऱ्या डॉक्टरांच्या नावाचा आणि पदव्यांचा वापर करून रुग्णांवर उपचार केले जात होते का, याची चौकशी केली जात आहे.

रुग्णांचा विश्वास संपादन करून वैद्यकीय उपचार केले जात असतील आणि त्यामागे पात्रतेबाबत चुकीची माहिती दिली जात असेल, तर हा प्रकार गंभीर ठरू शकतो. त्यामुळे संबंधित डॉक्टरांची नोंदणी, प्रमाणपत्रे आणि प्रत्यक्ष उपचार करणाऱ्या व्यक्तीची पात्रता यांची पडताळणी महत्त्वाची ठरणार आहे.

आनंदवनभूवनी ग्रंथाचे शिवथरघळीत प्रकाशन

पुणे(प्रतिनिधी) : *ज्येष्ठ समर्थ भक्त आणि श्री सुंदर मठ शिवथरघळ येथील विश्वस्त डॉ. विजय लाड यांनी समर्थ रामदास स्वामींच्या आनंदवनभूवनी या काव्यावरील विवेचन पर ग्रंथ प्रसिद्ध कीर्तनकार सौ . रोहिणी परांजपे यांच्या हस्ते ग्रंथराज दासबोधाची गंगोत्री शिवथरघळ येथे काल झाले.

दासबोध सखोल अभ्यास फाउंडेशन परिवाराचा दरवर्षीप्रमाणे मागील ४१ वर्षांपासून शिवथरघळीत कोजागिरी पौर्णिमेपासून साधना सप्ताह चालू आहे. देशातल्या पाच राज्यांमधून आलेल्या जवळपास १५० पेक्षा जास्त साधकांच्या उपस्थितीत सौ. रोहिणी परांजपे यांचे वेणास्वामी यांच्या जीवनावरील अत्यंत सुश्राव्य आणि प्रबोधनपर कीर्तन झाले. यावेळी आनंदवनभूवनी या ग्रंथाचे प्रकाशन सौ. रोहिणी परांजपे यांचे हस्ते झाले. प्रकाशन प्रसंगी सौ मेधा कुलकर्णी , अपर्णा वांगीकर , श्री कौस्तुभ परांजपे , नीला अभ्यंकर सौ. विद्याताई लव्हेकर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सौ. शुभदा थिटे, संतोष सप्रे , बाळासाहेब पाटील, सौ. सुचेता देशपांडे, सौ. विनया विद्वांस , सौ. शुभांगी समुद्र यांनी परिश्रम घेतले.*

विद्यार्थ्यांनी बनवले आकर्षक आकाशदिवे; दिवाळीनिमित्त कलाविष्काराचे सादरीकरण

सिल्लोड येथील श्री छत्रपती शिवाजी प्राथमिक विद्यालयात दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी अत्यंत आकर्षक आणि पर्यावरण पूरक आकाशदिवे बनवले. शाळेच्या कला व कार्यानुभव विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या विशेष उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी या आकाशदिव्यांची निर्मिती केली.

शाळकरी मुलांमध्ये असलेल्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा आणि पारंपरिक सणांचे महत्त्व पटवून देण्यासाठी विद्यालयाच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये १०० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला.

या उपक्रमात प्लास्टिक आणि थर्माकोलचा वापर पूर्णपणे वर्ज्य करण्यात आला होता. त्याऐवजी कागद, बांबूच्या काड्या, लाकडाचा पुठ्ठा, विविध रंगीत कागद, जुनी वर्तमानपत्रे, सुती कपड्यांचे तुकडे, सुकलेली पाने, फुले, जुन्या टाकाऊ वस्तूपासून इकोफ्रेंडली साहित्याचा वापर करून आकाशदिवे तयार करण्यात आले. पारंपरिक किल्ल्यांचे आकार, आधुनिक नक्षीकाम, करंजी आकाराचे व षटकोनी नक्षत्रांच्या आकाशदिव्यांचा समावेश होता.

विद्यालयाच्या कला शिक्षकांनी विद्यार्थ्यांना बांबूच्या काड्यांपासून सांगाडा तयार करणे, कागद चिकटवणे आणि त्यावर आकर्षक नक्षीकाम करण्याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखवले. विद्यार्थ्यांनी ४ ते ५ जणांचे गट करून एकत्र काम केले, ज्यामुळे त्यांच्यात संघभावना आणि एकमेकांना सहकार्य करण्याची वृत्ती वाढीस लागली.

विद्यार्थ्यांनी बनवलेल्या या सुंदर आकाशदिव्यांचे प्रदर्शन सध्या शाळेच्या आवारात भरवण्यात आले असून, ते पाहण्यासाठी नागरिक व पालकांनी गर्दी होत आहे. प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक गजानन डमाळे, मुख्याध्यापक निशांत म्हस्के यांनी विद्यार्थ्यांच्या या कलेचे कौतुक करत त्यांना आगामी दिवाळी सणाच्या शुभेच्छा दिल्या.

तर या उपक्रमासाठी शिक्षक राजू गाढवे, भाऊसाहेब गावंडे, गणेश सुरडकर, रामेश्वर वाघ, अमोल पालोदकर, पंकज सावंत, अमोल दांडगे, गणेश चव्हाण, मीरा पांगळे, शितल गीते, सुवर्णा तारो यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

दिवाळीत अतिक्रमण हटाव मोहीम स्थगित करा!

छोटे व्यावसायिक, हातगाडीधारक व फेरीवाल्यांना दिलासा द्या; मा. आ. केणेकर

तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर : दिवाळीच्या सणासुदीच्या काळात गोरगरीब नागरिक, छोटे व्यावसायिक, हातगाडीधारक आणि फेरीवाल्यांच्या उपजीविकेचा विचार करून महानगरपालिकेने अतिक्रमण हटाव मोहीम तात्पुरती स्थगित करावी, अशी मागणी माजी आमदार संजय केणेकर यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी महापौर समीर राजूरकर आणि मनपा आयुक्त अमोल येडगे यांना निवेदन सादर करण्यात आले.

छोटे व्यावसायिक, हातगाडीधारक आणि फेरीवाल्यांच्या व्यवसायावर मिळणाऱ्या उत्पन्नावर त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह, मुलांचे शिक्षण आणि घरखर्च अवलंबून असतो. दिवाळीसारख्या महत्त्वाच्या सणाच्या काळात अतिक्रमण हटाव मोहीम राबविल्यास त्यांच्या रोजगारावर परिणाम होऊन अनेक कुटुंबांसमोर आर्थिक संकट निर्माण होऊ शकते, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

शहराचा विकास आणि स्वच्छता महत्त्वाची असली, तरी विकासाच्या प्रक्रियेत कष्टकरी घटकांच्या उपजीविकेचा आधार हिरावला जाऊ नये. विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या हिताचा विचार करून सणासुदीच्या काळात त्यांच्या व्यवसायांना दिलासा द्यावा, अशी भूमिका केणेकर यांनी मांडली.

दिवाळी हा प्रत्येकाच्या घरात आनंदाचा दिवा पेटवणारा सण आहे. तो कोणाच्याही घरातील चूल विझवणारा ठरू नये, या भावनेतून ही मागणी करण्यात आली आहे. या मागणीमागे राजकीय हेतू नसून माणुसकीच्या भावनेतून गोरगरीबांच्या हिताचे रक्षण करण्याची भूमिका असल्याचेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

महानगरपालिका प्रशासनाने या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून दिवाळीच्या काळात अतिक्रमण हटाव मोहीम तात्पुरती स्थगित ठेवावी आणि छोट्या व्यावसायिकांसह कष्टकरी घटकांना दिलासा द्यावा, अशी आग्रही विनंती करण्यात आली आहे.

8 आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना आ. भुमरे यांच्याहस्ते शासकीय मदत

तभा वृत्तसेवा

पैठण दि 30 : पैठण कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयात आमदार विलास बापू भुमरे यांच्याहस्ते तालुक्यातील आत्महत्याग्रस्त 8 शेतकरी कुटुंबांना आर्थिक आधार देण्याच्या दृष्टीने शासनाच्या वतीने प्रत्येकी 1 लाख रुपयांची आर्थिक मदत मंजूर करून संबंधित कुटुंबीयांच्या खात्यात हस्तांतरित करण्यात आली.

यामध्ये शकुंतला मधुकर चव्हाण, गजानन सुदाम शिंदे, मीरा सतीश जाधव, शितल राजू धनवटे, कविता श्रीपाद महापुरे, मंगल रोहिदास तरटे, अर्चना बंडू आगळे आणि विष्णू कचरू घोरपडे या लाभार्थ्यांचा समावेश आहे.

या कठीण प्रसंगी शासन त्यांच्या कुटुंबीयांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून, या आर्थिक मदतीतून त्यांना काहीसा दिलासा मिळेल, अशी अपेक्षा करत संकटाच्या काळात या कुटुंबीयांना आधार देणे ही आपली सामाजिक बांधिलकी आहे.

दुःखाच्या प्रसंगी शासन आपल्या पाठीशी असून हा विश्वास अधिक दृढ करण्याचा आमचा प्रयत्न असल्याची प्रतिक्रिया आमदार विलास बाप्पू भुमरे यांनी दिली.यावेळी तहसीलदार ज्योती पवार, नायब तहसीलदार, सतिश पेंडेसे, नायब तहसीलदार कृष्णा म्हसरूप, शेतकरी नेते अप्पासाहेब निर्मळ, स्वीय्य सहाय्यक सतिष अंधारे,ज्योती काकडे, अनिकेत धारकर, शिवाजी तांबे पुरवठा तांत्रिक कर्मचारी प्रदीप गायके, आबासाहेब गिरगे, गणेश वरकड, ऋषीं दहिभाते, बाबा घटे आदीसह शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते,

डोणगाव शिवारात गांजा सदृश वनस्पतीच्या लागवडीवर छापा

फुलंब्री प्रतिनिधी : पोलीस स्टेशन फुलंब्री हद्दीतील मौजे डोणगाव शिवारात शेतामध्ये गांजा सदृश वनस्पतीची लागवड करण्यात आल्याची गोपनीय माहिती पोलिसांना प्राप्त झाली.

सदर माहितीच्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस, महसूल विभाग व शासकीय पंच यांच्या संयुक्त उपस्थितीत छापा कारवाई करण्यात आली. या कारवाईत एकूण 45 किलो 790 ग्रॅम वजनाची गांजा सदृश वनस्पती जप्त करण्यात आली असून, तिची किंमत ₹22,53,950/ आहे.

दिनांक 29/10/2026 रोजी पोलीस स्टेशन फुलंब्री हद्दीत डोणगाव शिवारातील गट क्रमांक 158 मधील शेतात गांजा सदृश वनस्पतीची लागवड करण्यात आल्याची गोपनीय माहिती प्राप्त झाली. त्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती देऊन त्यांच्या मार्गदर्शनाखाली छापा कारवाईचे नियोजन करण्यात आले.त्यानंतर परी. पोलीस उपअधीक्षक अधिकारी डॉ. सोनाली पाईकराव, सक्षम अधिकारी, महसूल विभागातील अधिकारी व शासकीय पंच यांच्या उपस्थितीत संबंधित शेताची पाहणी करण्यात आली. सदर शेतात गांजा सदृश वनस्पती दिसून आल्या. याबाबत शेतमालक गणेश दत्तात्रय पवार, वय 46 वर्षे, रा. डोणगाव, ता. छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे चौकशी करून छापा कारवाईचा उद्देश कळवून पंचासमक्ष त्या ठिकाणी मिळून आलेली झाडे सविस्तर जप्ती पंचनामा करून जप्त करण्यात आले आहेत.

छापा कारवाईदरम्यान शेतातील गांजा सदृश वनस्पतीची पाहणी करून पंचनामा करण्यात आला. सदर वनस्पतीचे वजन करून ती पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी जप्त करण्यात आली.

- **जप्त मुद्देमाल:** गांजा सदृश वनस्पती - एकूण वजन: 45 किलो 790 ग्रॅम - किंमत: ₹22,53,950/- - कारवाईचे ठिकाण: मौजे डोणगाव शिवार, गट क्रमांक 158, पोलीस स्टेशन फुलंब्री हद्द

जप्त वनस्पतीचे वजन पाच स्वतंत्र पाकिटांमध्ये करून त्यावर आवश्यक लेबल लावण्यात आले. तसेच घटनास्थळावरील आवश्यक नमुने घेऊन पंचनाम्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

सदर कारवाई ही मा. प्रकाश जाधव पोलीस अधीक्षक,मा. प्रशांत स्वामी अपर पोलीस अधीक्षक, मा. पूजा नांगरे SDPO यांचे मार्गदर्शनाखाली डॉ. सोनाली पाईकराव परी. पोलीस उपअधीक्षक, PSI राम बाराहते, PSI सुग्रीव चाटे,पोहेका गोरखनाथ कणसे,अनिल शिंदे,किशोर शिंदे, लालचंद नागलोत,अंकुश बागल,रमेश सोनुने पो कौतिक वळ्हाळ,सागर लोखंडे, चालक चाटे यांनी पार पाडली आहे.यावेळी महसूल विभागातील अधिकारी, शासकीय पंच, सक्षम अधिकारी हजर होते कारवाईदरम्यान आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून जप्त मुद्देमाल सुरक्षित ताब्यात घेण्यात आला. गांजा सदृश वनस्पतीची लागवड केल्याप्रकरणी इसम नामे गणेश दादाराव पवार वय 46 वर्ष रा.डोणगाव याचे विरुद्ध गुन्हा रजिस्टर 598 /26 कलम 20 (अ),20 (ब) , 20 b ii, b ,8 (c) NDPS कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

फारोळा ग्रामपंचायतने दिव्यांगांना पाच टक्के निधी देऊन दिवाळी केली गोड

तभा वृत्तसेवा बिडकीन दि ३० पैठण तालुक्यातील फारोळा ग्रामपंचायत ने दिवंग्यांना दिवाळी आधी पाच टक्के निधी देऊन दिवाळी केली गोड दिव्यांग बांधवांनी ग्रामपंचायत चे मानले आभार ग्रामपंचायत कार्यालय फारोळा येथे आज दि ३० रोजी पंचायत समिती पैठण विस्तार अधिकारी तसेच ग्रामपंचायत फारोळा प्रशासक .बी.डी.राठोड व ग्रामपंचायत अधिकारी आशा तुपे यांच्या हस्ते २३ दिव्यांगाना प्रती लाभार्थी दिव्यांग दहा रुपये निधी वाटप करण्यात आले.यावेळी उपस्थित ग्रामपंचायत अधिकारी आशा तुपे,दिलीप गोरे,गणेश गायकवाड,तेजस जाधव,संजय धुमाळ रविंद्र पवार मंगेश धुमाळ, सर्व दिव्यांग लाभार्थी उपस्थित होते.

चोरीला गेलेले 08 मोबाईल फोन मूळ मालकांकडे सुपूर्द; अहिल्यानगर सायबर पोलिसांची कामगिरी

अहिल्यानगर : नागरिकांचे गहाळ झालेले व हरवलेले मोबाईल अहिल्यानगर सायबर पोलिसांनी विशेष शोध मोहीम राबवून यशस्वीरित्या हस्तगत केले आहेत. सायबर पोलीस स्टेशनच्या विशेष तांत्रिक पथकाने अत्यंत बारकाईने व कौशल्यपूर्ण तांत्रिक विश्लेषण करून भारतातील विविध राज्यांमध्ये सक्रिय असलेल्या एकूण ०८ महागड्या मोबाईल फोनचा शोध घेतला व ते हस्तगत करून मूळ मालकांना परत केले आहेत. या आठ स्मार्टफोनची बाजारातील अंदाजे किंमत सुमारे दोन ते अडीच लाख रुपये आहे. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाण्याचे अधिकारी व अंमलदार यांनी केली आहे.

एआय प्लसचे स्मार्टफोन महागणार

मुंबई : एआय प्लस स्मार्टफोनने आपल्या निवडक स्मार्टफोन मॉडेल्सच्या किमती १५ नोव्हेंबर २०२६ पासून वाढवण्याची घोषणा केली आहे. कच्च्या मालाच्या वाढलेल्या किमती आणि उत्पादन खर्चातील दबावामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. सुधारित दरांनुसार, पल्स २ एफई, पल्स २, नोव्हा २ निओ ५जी, नोव्हा २ पॉवर ५जी, नोव्हा २ प्रो ५जी आणि नोव्हा २ अल्ट्रा ५जी यांच्या निवडक व्हेरिएंट्सच्या किमतीत ₹१,००० ते ₹३,००० पर्यंत वाढ होईल. मात्र, नोव्हाफ्लिप ५जी ची किंमत ₹४९,९९९ कायम राहणार आहे.

पिशोर पोलिसांची मोठी कारवाई! लालवण शिवारात गांजाच्या बेकायदेशीर लागवडीचा पर्दाफाश; 52.97 लाखांचा मुद्देमाल जप्त

फुलंब्री प्रतिनिधी : पिशोर पोलिसांनी लालवण शिवारात मोठी कारवाई करत गांजाच्या बेकायदेशीर लागवडीचा पर्दाफाश केला आहे. पाडळी एकफाटा शिवारातील शेत गट क्रमांक २८ मध्ये छापा टाकून पोलिसांनी तब्बल १४१ गांजाची झाडे जप्त केली. जप्त गांजाचे एकूण वजन १०५.१५ किलो असून, त्याची अंदाजित किंमत ५२ लाख ९७ हजार ५०० रुपये आहे. या प्रकरणी ६६ वर्षीय शेतकऱ्याला अटक करण्यात आली आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पिशोर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मौजे लालवण येथील पाडळी एकफाटा शिवारात गांजाची बेकायदेशीर लागवड करण्यात आल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार दि.२८ बुधवार रोजी पोलिसांनी संबंधित शेतात छापा टाकला.

या कारवाईदरम्यान चैनसिंग रतनसिंग बिमरोटे (वय ६६, रा. लालवण, ता. फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर) यांच्या शेतात गांजाची लागवड केल्याचे आढळून आले. कोणतीही कायदेशीर परवानगी न घेता आर्थिक फायद्यासाठी गांजाची लागवड केल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात आला आहे.

पंचांसमक्ष गांजाच्या झाडांची मोजणी करून जप्तीची कारवाई करण्यात आली. या प्रकरणी आरोपीविरुद्ध अमली पदार्थ व मनःप्रभावी पदार्थ अधिनियम, १९८५ (NDPS Act) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्याला अटक करण्यात आली आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. प्रकाश जाधव, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी तसेच सहायक पोलीस अधीक्षक अपराजिता अग्निहोत्री यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

कन्नड शहर पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकारी परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक आरती पवार यांच्या उपस्थितीत, सहायक पोलीस निरीक्षक कुणाल सूर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांच्या पथकाने ही कारवाई केली.

या पथकात सफौ गजानन कराळे, पोलीस हवालदार दराडे, कैलास करवंदे, दत्तू लोखंडे, पोलीस कॉन्स्टेबल गणेश कव्वाल, कौतिक सपकाळ, पवन खंबाट, कृषी सहाय्यक नवनाथ खिल्लारे, SDPO कार्यालयातील आय-बाईकचे अंमलदार जोनवाल, होमगार्ड नितीन शिंदे, गजानन सोनवणे तसेच कन्नड येथील फॉरेन्सिक विभागाच्या पथकाचा समावेश होता.या प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक कुणाल सूर्यवंशी करीत आहेत.

गांव दक्षता समिती फक्त कागदावर; रेशन दुकानात मनमानी कारभार!!

फुलंब्री प्रतिनिधी: फुलंब्री तालुक्यातील असंख्य स्वस्त धान्य दुकानावर नियंत्रण ठेवण्यासाठी नेमलेली गाव दक्षता समिती ही फक्त कागदोपत्री असल्याचा आरोप लाभार्थ्यांनी केला आहे.

शासन नियमानुसार प्रत्येक गावात सरपंच अध्यक्ष असलेली व तलाठी सदस्य सचिव असलेली १० ते १२ सदस्यांची समिती असणे बंधनकारक आहे. यामध्ये २ महिला बचत गट प्रतिनिधी, २ बीपीएल लाभार्थी, SC/ST प्रतिनिधी, अल्पसंख्याक प्रतिनिधी, पोलीस पाटील, ग्रामसेवक यांचा समावेश असतो.

परंतु फुलंब्री तालुक्यातील असंख्य दुकानदार ही समिती कधीच बैठक घेत नाही. धान्य वेळेवर येते का, बायोमेट्रिक थमशिवाय वाटप होते का, वजन कमी दिले जाते का, हे पाहणारे कोणीच नाही. दुकानदार हा समितीचा सदस्य नसतानाही सर्व कारभार एकहाती चालवत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. स्वस्त धान्य दुकानावर GR नुसार दोन फलक - दक्षता समिती यादी संपर्क व दैनंदिन साठा फलक बंधनकारक असताना तालुक्यात काही प्रमणात दुकान सोडले असता दुकानावर एकही फलक नाही. ही गंभीर बाब असून कारवाई करावी, अशी मागणी सर्वसामान्य ग्रामस्थांनी केली आहे.

"स्वस्त धान्य दुकानदार जाणून-बुजून लाभार्थ्यांचे तीन वेळा बायोमेट्रिक थम घेत नाहीत, त्यामुळे अनेक पात्र लाभार्थी आपोआप स्वस्त धान्य यादीतून वगळले जातात किंवा त्यांचे नाव कमी केले जाते."

"गेल्या चार वर्षापासून मी या गावचा सरपंच आहे आणि गाव दक्षता समितीचा पदसिद्ध अध्यक्ष आहे. परंतु मला आजपर्यंत स्वस्त धान्य दुकानात किती धान्य आले, किती वाटप झाले, याची कोणतीही माहिती दिली जात नाही."

जा.क्र.जे-३/5622/२०२६
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर
दिनांक :-29 OCT 2026

NOTICE OF INQUIRY
(FORM NO.२) (नमुना क्रमांक -२)
सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर.
चौकशी जाहिर नोटीस

(सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, सन १९५० याचे कलम १९/२२/२८)

सन २०२६ चा अर्ज क्रमांक ३४४/२०२६ कलम - किरकोळ

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था टाक्स स्पोर्ट्स अकॅडमी, छत्रपती संभाजीनगर.

नोंदणी क्रमांक एफ :- २२४०८ (औ)

श्री. राहूल अशोक टाक यांने कलम किरकोळ अन्वये भरलेला नमुना यांच्या संबंधात

गैरअर्जदार : - २) सारंग संजय खर्च, रा. प्लॉट नं.ए-१६, योगेश्वरी वृंदावन मल्हार चौक, आदिनाथनगर, गारखेडा, औरंगाबाद.

यांस, ज्या अर्थी मा. सहायक धर्मादाय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून वरील सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेसंबंधात कलम किरकोळ अन्वये चौकशी करण्यात येणार आहे.

त्याअर्थी तुम्हास ही जाहिर नोटीस वृतपत्रातुन प्रसिध्द करण्यात येत आहे आणि फर्माविण्यात येत आहे की, तुम्ही जातीने किंवा मान्यता दिलेल्या प्रतिनिधीमार्फत किंवा योग्य रीतीने सूचना दिलेल्या वकीलामार्फत, मा. सहायक धर्मादाय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग छत्रपती संभाजीनगर यांचे समोर वर दिलेल्या पत्यावर जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसांचे आत वरील बाबींचा अखेरचा निकाल करण्यासाठी ठरविलेल्या सुनावणीस हजर रहावे. आणि चौकशीसंबंधीच्या सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत आणि त्यासंबंधीचा तोंडी व दस्तऐवजांच्या रुपातील सर्व पुरावा सादर करावा.

वर निर्दिष्ट केलेल्या जागी व वेळी हजर राहण्यास तुम्ही कसुर केल्यास तुमच्या गैरहजेरीत सदरहू चौकशी होईल. तिचे कामकाज चालविण्यात येईल आणि तिचा निकाल करण्यात येईल अशी तुम्हास नोटीस देण्यात येत आहे.

आज दिनांक २८/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व सहायक धर्मादाय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर शिक्क्यानिशी दिली.

अधीक्षक (न्यायशाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.जे.३/5225/२०२६
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर
दिनांक-12 OCT 2026

NOTICE OF INQUIRY
(FORM NO.२) (नमुना क्रमांक -२)
सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर.
चौकशी जाहिर नोटीस

(सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, सन १९५० याचे कलम १९/२२/२८) सन २०२६ चा अर्ज क्रमांक ५३२/२०२६ कलम किरकोळ

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था आरंभ सोसायटी फॉर ऑटीझम अँड स्लो लर्नर्स चिल्ड्रन, औरंगाबाद.

नोंदणी क्रमांक एफ :- १८३०७ (औ)

श्री. बाळासाहेब पंडितराव टाकळकर यांने कलम किरकोळ अन्वये भरलेला नमुना यांच्या संबंधात

गैरअर्जदार :-१) डॉ. अमिता पुरोहित, रा. ४६७/सी/१, शिवाजीनगर, जि. पुणे.

यांस, ज्या अर्थी मा. सहायक धर्मादाय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून वरील सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेसंबंधात कलम किरकोळ अन्वये चौकशी करण्यात येणार आहे.

त्याअर्थी तुम्हास ही जाहिर नोटीस वृतपत्रातुन प्रसिध्द करण्यात येत आहे आणि फर्माविण्यात येत आहे की, तुम्ही जातीने किंवा मान्यता दिलेल्या प्रतिनिधीमार्फत किंवा योग्य रीतीने सूचना दिलेल्या वकीलामार्फत, मा. सहायक धर्मादाय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग छत्रपती संभाजीनगर यांचे समोर वर दिलेल्या पत्यावर जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसांचे आत वरील बाबींचा अखेरचा निकाल करण्यासाठी ठरविलेल्या सुनावणीस हजर रहावे. आणि चौकशीसंबंधीच्या सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत आणि त्यासंबंधीचा तोंडी व दस्तऐवजांच्या रुपातील सर्व पुरावा सादर करावा.

वर निर्दिष्ट केलेल्या जागी व वेळी हजर राहण्यास तुम्ही कसुर केल्यास तुमच्या गैरहजेरीत सदरहू चौकशी होईल, तिचे कामकाज चालविण्यात येईल आणि तिचा निकाल करण्यात येईल अशी तुम्हास नोटीस देण्यात येत आहे.

आज दिनांक १२/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व सहायक धर्मादाय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर शिक्क्यानिशी दिली.

अधीक्षक (न्यायशाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर

जाहिर प्रगटन
उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड
जा.क्र. 2026/मशाका/जमाबंदी-१/जन्म-मृत्यु नोंद/सिआर-494
उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड
दिनांक 07-10-2026

अर्जदार ०:- नाजमीन नौशाद शेख रा. कन्नड ता. कन्नड जि.छ.संभाजीनगर
विरूध्द
गैरअर्जदार ०:- ग्रामीण रूग्णालय कन्नड ता. कन्नड / ता. कन्नड जि. छ. संभाजीनगर

विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वय अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ/ ॲड. मार्फत / स्वतः अर्ज सादर करून अर्जदार यांच्या मुलगाचे जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार मुलगा आरीष नौशाद शेख चा जन्म दिनांक 23-12-2024 रोजी कन्नड ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार मुलगा चा जन्म दिनांक 23-12-2024 रोजी कन्नड ता. कन्नड / ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म/मृत्यू प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार मुलगा आरीष नौशाद शेख यांचा जन्म दिनांक 23-12-2024 रोजी कन्नड ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हणजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक 18-11-2026 रोजी मा.न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक 23-12-2024 रोजी कन्नड ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही.

करिता दिनांक 07 /10/2026 रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

जाहीर प्रगटन
मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापूर जि. औरंगाबाद
सिव्हील एम.ए.क्र. 822/2026

अर्जदार :-१) प्रभाकर खंडू वाणी, वय. ५४ वर्षे, धंदा, शेती, रा. येसगांव, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद २) संगीता रामदास मेटे, वय. ३९ वर्षे, धंदा, घरकाम, रा. तुर्काबाद ता. गंगापूर, जि. औरंगाबाद ३) हिराबाई अदिनाथ थोरात, वय. ४२ वर्षे, धंदा, मजुरी, रा. नांगरे बाभुळगांव, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद
विरूध्द
गैरअर्जदार - निरंक

प्रकरण :- वारस प्रमाणपत्र (हेअरशिप प्रमाणपत्र) मिळणे बाबत याअर्थी, वरील अर्जदारांनी ॲड. एस. के. लांडे यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, खंडु नामदेव वाणी हे मौजे येसगांव ता. गंगापुर येथील रहीवासी होते व ते दि. १९/०३/२०१९ रोजी येसगांव ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले असून मयत खंडु नामदेव यांची पत्नी नामे जनाबाई खंडु वाणी ही दि. १३/०२/२०२४ रोजी येसगांव ता. गंगापूर मयत झालेली आहे. अर्जदार क. १ ते ३ हे वर नमुद पत्त्यावरील रहीवासी असून मयत नामे जनाबाई खंडु वाणी यांना अर्जदार क. १ हा मुलगा असून अर्जदार क. २ व ३ ही मुली आहे. मयतास अर्जदारां व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयताच्या माघारी केवळ अर्जदार क. १ ते ३ हेच एकमेव कायदेशीर वारसदार आहे व इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदारांना शासकीय/निमशासकीय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यास कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा आक्षेप, उजर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः किंवा वकिला मार्फत आक्षेप उजर नोंदवावा. मुदतीत आक्षेप उजर न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. करिता हे जाहीर प्रगटन.

दिनांक :- 30/10/2026. आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी व फौजदारी न्यायालय, गंगापूर

जाहीर प्रगटन
मा. प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी साहेब, न्यायालय गंगापुर जि. औरंगाबाद
कि. फौ.अर्ज.क.442/2026

अर्जदार :-सार्थक नामदेव सुकासे, वय १९ वर्ष, धंदा. शिक्षण, रा. मुर्शिदाबाद ता. गंगापूर जि. औरंगाबाद
विरूध्द
गैरअर्जदार :- ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत गुरूधानोरा ता. गंगापुर जि. औरंगाबाद

प्रकरण :- जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) (अ) २०२६ च्या दुरूस्ती प्रमाणे जन्माची नोंद करणे बाबत..

पो.स्टेशन :- पोलीस स्टेशन वाळुज ता. गंगापूर जि. औरंगाबाद

ज्याअर्थी, वरील अर्जदारांनी या न्यायालयात जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी त्यांचे विधीज्ञ श्री. एस. के. लांडे यांच्या मार्फत अर्ज दाखल केला की, अर्जदार हा मौजे मुर्शिदाबाद ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथील रहीवासी असुन अर्जदाराचे शिक्षण चालु आहे. अर्जदाराचे वडील नामे नामदेव दादा सुकासे व आई नामे वंदना नामदेव सुकासे या दोघांच्या वैवाहीक संबंधातुन दि. २७/०६/२००८ रोजी अर्जदार नामे सार्थक नामदेव सुकासे याचा मूर्शिदाबाद ता. गंगापूर येथे जन्म झालेला आहे. अर्जदाराच्या जन्माची नोंद अर्जदाराचे आई, वडील व इतर कुटुंब सदस्य यांना जन्माची नोंद करणे गरजेचे होते परंतु अनावधनाने अर्जदाराची जन्माची नोंद गैरअर्जदाराच्या कार्यालयात केलेली नाही. अर्जदारास जन्म प्रमाणपत्राची शासकीय, शैक्षणीक कामाकरीता आवश्यकता असल्याने अर्जदारास जन्माची नोंद बाबतचे प्रमाणपत्राची गरज आहे.

त्याआर्थी, तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या सदर अर्जास व अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप, उजर असल्यास सबंधीतांनी त्यांचा आक्षेप, उजर या न्यायालयात हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत नोंदवावा, मुदतीनंतर आलेला आक्षेप, उजर लक्षात घेतला जाणार नाहीत व मा. न्यायालय अर्जदारांच्या हक्कात विनंतीप्रमाणे जन्म प्रमाणपत्र बाबतचा आदेश जारी करतील. करीता सदरचे प्रगटन मा. न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले आहे.

दिनांक :-26/10/2026
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापूर

जाहीर प्रगटन
मा. कळमकर साहेब मा. प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी साहेब, न्यायालय गंगापुर जि. औरंगाबाद
कि. फौ.अर्ज.क्र. 438/2026 पु.ता. 02-12-2026

अर्जदार :- किशोर संजय वडणे, वय १९ वर्ष, धंदा. शिक्षण, रा. भातकुडगांव ता. शेवगांव जि. अहिल्यानगर
विरूध्द
गैरअर्जदारः- ग्रामसेवक, ग्रामपंचायत शेंदुरवादा ता. गंगापुर जि. औरंगाबाद

प्रकरण :- जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) (अ) २०२६ च्या दुरूस्ती प्रमाणे जन्माची नोंद करणे बाबत.

पो.स्टेशन : पोलीस स्टेशन वाळुज ता. गंगापूर जि. औरंगाबाद

ज्याअर्थी, वरील अर्जदारांनी या न्यायालयात जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी त्यांचे विधीज्ञ श्री. एस. के. लांडे यांच्या मार्फत अर्ज दाखल केला की, अर्जदार हा मौजे भातकुडगांव ता. शेवगांव जि. अहिल्यानगर येथील रहीवासी असुन अर्जदाराचे शिक्षण चालु आहे. अर्जदाराचे वडील नामे संजय केशव वडणे व आई नामे वर्षा संजय वडणे या दोघांच्या वैवाहीक संबंधातुन दि. ०४/०६/२००७ रोजी अर्जदार नामे किशोर संजय वडणे याचा प्राथमिक आरोग्य केंद्र शेंदुरवादा ता. गंगापूर येथे जन्म झालेला असून अर्जदाराचे आईचे माहेर हे मांडवा ता. गंगापूर येथे आहे. अर्जदाराच्या जन्माची नोंद अर्जदाराचे आई, वडील व इतर कुटुंब सदस्य यांना जन्माची नोंद करणे गरजेचे होते परंतु अनावधनाने अर्जदाराची जन्माची नोंद गैरअर्जदाराच्या कार्यालयात केलेली नाही. अर्जदारास जन्म प्रमाणपत्राची शासकीय, शैक्षणीक कामाकरीता आवश्यकता असल्याने अर्जदारास जन्माची नोंद बाबतचे प्रमाणपत्राची गरज आहे.

त्याआर्थी, तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या सदर अर्जास व अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप, उजर असल्यास सबंधीतांनी त्यांचा आक्षेप, उजर या न्यायालयात हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत नोंदवावा, मुदतीनंतर आलेला आक्षेप, उजर लक्षात घेतला जाणार नाहीत व मा. न्यायालय अर्जदारांच्या हक्कात विनंतीप्रमाणे जन्म प्रमाणपत्र बाबतचा आदेश जारी करतील. करीता सदरचे प्रगटन मा. न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले आहे.

दिनांक :-26/10/2026
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय गंगापूर

जाहीर प्रगटन
मा. प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी साहेब, न्यायालय गंगापुर जि. औरंगाबाद कि. फौ.अर्ज.क्र 439/2026

अर्जदार :- रहीम रशिद शेख, वय ३२ वर्ष, धंदा. शेती, रा. शेंदुरवादा ता. गंगापूर जि. औरंगाबाद
विरूध्द
गैरअर्जदारः- ग्रामसेवक, ग्रामपंचायत शेंदुरवादा ता. गंगापुर जि. औरंगाबाद

प्रकरण :- जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) (अ) २०२६ च्या दुरूस्ती प्रमाणे जन्माची नोंद करणे बाबत..

पो. स्टेशन :- पोलीस स्टेशन वाळुज ता. गंगापूर जि. औरंगाबाद

ज्याअर्थी, वरील अर्जदारांनी या न्यायालयात जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी त्यांचे विधीज्ञ श्री. एस. के. लांडे यांच्या मार्फत अर्ज दाखल केला की, अर्जदार हा मौजे शेंदुरवादा ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथील राहीवासी असुन शेती व्यवसाय करून कुटुंबाचा उदनिर्वाह करतो अर्जदाराचा विवाह अमरीन रहीम शेख हिच्यासोबत झालेला आहे. दोघांच्या विवाह संबंधातुन दि. १८/०२/२०१६ रोजी मुलगा नामे अमन रहिम शेख याचा जन्म झालेला आहे. अर्जदाराच्या मुलाचा जन्म हा मौजे शेंदुरवादा ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे झालेला आहे. अर्जदाराच्या मुलाची जन्माची नोंद अर्जदाराने व इतर कुटुंब सदस्य यांना जन्माची नोंद करणे गरजेचे होते परंतु अनावधनाने अर्जदाराने त्याच्या मुलाची जन्माची नोंद गैरअर्जदाराच्या कार्यालयात केलेली नाही. अर्जदारास आता त्यांच्या मुलाची जन्म प्रमाणपत्राची शासकीय, शैक्षणीक कामाकरीता आवश्यकता असल्याने अर्जदारास त्याच्या मुलाची जन्माची नोंद बाबतचे प्रमाणपत्राची गरज आहे.

त्याआर्थी, तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या सदर अर्जास व अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप, उजर असल्यास सबंधीतांनी त्यांचा आक्षेप, उजर या न्यायालयात हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत नोंदवावा, मुदतीनंतर आलेला आक्षेप, उजर लक्षात घेतला जाणार नाहीत व मा. न्यायालय अर्जदारांच्या हक्कात विनंतीप्रमाणे जन्म प्रमाणपत्र बाबतचा आदेश जारी करतील. करीता सदरचे प्रगटन मा. न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले आहे.

दिनांक :- 26/10/2026.
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय गंगापूर

जाहीर प्रगटन
मा. प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी साहेब, न्यायालय गंगापुर जि. औरंगाबाद
कि. फौ. अर्ज.क्र. 341/२०२६

अर्जदार :- मुसा इसाक शेख, वय ३९ वर्ष, धंदा. शेती, रा. भालगांव ता. गंगापूर जि. औरंगाबाद
विरूध्द
गैरअर्जदारः- ग्रामसेवक, ग्रामपंचायत भालगांव ता. गंगापुर जि. औरंगाबाद

प्रकरण :- जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) (अ) २०२६ च्या दुरूस्ती प्रमाणे जन्माची नोंद करणे बाबत.

पो. स्टेशन : पोलीस स्टेशन शिल्लेगांव ता. गंगापूर जि. औरंगाबाद

ज्याअर्थी, वरील अर्जदारांनी या न्यायालयात जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी त्यांचे विधीज्ञ श्री. एस. के. लांडे यांच्या मार्फत अर्ज दाखल केला की, अर्जदार हा मौजे भालगांव ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथील राहीवासी असुन शेती व्यवसाय करून कुटुंबाचा उदनिर्वाह करतो अर्जदाराचा विवाह मलेखाबी मुसा शेख यांच्यासोबत झालेला आहे. दोघांच्या विवाह संबंधातुन दि. १६/०७/२००७ रोजी मुलगी नामे सना मुसा शेख हिचा जन्म झालेला आहे. तसेच मुलगी नामे आयेशा मुसा शेख हिचा दि. ०१/०१/२०११ रोजी जन्म झालेला आहे. अर्जदाराच्या या दोन्ही मुलींच्या जन्म हा मौजे भालगांव ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे राहत्या घरी झालेले आहे. अर्जदाराच्या दोन्ही मुलींची जन्माची नोंद अर्जदाराने व इतर कुटुंब सदस्य यांना जन्माची नोंद करणे गरजेचे होते परंतु अनावधनाने अर्जदाराने त्यांच्या मुलींची जन्माची नोंद गैरअर्जदाराच्या कार्यालयात केलेली नाही. अर्जदारास आता त्यांच्या मुलींची जन्म प्रमाणपत्राची शासकीय, शैक्षणीक कामाकरीता आवश्यकता असल्याने अर्जदारास त्यांच्या मुलींची जन्माची नोंद बाबतचे प्रमाणपत्राची गरज आहे.

त्याआर्थी, तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या सदर अर्जास व अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप, उजर असल्यास सबंधीतांनी त्यांचा आक्षेप, उजर या न्यायालयात हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत नोंदवावा, मुदतीनंतर आलेला आक्षेप, उजर लक्षात घेतला जाणार नाहीत व मा. न्यायालय अर्जदारांच्या हक्कात विनंतीप्रमाणे जन्म प्रमाणपत्र बाबतचा आदेश जारी करतील. करीता सदरचे प्रगटन मा. न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले आहे.

दिनांक :- 26/10/2026. सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय गंगापूर

जाहीर प्रगटन
मा.प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी साहेब, न्यायालय गंगापुर जि. औरंगाबाद
कि. फौ.अर्ज.क्र. 353/2026

अर्जदार- निलेश तातेराव वाघ, वय १९ वर्ष, धंदा. शिक्षण, रा. शिल्लेगांव ता. गंगापूर जि. औरंगाबाद
विरूध्द
गैरअर्जदार :- ग्रामसेवक, ग्रामपंचायत शिल्लेगांव ता. गंगापुर जि. औरंगाबाद

प्रकरण :- जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) (अ) २०२६ च्या दुरूस्ती प्रमाणे जन्माची नोंद करणे बाबत.

पो.स्टेशन : पोलीस स्टेशन शिल्लेगांव ता. गंगापूर जि. औरंगाबाद

ज्याअर्थी, वरील अर्जदारांनी या न्यायालयात जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी त्यांचे विधीज्ञ श्री. एस. के. लांडे यांच्या मार्फत अर्ज दाखल केला की, अर्जदार हा मौजे शिल्लेगांव ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथील राहीवासी असुन अर्जदाराचे शिक्षण चालु आहे. अर्जदाराचे वडील नामे तातेराव चंद्रभान वाघ व आई नामे सविता तातेराव वाघ या दोघांच्या वैवाहीक संबंधातुन दि. १४/११/२००७ रोजी अर्जदार नामे निलेश तातेराव वाघ याचा शिल्लेगांव ता. गंगापूर येथे जन्म झालेला आहे. अर्जदाराच्या जन्माची नोंद अर्जदाराचे आई, वडील व इतर कुटुंब सदस्य यांना जन्माची नोंद करणे गरजेचे होते परंतु अनावधनाने अर्जदाराची जन्माची नोंद गैरअर्जदाराच्या कार्यालयात केलेली नाही. अर्जदारास जन्म प्रमाणपत्राची शासकीय, शैक्षणीक कामाकरीता आवश्यकता असल्याने अर्जदारास जन्माची नोंद बाबतचे प्रमाणपत्राची गरज आहे.

त्याआर्थी, तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या सदर अर्जास व अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप, उजर असल्यास सबंधीतांनी त्यांचा आक्षेप, उजर या न्यायालयात हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत नोंदवावा, मुदतीनंतर आलेला आक्षेप, उजर लक्षात घेतला जाणार नाहीत व मा. न्यायालय अर्जदारांच्या हक्कात विनंतीप्रमाणे जन्म प्रमाणपत्र बाबतचा आदेश जारी करतील. करीता सदरचे प्रगटन मा. न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले आहे.

दिनांक : 26/10/2026
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय गंगापूर

जाहीर प्रगटन
मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब न्यायालय वैजापूर ता. वैजापूर जि. छ. संभाजीनगर
क्रि.एम.ए.नं. ६१८/२०२६

अर्जदार - अर्चना पि. अरुण शिंदे, (लग्नानंतरचे नाव अर्चना भ्र. महेश गुडदे) वय ३५ वर्षे, धंदा व्यवसाय रा. लक्ष्मी कॉलनी, गंगापूर, ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर
विरुध्द
गैरअर्जदार - ग्रामसेवक, गामपंचायत एकोडीसागज, ता. वैजापूर जि. छत्रपती संभाजीनगर

प्रकरण- जन्म-मृत्यू अधिनियम १९६९ च्या कलम १३(३) प्रमाणे

ज्याअर्थी, अर्जदाराने या न्यायालयात त्यांचे विधिज्ञ एम. बी. गुडदे यांच्या मार्फत अर्ज सादर केला व सदर अर्जामध्ये नमुद केले आहे की, अर्जदार यांचा जन्म मौजे एकोडी सागज ता, वैजापूर जि. छत्रपती संभाजीनगर येथे वडील नामे अरुण त्रिंबक शिंदे व आई नामे सौ. आशाबाई अरुण शिंदे यांच्या राहत्या घरी रात्री दि.०३/०५/१९९१ रोजी झालेला आहे. परंतू अर्जदार यांचे आई-वडील यांच्या कायदयाच्या अज्ञानामुळे अर्जदाराच्या जन्माची नोंद गैरअर्जदाराच्या कार्यालयात नोदविण्यात आलेली नाही, परंतू आता अर्जदार हीस जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता असून तीच्या जन्माची नोंद गैरअर्जदाराच्या कार्यालयात उपलब्ध नाही. म्हणून अर्जदाराने तीच्या जन्माची नोंद गैरअर्जदाराचे कार्यालर्यात घेणेबाबत आदेश मिळणे कामी या मा. न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदाराच्या प्रस्तूत अर्जास व त्यातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधिज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतर दाखल झालेला आक्षेप-उजर विचारात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदाराच्या हक्कात त्यांनी मागणी केल्या प्रमाणे योग्य ते कायदेशीर आदेश पारित करतील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्यानी आज दिनांक ३०/१०/२०२६ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक. सहाय्यक अधिक्षक
न्यायालय वैजापूर

अग्रलेख

भाजपाच्या रणनीतीचा पराभव

विधान परिषदेच्या पाच जागांसाठी झालेल्या निवडणुकीत भाजपाप्रणीत महायुतीला दोन तर अस्तित्वासाठी आचके देत असलेल्या महाविकास आघाडीला तीन जागा मिळणे, हे महाराष्ट्राच्या वर्तमान राजकारणासाठी धक्कादायकच म्हटले पाहिजे. हा निकाल प्रामुख्याने भाजपाची चिंता वाढविणारा आणि महायुतीला रणनीतीचा फेरविचार करायला लावणाराही आहे. तांत्रिकदृष्ट्या पाहिले तर भाजपाला पाचपैकी फक्त एक जागा जिंकता आली आणि ती म्हणजे पुणे शिक्षक मतदारसंघाची. महायुतीला मिळालेली दुसरी जागा म्हणजे अमरावती शिक्षक. महायुतीने दोन्ही शिक्षक मतदारसंघांत बाजी मारली. पण, पुणे, मराठवाडा आणि नागपूर पदवीधरमध्ये महायुतीला पराभवाचे तोंड पाहावे लागले. शरद पवारांच्या राष्ट्रवादीने पुणे, मराठवाडा पदवीधर अशा दोन जागा जिंकल्या. काँग्रेसने नागपूर पदवीधर मतदारसंघ जिंकला. अशा प्रकारे महाविकास आघाडीच्या खात्यात पाचपैकी तीन जागा आल्या आणि त्या सुद्धा पदवीधरसारख्या व्यापक मतदारसंघांत. शिक्षक मतदारसंघाच्या तुलनेत पदवीधरांचे मतदारसंघ मोठे असतात. मतदारांचे वैविध्य असते आणि त्यामुळे नेहमीच्या सरधोपट पद्धतीने ही निवडणूक लढता येत नाही, हे महायुतीच्या लक्षात आले नाही आणि मुख्यमंत्र्यांच्या नागपूर शहरात भाजपाचा उमेदवार पराभूत झाला. विधान परिषदेच्या शिक्षक, स्थानिक स्वराज्य किंवा पदवीधर या मतदारसंघांच्या निवडणुकांची रणनीती वेगळी असते. पुणे आणि नागपूर पदवीधर मतदारसंघांत उमेदवार ठरविताना काही दृष्टिकोनात्मक त्रुटी राहिल्या आणि त्याचा परिणाम समोर दिसत आहे. त्यातही नागपूरचा पराभव भाजपाच्या दृष्टीने अधिक जिव्हारी लागणारा आहे. कारण या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे पिता स्व. गंगाधरराव फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी या दिग्गज नेत्यांनी दीर्घकाळ केले आहे. हा मतदारसंघ भाजपाने उत्तम बांधला होता. त्यामुळेच २०१४ मध्ये गडकरी केंद्रात गेले तेव्हा प्रा. अनिल सोले यांना तेथे सहज विजय मिळाला. २०२० मध्ये प्रा. सोले यांना तिकीट नाकारले गेले. भाजपाचा पराभव झाला. २०२६ मध्ये पुन्हा प्रा. सोले यांना तिकीट नाकारले गेले आणि भाजपा पुन्हा पराभूत झाली. उमेदवारी ठरविण्याच्या दृष्टिकोनात काही तरी उणिवा आहेत, असेच हे निकाल सांगतात.

नागपूर आणि पुणे या दोन्ही पदवीधर मतदारसंघांत जातीय समीकरणे होतीच. पण, या दोन्ही मतदारसंघांमध्ये भाजपाचे संघटन आहे हे महत्त्वाचे. पूर्वीचे विजय त्यामुळेच मिळाले होते. पुण्यात प्रकाश जावडेकर, चंद्रकांतदादा पाटील तसेच नागपुरात गंगाधरराव फडणवीस, गडकरी व नंतर प्रा. सोले यांनी हे मतदारसंघ बांधले. असे असताना भाजपाचा पराभव होत असेल, तर त्याची कारणे महाविकास आघाडीच्या डावपेचांत किंवा शरद पवारांच्या रणनीतीत शोधण्याचे कारण नाही. ती भाजपाच्या अंतर्गत व्यवस्थेत सापडणारी आहेत. उदाहरणार्थ, नागपूर पदवीधरमध्ये प्रा. सोले यांना तिकीट द्यायचे नाही, असे ठरले होते तर त्यांना उमेदवारी दाखल करण्यापासून म्हणजे सुरुवातीपासून रोखायला हवे होते. प्रा. सोले यांनी अर्ज भरला आणि ते ठाम राहिले. अर्जांची छाननी झाल्यावर श्रेष्ठींच्या म्हणण्याखातर माघार घेतली. पण, मतपत्रिकेवर ते रिंगणात कायम होते. प्रा. सोले यांच्या बंडखोरीचे प्रतिबिंब १५ हजार अवैध मतांतून दिसले काय, यावर भाजपाने आता चिंतन केले पाहिजे.

दुसरा मुद्दा आहे तो रणनीतीचा. विद्यापीठांच्या सिनेट निवडणुकीत किंवा विधान परिषदेच्या अशा मतदारसंघांत 'कोटा' पद्धत असते. मतदार निश्चित असतात आणि साधारणतः त्यांचे स्वरूप आपल्याला ठाऊक असते. अशा मतदारसंघांत सरधोपट रणनीती कामाची नाही. आजकाल भाजपाला नंबर गेममध्ये अधिक स्वारस्य आहे. परिणामी, भाजपाच्या लोकांनी स्वतःच्या प्रतिमा निर्मितीसाठी भरपूर मतदारांची नोंदणी केली. त्यात निष्ठावंतांचे महत्त्व कमी आणि बाहेरून आलेल्यांचे अधिक होते हे सांगणे न लगे. साधारणतः मित्रपरिवार व नातेवाईक अशीच ही नोंदणी झाली. कोण आपला, कोण विरोधक हे विसरून नोंदणी झाली. विचारधारा बाजूला ठेवली गेली. भाजपाचेच लोक नोंदणी करीत असले, तरी त्यात पंचवीस-तीस टक्के मतदार भाजपाचे विरोधक असू शकतात, हे विसरले गेले. आपण अधिकाधिक मतदार नोंदविले म्हणजे आपली पक्षातील प्रतिमा उंचावेल, असा अनेकांचा समज होता. त्यांनी त्यांचे काम केले. पण, पक्षाचे काम त्यामुळे तमाम होऊ शकते, हे ना नेत्यांच्या ध्यानात आले ना कार्यकर्त्यांच्या!

अशा निवडणुकांसाठी व्यक्तिगत आणि समूह संपर्क महत्त्वाचा असतो. तो टाळून राजकीय कार्यकर्त्यांच्याच बैठका अधिक झाल्या. अनेक बैठका तर हॉटेलांत झाल्या. त्यात जो कार्यकर्ता प्रत्यक्ष मतदारांपर्यंत पोहोचू शकतो किंवा पोहोचतो, त्याच्यापर्यंत पोहोचायचे राहून गेले. निवडणुकीचे प्रोफेशनल मॅनेजमेंट वगैरे काही लोक सांगत होते. पण, ते फसले. भाजपाच्या कार्यकर्त्यांमध्ये कथित 'प्रोफेशनॅलिज्म' किती मोठ्या प्रमाणात आले आहे, याची प्रचीती निकालाच्या अंतिम टप्प्यात दिसली. भाजपाचा उमेदवार पराभूत होतोय, असे लक्षात येताच मतमोजणी केंद्रात शेवटपर्यंत बोटावर मोजता येण्याएवढेच पक्षाचे लोक शिल्लक होते. भाजपा आता मोठा पक्ष झाला आहे. त्यामुळे त्या पक्षात अंतर्गत कलह आहेत. ते नागपुरात आहेत, तसे पुण्यातही आहेत. त्यांचाही फटका भाजपाला बसला. खरे तर गटबाजी हे काँग्रेसचे वैशिष्ट्य. तरीही नागपूर पदवीधरचे काँग्रेस उमेदवार अभिजित वंजारी यांनी आमदार विकास ठाकरे, शहराध्यक्ष प्रफुल्ल गुडधे यांच्यासह विविध गटा-तटांच्या नेत्यांना सोबत घेऊन विजय मिळविला. वंजारी २०२० मध्ये निवडून आल्यापासून सक्रिय होते. त्यांनी मतदारांना सहा वर्षांत किमान सहा पत्रे पाठवून आपण काय केले, काय करणार आहोत, याची माहिती दिली. भाजपाने अंतिम टप्प्यात फक्त उमेदवारी जाहीर केली आणि निवडणुकीच्या रणनीतीकडे दुर्लक्ष केले. आजच्या काळात सोशल मीडियावरून लोकांपर्यंत पोहोचावे लागते, वृत्तपत्रांमधून विषय मांडावे लागतात, याचे जणू भाजपाला विस्मरण झाले. बरे, असे फक्त नागपूरमध्ये नव्हे, सर्वच मतदारसंघांत घडले. अजितदादांची राष्ट्रवादी आणि उद्धव ठाकरेंची शिवसेना यांचे अस्तित्व या निवडणुकीत जाणवलेच नाही, हे सोडा. भाजपा जशी जाणवायला हवी होती, तशी ती जाणवली नाही, याची भाजपाला चिंता वाटली पाहिजे. कारण भाजपा हा राष्ट्रीय पक्ष आहे.

महायुतीने शिक्षक मतदारसंघांमध्ये चमक दाखवली हे मान्य केले पाहिजे. पण, शिक्षक या सुसंघटित मतदारवर्गात यश मिळविणे आणि पदवीधरांसारख्या बहुरंगी मतदारवर्गात व्यापक स्वीकारार्हता निर्माण करणे, या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. पदवीधर मतदारसंघात मतदान करणारा वर्ग एकसंध नसतो. रोजगार, महागाई, आर्थिक संधी हे मुद्दे त्यांच्या मतदानावर परिणाम करू शकतात. पदवीधर हा महत्त्वाकांक्षी असतो. तो वाचत, बोलत असतो. भाजपाला सोशल मीडिया आणि नियतकालिके इत्यादी माध्यमांचा वापर अधिकाधिक करून या मतदारवर्गात आपली पकड अधिक मजबूत करावी लागेल, असे हा निकाल सांगतो. या निवडणुकीतील आणखी महत्त्वाची बाब म्हणजे, शरद पवार यांच्या पक्षाचे नव्याने जाणवलेले अस्तित्व. पुणे आणि मराठवाडा पदवीधर मतदारसंघांतील विजयामुळे शरद पवारांच्या राष्ट्रवादीच्या आशा पल्लवित व्हायला हरकत नाही. एकूण निकालाचा विचार केला तर असे दिसते की, ज्यांच्याकडे गमावण्यासारखे फारसे नव्हते, त्यांचे फारसे नुकसान झालेले नाही. परंतु, महायुतीला आणि त्यातही भाजपासारख्या पक्षाला जशी घसघशीत कामगिरी यावेळी करता आली असती, त्यात न्यून राहिले. भाजपाची राजकीय ताकद निर्विवाद आहे. परंतु, पदवीधरांमध्ये विश्वास, संपर्क वाढविण्याचे आव्हान स्वीकारल्याशिवाय या पक्षाला त्या वर्गात दीर्घकालीन वर्चस्व निर्माण करणे शक्य नाही. भाजपाला मतदान करणारा वर्ग सुशिक्षित आहे आणि पदवीधरांचा समावेश सुशिक्षितांमध्ये होतो. एका अर्थाने हा सर्व निवडणुकांमधील भाजपाचा मतदार आहे. अशा सुशिक्षितांमधील मोठा वर्ग आपली नाराजी व्यक्त करीत असेल आणि त्यातून असे पराभव वाट्याला येत असतील, तर भाजपाला आणि एकूण महायुतीला आत्मपरीक्षण करावेच लागेल. रणनीती बदलावीच लागेल. कारण हा पराभवच रणनीतीचा आहे! ■

अर्थ विशेष

ॲड. हितेश पारसे

टीडीएस कापला म्हणजे आयकर भरला का?

निवृत्तीनंतर अनेक ज्येष्ठ नागरिक आपल्या बचतीची रक्कम बँकेच्या मुदत ठेवींमध्ये बचत खात्यांमध्ये किंवा पोस्टाच्या योजनांमध्ये गुंतवतात. या गुंतवणुकीतून मिळणारे व्याज हे त्यांच्या दैनंदिन खर्चाचे आणि आर्थिक सुरक्षिततेचे महत्त्वाचे साधन असते. मात्र, बँकेकडून व्याज जमा करताना काही रक्कम टीडीएस म्हणून कापली गेल्याचे दिसले की अनेक ज्येष्ठ नागरिकांच्या मनात प्रश्न निर्माण होतो- आता आयकर भरायची गरज नाही ना? बँकेने कर कापला म्हणजे आपली कराची जबाबदारी संपली का? आणि जास्त कर कापला असेल तर तो परत कसा मिळवायचा? बँकेने टीडीएस कापणे आणि आपल्या संपूर्ण उत्पन्नावरील आयकराची अंतिम गणना होणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत.

१. टीडीएस म्हणजे नेमके काय? : टीडीएस म्हणजे उगमस्थानी कर कपात अर्थात उत्पन्नाच्या स्रोतावरच कराची कपात. काही प्रकारचे उत्पन्न देताना कायद्यानुसार देणाऱ्या व्यक्तीला किंवा संस्थेला ठरावीक अटींनुसार कर कापून तो सरकारकडे जमा करावा लागतो.

२. ज्येष्ठ नागरिकांच्या बँक व्याजावर कर कधी कापला जातो? : बँक मुदत ठेवी, बचत खाती आणि इतर पात्र ठेवींवर मिळणाऱ्या व्याजाच्या बाबतीत टीडीएस कपातीसाठी कायद्यात ठरावीक मर्यादा आणि अटी आहेत. या मर्यादा संबंधित आर्थिक किंवा कर वर्षासाठी लागू असलेल्या तरतुदींनुसार तपासाव्यात. एखाद्या ज्येष्ठ नागरिकाचे व्याज ठरावीक टीडीएस मर्यादेपेक्षा कमी असल्यास बँक कदाचित टीडीएस कापणार नाही. मात्र, टीडीएस कापला गेला नाही म्हणजे त्या व्याजावर आयकर लागणारच नाही, असे नाही. उदा. एका ज्येष्ठ नागरिकाला वर्षभरात विविध बँकांमधून व्याज मिळते. प्रत्येक बँकेने स्वतंत्रपणे टीडीएस कापला नाही, तरी सर्व बँकांमधून मिळालेले व्याज आणि त्यांचे इतर उत्पन्न एकत्र करून अंतिम करदायित्व ठरवावे लागते.

३. फॉर्म १५एच ऐवजी आता फॉर्म १२१, का महत्त्वाचा आहे? : आयकर कायद्यातील बदलांमुळे १ एप्रिल २०२६ पासून सुरू होणाऱ्या कर वर्ष २०२६–२७ साठी पात्र करदात्यांनी टीडीएस न कापण्याची घोषणा करण्यासाठी फॉर्म १२१ वापरायचा आहे. यापूर्वी जुन्या कायद्यानुसार पात्र व्यक्ती फॉर्म १५जी किंवा १५एच वापरत होत्या. नवीन आयकर कायदा, २०२५ मधील कलम ३९३(६) अंतर्गत, निर्धारित अटी पूर्ण करणाऱ्या व्यक्तीला संबंधित कर वर्षातील अंदाजित एकूण उत्पन्नावर करदायित्व शून्य असल्याची घोषणा देता येते. त्यानुसार पात्र असल्यास बँक किंवा संबंधित उत्पन्न देणारी संस्था टीडीएस न कापण्याची प्रक्रिया करू शकते.

ज्येष्ठ नागरिकांसाठी याचा अर्थ काय? : जर एखाद्या ज्येष्ठ नागरिकाचे एकूण उत्पन्न आणि लागू करसवलती विचारात घेतल्यानंतर अंतिम करदायित्व शून्य असेल, तर पात्रतेनुसार फॉर्म १२१ सादर करण्याचा पर्याय उपलब्ध असू शकतो. मात्र, हा फॉर्म प्रत्येक ज्येष्ठ नागरिकाला आपोआप लागू होत नाही.

४. टीडीएस कापला असल्यास त्याची खात्री कशी करावी? : बँकेने आपल्या खात्यातून टीडीएस कापला असल्याचे दाखवले, तरी तो कर सरकारकडे जमा झाला आहे का आणि आपल्या पॅन क्रमांकाशी योग्यरीत्या जोडला गेला आहे का, याची खात्री करणे आवश्यक आहे. यासाठी पुढील कागदपत्रे तपासावीत-

बँकेचे व्याज प्रमाणपत्र : वर्षभरात किती व्याज मिळाले याची माहिती मिळते. फॉर्म १६ए- बँकेकडून लागू परिस्थितीत मिळणारे टीडीएस प्रमाणपत्र. फॉर्म २६एएस- जुन्या कायद्यानुसार संबंधित कालावधीतील टीडीएस आणि कर जमा झाल्याची माहिती. एआयएस (वार्षिक माहिती विवरण)- व्याज, टीडीएस आणि इतर आर्थिक व्यवहारांची उपलब्ध माहिती. कर वर्ष २०२६–२७ साठी फॉर्म १६८- नवीन कायद्यांतर्गत संबंधित आर्थिक माहिती तपासण्यासाठी लागू विवरण. या नोंदींमध्ये काही फरक आढळल्यास बँकेशी संपर्क साधून पॅन, टीडीएस विवरणपत्र आणि जमा केलेल्या कराच्या नोंदी तपासाव्यात.

५. जास्त टीडीएस कापला असल्यास परतावा कसा मिळेल? : समजा, एका ज्येष्ठ नागरिकाला पेन्शन आणि बँक व्याज मिळून वर्षभरात ४ लाख रुपये उत्पन्न आहे. लागू करनियम, वजावटी आणि सवलती विचारात घेतल्यानंतर त्यांचे अंतिम करदायित्व शून्य ठरते. मात्र, बँकेने वर्षभरात १२,००० रुपये टीडीएस कापला आहे. अशा परिस्थितीत, संबंधित कर वर्षासाठी आयकर विवरणपत्र दाखल करणे आवश्यक किंवा योग्य असल्यास ते दाखल करून, टीडीएस क्रेडिटचा दावा करता येतो. टीडीएस कापला गेला असेल तर तो परत मिळवण्यासाठी बँकेच्या नोंदी, फॉर्म २६एएस किंवा लागू नवीन विवरण आणि उत्पन्नाची गणना यांचा मेळ घालणे महत्त्वाचे आहे.

६. ज्येष्ठ नागरिकांनी आयकर विवरणपत्र दाखल करणे आवश्यक आहे का? : केवळ वय ६० वर्षांपेक्षा जास्त आहे म्हणून प्रत्येक ज्येष्ठ नागरिकाला आयकर विवरणपत्र दाखल करण्यापासून सूट मिळत नाही. ती जबाबदारी एकूण उत्पन्न, लागू करमर्यादा, इतर वैधानिक अटी आणि संबंधित कर वर्षातील नियमांवर अवलंबून असते. काही ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष तरतुदी उपलब्ध आहेत. उदाहरणार्थ, जुन्या आयकर कायद्यात कलम १९४पी अंतर्गत, विशिष्ट अटी पूर्ण करणाऱ्या ७५ वर्षे किंवा त्याहून अधिक वयाच्या निवासी ज्येष्ठ नागरिकांना मर्यादित परिस्थितीत विवरणपत्र दाखल करण्यापासून सूट मिळू शकत होती. त्यासाठी पात्र पेन्शन आणि व्याजाचे उत्पन्न, निर्दिष्ट बँक आणि आवश्यक घोषणा यांसारख्या अटी होत्या. मात्र, ही सूट सर्व ज्येष्ठ नागरिकांना लागू होत नाही. तसेच नवीन आयकर कायदा, २०२५ अंतर्गत संबंधित कर वर्षासाठी लागू असलेल्या तरतुदी स्वतंत्रपणे तपासाव्यात. म्हणूनच, आपले उत्पन्न कमी आहे किंवा बँकेने टीडीएस कापला आहे एवढ्याच कारणावरून विवरणपत्र दाखल करण्याची गरज नाही, असा निष्कर्ष काढू नये.

७. ज्येष्ठ नागरिकांनी कोणती काळजी घ्यावी? : आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला सर्व बँक ठेवींची यादी तयार करावी. बचत खाते, मुदत ठेवी, पोस्टाच्या योजना, पेन्शन आणि इतर उत्पन्न यांचा एकत्रित आढावा घ्यावा. बँकेकडून फॉर्म १२१ सादर करण्याची आवश्यकता असल्यास आधी पात्रता तपासावी. टीडीएस कापला असल्यास त्याचे प्रमाणपत्र आणि ऑनलाइन नोंदी तपासाव्यात. तसेच, लागू वजावटी, करसवलती आणि अंतिम करदायित्व यांची गणना करून आवश्यकतेनुसार विवरणपत्र दाखल करावे. एकाच कुटुंबातील पती-पत्नीच्या ठेवी आणि उत्पन्न यांची नोंद स्वतंत्रपणे ठेवावी. प्रत्येक व्यक्तीचे पॅन, बँक व्याज आणि टीडीएस क्रेडिट योग्य व्यक्तीच्या विवरणपत्रात दाखवले जात आहे याची खात्री करावी.

निष्कर्ष : ज्येष्ठ नागरिकांनी एक गोष्ट कायम लक्षात ठेवावी, टीडीएस म्हणजे अंतिम आयकर नव्हे; तो कर भरण्याच्या प्रक्रियेतील एक भाग आहे. बँकेने कर कापला असल्यास अंतिम करदायित्व तपासणे आवश्यक आहे. जास्त कर कापला असल्यास पात्रतेनुसार परतावा मिळू शकतो, तर कमी कर कापला असल्यास उर्वरित कर भरावा लागू शकतो. नवीन फॉर्म १२१ मुळे पात्र करदात्यांना काही परिस्थितींमध्ये टीडीएस कपात टाळण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. मात्र, योग्य पात्रता तपासणे, उत्पन्नाच्या नोंदी जतन करणे आणि आवश्यकतेनुसार आयकर विवरणपत्र दाखल करणे हेच आर्थिक शिस्तीचे लक्षण आहे. निवृत्तीनंतरच्या बचतीचे योग्य व्यवस्थापन करताना करनियम समजून घेणे आणि वेळेवर तज्ज्ञांचा सल्ला घेणे यामुळे अनावश्यक करकपात, परताव्यातील विलंब आणि भविष्यातील करविषयक अडचणी टाळण्यास मदत होऊ शकते. ■

९०९६३३२३५३

(लेखक कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार आहेत)

वेध

रेवती जोशी-अंधारे

पीफासचा 'फॉरएव्हर' फास

पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत जीवनमूल्यांची जपणूक हे आज आपल्यासमोरील मोठे आव्हान आहे. देशाच्या कानाकोपऱ्यात सजग भारतीय आपापल्या पातळीवर या आव्हानाला तोंड देत आहेत. कणखर महाराष्ट्राचे कोंदण लाभलेला कोकण नावाचा हिरवागार पाचू देशवासीयांचा अभिमान आहे. देशाची आर्थिक महासत्ता असलेला महाराष्ट्र मात्र एका गंभीर वळणावर उभा आहे. एकीकडे विकास आणि परकीय गुंतवणुकीच्या नवनवीन वाटा खुणावत असतानाच, त्या वाटांवर 'पीफास'सारखे अदृश्य शत्रू दबा धरून आहेत. पीफास आणि त्यानिमित्ताने आपल्या पर्यावरण संवर्धनासाठीच्या तोकड्या प्रयत्नांचा वेध घेऊ या!

मुंबई-गोवा महामार्गावरील लोटे परशुराम एमआयडीसीत लक्ष्मी ऑर्गेनिक नावाचा रासायनिक कारखाना २०२३ पासून कार्यरत आहे. आतापर्यंत इतर साधारण रसायनांचे उत्पादन घेणारी ही कंपनी गेल्या काही महिन्यांपासून पीफास या अतिशय घातक रसायनाचे उत्पादन घेत आहे. पीफास पीएफएएस अर्थात पर ॲंड पॉलिफ्लुरोअल्काईल सबस्टन्सेस ! मनुष्यनिर्मित रसायनांचा एक घातक समूह! १९४० मध्ये या रसायनांचा वापर सुरू झाला आणि संशोधनासोबत वाढला. या रसायनांचे मानवी शरीरात किंवा निसर्गात सहज विघटन होत नसल्यामुळे त्यांना 'फॉरएव्हर केमिकल्स' म्हणतात. यामध्ये कार्बन आणि फ्लोरिनचे वैज्ञानिक दृष्टीने मजबूत अणुबंध असतात. परिणामी उष्णता, पाणी, तेल किंवा आम्लाचा त्यावर ढिम्म परिणाम होत नाही. नॉनस्टिक भांड्यांवरील टेफ्लॉन कोटिंग, वॉटरप्रूफ कपडे, डाग न पडणारे गालिचे, अन्न पॅक करण्यासाठीचे साहित्य आणि अग्निशमन दलाच्या वापरात येणारा फोम तयार करण्यासाठी ही रसायने वापरली जातात.

आता ही रसायने कोकणातील लक्ष्मी ऑर्गेनिक कंपनीत बनत असून त्यातून निघणारे सांडपाणी कोणतीही प्रक्रिया न करता नैसर्गिक जलस्रोतांमध्ये सोडले जात असल्यामुळे पंचक्रोशीतील १५ गावे भीषण प्रदूषणाच्या सावटाखाली आहेत. या समस्येचा वेध घेण्यासाठी इतिहासात डोकवावे लागेल. इटलीच्या व्हेनेटो प्रांतातील त्रिसिनो गावात वर्ष १९६५ मध्ये मिटेनी नावाची कंपनी सुरू झाली. ही कंपनी वॉटरप्रूफ कापड आणि इतर औद्योगिक उत्पादनांसाठी पीएफएएस रसायने तयार करीत असे. या कारखान्यातून अनेक दशके घातक रसायनं पाण्याच्या स्रोतांमध्ये सोडण्यात आली. २०१३ पर्यंत या कंपनीने इटलीतील भूजल स्रोताचा साठा पूर्णपणे विषारी केला. या प्रांतातील साडेतीन लाख लोकांच्या रक्तातील पीएफएएसचे प्रमाण घातक पातळीपर्यंत वाढले. यामुळे हजारो नागरिक किडनी आणि टेस्टिक्युलर कर्करोग, थायरॉईड, वंध्यत्व आणि यकृताच्या आजारांनी ग्रस्त झाले. वाढता जनक्षोभ आणि कायदेशीर कारवाईमुळे २०१८ मध्ये ही कंपनी दिवाळखोरीत निघाली. जून २०२५ मध्ये इटली न्यायालयाने कंपनीच्या ११ अधिकाऱ्यांना पाण्यात विष कालवल्याबद्दल एकूण १४१ वर्षांची तुरुंगवासाची शिक्षा सुनावली. पण, हे प्रकरण इथेच थांबले नाही.

भारतीयांच्या जीवाशी खेळणे तुलनेने सोपे असल्यामुळे इटलीत बंद पाडलेली हीच घातक यंत्रसामग्री भारतात आली. २०१९ मध्ये भारतीय कंपनी लक्ष्मी ऑरगॅनिक्स इंडस्ट्रिजने लिलावाद्वारे या कंपनीचे पेटंट, तंत्रज्ञान आणि संपूर्ण यंत्रसामग्री खरेदी केली. दूरदृष्टीतून परिणामांचा अभ्यास वगैरे या मंडळींच्या गावीही नसावा, यात नवल ते काय? इटलीकरांनी बंद पाडलेला हाच वादग्रस्त कारखाना रत्नागिरीतील औद्योगिक वसाहतीत उभारून तिथे पीएफएएसचे उत्पादन सुरू झाले. नागरिकांनी या प्रकल्पाविरोधात आंदोलन सुरू केले. हा वाद सध्या राष्ट्रीय हरित लवादाकडे प्रलंबित आहे. कोकणातील पर्यावरण आणि जलस्रोतांना या 'फॉरेवर केमिकल्स'मुळे धोका निर्माण झाला आहे. कारखान्यातील घातक रसायने वासिष्ठी नदी आणि दाभोळच्या खाडीत गेल्यास संपूर्ण मासेमारी व्यवसाय नष्ट होईल. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने या प्रकल्पाला 'वॉटर ॲंड एअर ॲक्ट' अंतर्गत उत्पादनासाठी संमती दिली आहे. कीटकनाशक कायद्यांतर्गत काही घटकांवर निर्बंध असले, तरी सरसकट बंदी नसल्याने पीफास उत्पादनाला कायदेशीर पळवाट मिळाली. सामान्यांचे हित लक्षात घेऊन या रसायनांवर कडक कायदेशीर बंदी लागू करण्याची गरज आहे. अन्यथा, पीफासचा हा फास समस्त भारतीयांच्या गळ्यातील 'फॉरएव्हर' फास बनायला वेळ लागणार नाही. ■

९८५०३३९२४०

डिजिटल जनजागृती

सीए अभय सगदेव

वैयक्तिक माहिती देशाबाहेर गेली तर...

नागपूरमधील एक महिला मोबाईल ॲपद्वारे वैद्यकीय सल्लामसलत बुक करते. तिची अपॉईंटमेंट भारतात निश्चित होते; परंतु त्या ॲपमध्ये क्लाऊड सर्व्हर, पेमेंट गेटवे, ॲनालिटिक्स सर्व्हिस कस्टमर सपोर्ट सिस्टिम किंवा ई-मेल सेवा वापरली जात असू शकते आणि त्यांचा संबंध भारताबाहेरील प्रणालींशी असू शकतो. तिला माहितीची ही हालचाल दिसत नाही; पण प्रायव्हसीच्या दृष्टीने ती महत्त्वाची असू शकते.

आजच्या डिजिटल जगात वैयक्तिक माहिती क्वचितच एका ठिकाणी राहते. शाळा क्लाऊड सॉफ्टवेअर वापरू शकते, क्लिनिक अपॉईंटमेंट प्लॅटफॉर्म वापरू शकते, नियोक्ता एचआर सॉफ्टवेअर वापरू शकतो आणि ऑनलाईन स्टोअर पेमेंट व डिलिव्हरी पार्टनर वापरू शकतो. त्यामुळे डीपीडीपी कायदा फक्त माहिती कायदेशीररीत्या गोळा झाली का, एवढाच प्रश्न विचारत नाही. ती माहिती कशी प्रोसेस, प्रोटेक्ट, शेअर, रिटेन आणि ट्रान्सफर केली जाते, हेदेखील महत्त्वाचे ठरते.

या लेखात डीपीडीपी फ्रेमवर्कमधील दोन महत्त्वाच्या पण अनेकदा गैरसमज होणाऱ्या बाबी पाहूया : भारताबाहेर वैयक्तिक माहितीचे ट्रान्सफर आणि काही परिस्थितींतील सवलत. या तरतुदींना पळवाटा म्हणून पाहू नये. त्या विशेष तरतुदी आहेत आणि त्यांचा जबाबदारीने वापर केला पाहिजे.

वैयक्तिक माहिती भारताबाहेर हस्तांतरित करता येते का?

डीपीडीपी कायदा भारताबाहेर वैयक्तिक माहिती हस्तांतरित करण्यावर सर्वसाधारण बंदी घालत नाही. त्याऐवजी, कलम १६ मध्ये असे सांगितले आहे की, केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वांद्वारे डेटा फिड्युशिअरीकडून प्रोसेसिंगसाठी भारताबाहेरील एखाद्या नोटिफाईड कंट्री किंवा टेरिटोरीमध्ये वैयक्तिक माहिती हस्तांतरित करण्यावर मर्यादा घालू शकते. याचा अर्थ असा की सर्व्हर, व्हेंडर किंवा सर्व्हर प्रोव्हाईडर भारताबाहेर आहे म्हणून क्रॉस-बॉर्डर ट्रान्सफर आपोआपच प्रतिबंधित होत नाही. मात्र, सरकारकडून नोटीाय होऊ शकणाऱ्या मर्यादेकडे डेटा फिड्युशिअरीने लक्ष ठेवले पाहिजे. तसेच काही प्रकारच्या वैयक्तिक माहितीसाठी किंवा काही क्षेत्रासाठी जास्त संरक्षण किंवा मर्यादा घालणारे इतर भारतीय कायदे लागू असू शकतात.

उदाहरणार्थ, आर्थिक संस्था, रुग्णालय, टेलिकॉम ऑपरेटर किंवा इतर नियंत्रित संस्था यांना डीपीडीपी कायदा व्यतिरिक्त सेक्टर-स्पेसिफिक लॉज किंवा दिशानिर्देश अंतर्गतही जबाबदाऱ्या असू शकतात. त्यामुळे डीपीडीपी कायदा नोटीफाईड रिस्ट्रिक्शन्सच्या अधीन हस्तांतरणाची परवानगी देतो म्हणून प्रत्येक हस्तांतरण आपोआप सुरक्षित किंवा कम्प्लायंट आहे असे समजू नये.

व्यावहारिक प्रश्न सोपा आहे : माहिती गोळा केल्यानंतर ती कुठे जाते हे संस्थेला माहीत आहे का? उत्तर जर 'नाही' असेल, तर त्या संस्थेकडे डेटा प्रोसेसिंगवर पुरेसे नियंत्रण अद्याप नाही.

नियमामध्ये याबाबत काय भर घातली आहे? : डीपीडीपी रुल्स, २०२५ मध्येही वैयक्तिक माहिती भारताबाहेर हस्तांतरित करण्याबाबत तरतूद आहे. कायद्यांतर्गत प्रोसेस केलेली वैयक्तिक माहिती भारताबाहेर हस्तांतरित करता येईल; परंतु केंद्र सरकार ज्या निर्बंध आणि रिक्वायरमेंट स्पेसिफाय करेल, त्यांच्या अधीन राहूनच असे करावे लागेल. यात अशा वैयक्तिक माहितीला फॉरेन स्टेट किंवा त्या स्टेटच्या अंतर्गत असलेल्या संस्थेसाठी उपलब्ध करून देण्यासंबंधी रिक्वायरमेंट्स असू शकतात.

सामान्य नागरिकासाठी प्रत्येक डेटा पॅकेटची टेक्निकल रूटिन जाणून घेणे हा मुख्य मुद्दा नाही. मुख्य मुद्दा पारदर्शकता आणि उत्तरदायित्व हा आहे. एखादी संस्था क्लाऊड सर्व्हिस, ओव्हरसीज सपोर्ट टीम किंवा विदेशी व्हेंडर्स वापरत असली, तरी तिने वैयक्तिक माहितीचे संरक्षण करणे आणि डीपीडीपी फ्रेमवर्क अंतर्गत उत्तरदायी राहणे आवश्यक आहे.

सवलत म्हणजे मोकळीक नव्हे : डीपीडीपी कायद्यामध्ये काही ठरावीक परिस्थितींमध्ये सवलती दिल्या आहेत. सवलत म्हणजे कायद्यामधील काही तरतुदी लागू होणार नाहीत किंवा वेगळ्या प्रकारे लागू होतील. पण याचा अर्थ वैयक्तिक माहिती निष्काळजीपणे हाताळण्याची मुभा मिळते असा होत नाही.

sagdev1@gmail.com

ही लोकशाहीची थट्टा नाही का?

महाराष्ट्रात सध्या 'पदवीधर मतदारसंघ' आणि 'शिक्षक मतदारसंघ' या विधान परिषदेच्या राखीव मतदारसंघांच्या निवडणुकीची चर्चा सुरू आहे. निवडणूक लागली, मतदान झाले, मतमोजणी झाली आणि आता तर निकालही लागले, पण चर्चा मात्र सुरूच आहे. या दोन्ही मतदारसंघांमध्ये मतदार हा 'पदवीधर' आणि 'शिक्षक' असणे आवश्यक आहे. तथापि निवडणुकीतील उमेदवार मात्र 'पदवीधर' किंवा 'शिक्षक' असणे आवश्यक नाही; किंबहुना उमेदवारास शैक्षणिक पात्रतेची अटच नाही. माझा प्रश्न हा आहे की, ही बाब किती मतदारांना माहीत आहे आणि दुसरे म्हणजे शैक्षणिक पात्रतेची अटच नसलेला उमदेवार पदवीधर आणि शिक्षक मतदारांचे प्रतिनिधित्व कसे करू शकतो? ही सर्व राजकीय पक्षांची मिलीभगत असून लोकशाहीची थट्टाच आहे. देशातील न्यायव्यवस्था, घटना आणि लोकशाहीचे अभ्यासक यात लक्ष घालतील अशी अपेक्षा माझ्यासारख्या सर्वसामान्य पदवीधर मतदाराने करावी का?

अविनाश मुंजे/९४०४०८०७६१

पाण्याचा प्रचंड अपव्यय

नजिकच्या काळात येणाऱ्या भीषण पाणी टंचाईचा सामना करण्यासाठी नागपूर मनपाने उपाययोजना जाहीर केल्या आहेत. त्यावर अंमलबजावणी पण सुरू केली आहे. पण पाण्याच्या एका प्रचंड मोठ्या अपव्ययाकडे दुर्लक्ष झाले आहे. नागपुरात जेवढ्या नव्या इमारतींचं बांधकाम सुरू आहे तिथे इमारतीचा पाया काँक्रिटकरणासाठी खोदकाम करण्यात येते. सुदैवाने सध्या नागपूरची भूजल पातळी चांगली असल्याने अशा खोदकामातून लगेच पाणी यायला लागतं आणि काँक्रिटकरणासाठी पाण्यामुळे अडचण आल्यामुळे बांधकाम करणाऱ्या कंपन्या हे पाणी भल्यामोठ्या पंपाने उपसा करून नालीमध्ये सोडून देतात. कधी कधी हा उपसा सतत ४-५ दिवस सुरू राहतो. भूगर्भातील लाखो लिटर पाण्याचा हा गंभीर अपव्यय आहे. जमिनीखालील पाणी म्हणजे खरं तर दुष्काळी परिस्थितीत कामात येणारा अमूल्य साठा आहे. पुढची संभाव्य दुष्काळी परिस्थिती पाहता या पाण्याची आत्ताच बचत करणे अत्यावश्यक आहे. दुर्दैवाने पाण्याच्या या अपव्ययाकडे सरकारी यंत्रणेचे मुळीच लक्ष नाही तसेच हा अपव्यय रोखणे कोणत्या विभागाच्या अधिकार क्षेत्रात येते याची कोणालाही कल्पना नाही. विभिन्न सरकारी संस्थांकडे संपर्क केल्यावर 'हा अपव्यय थांबवणे शक्य नाही, बांधकाम व्यवसाय बंद करणार का?' असे साचेबद्ध उत्तर मिळते. असे असले, तरी पाण्याचा हा अपव्यय खालील उपाययोजना करून थांबविता येऊ शकतो.

१. कुठलाही उपसा करण्याआधी मनपाची परवानगी घेणे. २. इमारतीच्या पायाचे काम छोट्या छोट्या टप्प्यांत करणे; जेणेकरून छोट्या आकाराच्या खोदकामात उपसा कमी राहील व नियंत्रणात राहील. ३. उपसा केलेले पाणी मोठ्या टाक्यांमध्ये साठवणे व काँक्रिटकरण झाल्यावर परत विहिरीत सोडून देणे; जेणेकरून पाणी परत जमिनी खालील साठ्यामध्ये जमा होईल. ४. उपसा करताना पंपाच्या पाण्याचा पाईप शेजारील प्लॉटमधील विहिरीत सोडणे; जेणेकरून पाणी परत जमिनी खालील साठ्यामध्ये जमा होईल. संबंधित सरकारी विभाग याकडे लवकरात लवकर लक्ष देतील, अशी अपेक्षा आहे.

श्रीराम पिंपळीकर/नागपूर। ९७६७४९०८७३

वाचक पत्रे

■■■

खरे की खोटे?

'हॅपिनेस इंडेक्स'ची जेव्हा जागतिक स्तरावरील क्रमवारी बघण्याचा योग येतो तेव्हा तो खरा आहे की खोटा, असा बऱ्याच वेळा विचार मनात येतो. हॅपिनेस इंडेक्समधील अग्रस्थानी असलेली जनता प्रत्यक्षात आनंदी आहे का? या क्रमवारीत भारत बराच दूर असतो. जेव्हा की, भारतातील जनता सुखी आहे, आनंदी आहे, कुटुंब व्यवस्थेतील आहे त्यामुळे समाधानी आहे. तरीदेखील भारताचा नंबर इतक्या मागे कसा काय आणि पाश्चिमात्य देशांचा नंबर अग्रस्थानी कसा काय? इथे खऱ्याचं खोटं आणि खोट्याचं खरं केलं जातं का? हा विचार येण्यामागचा उद्देश की, युरोपीय देश असंतोषामुळे पेटत आहेत. मागील कित्येक दिवसांपासून लोक रस्त्यावर येऊन आंदोलने करीत आहेत. हॅपिनेस असेल तर आंदोलन शक्य नाही. कुठेतरी असंतोष आहे, मनाविरुद्ध घटना घडत आहे म्हणून रस्त्यावर येऊन देश पेटवणे सुरू असेल यामध्ये आनंद कुठे आहे मग? भारतातदेखील आंदोलने चालू आहेत. परंतु विदेशी शक्तीने प्रेरित भारताला अस्थिर करणारी ही आंदोलने कुठेतरी थांबवण्याचा प्रयत्न होत आहे. कारण ९० टक्के जनता आंदोलनाच्या विरोधात आहेत. जगाच्या पाठीवर कुठलाही इंडेक्स काढताना मग तो हॅपिनेस असो की भ्रष्टाचार असो बेरोजगारी असो स्वतःला श्रेष्ठ समजण्याच्या नादात आपण खोटा डेटा तर गोळा करत नाही ना? सत्य कधी लपत नाही. ते एक ना एक दिवस बाहेर पडतं. असं पाश्चिमात्य देशांचं झालं आहे. हे जागतिक राजकारण आता कुठेतरी थांबले पाहिजे असे वाटते. ■

डॉ. भारती अनिल हेडाऊ/यवतमाळ

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस **tbedit2016@gmail.com** तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८

RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

संक्षिप्त...

दिवाळीच्या स्वागताला सजली बाजारपेठ, पण दुष्काळामुळे खरेदीला शुकशुकाट

तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. ३० ऑक्टोबर : दिवाळी सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असून, सणाच्या स्वागतासाठी शिरूर अनंतपाळ बाजारपेठ सजली आहे. फोटोमध्ये दिसत असल्याप्रमाणे दुकानांमध्ये रंगीबेरंगी आकाश कंदील, झेंडूच्या माळा, तोरणे आणि सजावटीच्या वस्तूंनी दुकाने भरून गेली आहेत. निळा, गुलाबी, पिवळा, लाल अशा आकर्षक रंगाचे आकाश कंदील ग्राहकांचे लक्ष वेधून घेत आहेत.

दरवर्षी दिवाळीला बाजारपेठेत प्रचंड गर्दी असते, पण यंदा चित्र वेगळे आहे. यावर्षी पावसाने दगा दिल्याने शेतकऱ्यांच्या हातात पैसा नाही. दुष्काळी परिस्थितीमुळे शेतमालाचे नुकसान झाले असून, शेतकरी आर्थिक अडचणीत आहे. त्यामुळे बाजारपेठ सजली असली तरी खरेदीसाठी ग्राहकांचा प्रतिसाद कमी दिसत आहे.

दुकानदारांनी मोठ्या आशेने दिवाळीसाठी लाखो रुपयांचा माल भरला आहे. दिवाळी म्हटले की आमचा वर्षभराचा व्यवसाय होतो. पण यंदा पाऊस कमी झाल्याने ग्राहक केवळ भाव विचारून जात आहेत. आकाश कंदील २०० रुपयांपासून ८०० रुपयांपर्यंत आहेत, पण खरेदी मंदावली आहे, असे एका दुकानदाराने सांगितले.

एकंदरीत, दिवाळीच्या सजावटीने बाजारपेठेची शोभा वाढली आहे, मात्र निसर्गाच्या लहरीपणामुळे आणि दुष्काळाच्या सावटामुळे बाजारातील शुकशुकाट दुकानदारांच्या चिंतेत भर टाकणारा आहे. सण तोंडावर आल्याने पुढील दोन-तीन दिवसांत खरेदी वाढेल, अशी आशा व्यापाऱ्यांना आहे.

बेलकुंड उपसा जलसिंचन योजनेसाठी पाणी आरक्षणाला शासनाची मंजुरी

१३ ते १४ गावांतील सुमारे २,८०० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली; आ. अभिमन्यू पवार यांच्या पाठपुराव्याला यश

११.८० दलघमी पाणी आरक्षण

तभा वृत्तसेवा

औसा दि .३० ऑक्टोंबर : बेलकुंड उपसा जलसिंचन योजनेसाठी ११.८० दशलक्ष घनमीटर (दलघमी) पाणी आरक्षित करण्यासह निम्न तेरणा प्रकल्पाच्या फेर जल नियोजनाला राज्य सरकारने मंजुरी दिली आहे. त्यामुळे औसा विधानसभा मतदारसंघातील बेलकुंडसह परिसरातील १३ ते १४ गावांमधील सुमारे २,८०० हेक्टर कृषिक्षेत्र सिंचनाखाली आणण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला आहे. आमदार अभिमन्यू पवार यांनी गेल्या १३ ते १४ महिन्यांपासून केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून जलसंपदा विभागाने २८ ऑक्टोबर २०२६ रोजी यासंदर्भात शासन निर्णय जारी केला.

निम्न तेरणा प्रकल्पाच्या जलाशयातून बेलकुंड उपसा जलसिंचन योजना राबविण्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २२ ऑगस्ट २०२५ रोजी विशेष बाब म्हणून मान्यता दिली होती. मात्र या योजनेसाठी पाणी आरक्षित करताना निम्न तेरणा प्रकल्पांतर्गत सुरू असलेल्या अन्य सिंचन आणि पाणीपुरवठा योजनांवर परिणाम होऊ नये. यासाठी पाणी वापराचे फेरनियोजन आवश्यक होते. त्यासाठी आमदार अभिमन्यू पवार यांनी सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे फेर जल नियोजनास मंजुरी मिळाल्याने योजनेच्या पुढील प्रक्रियेला गती मिळण्याची अपेक्षा आहे.निम्न तेरणा प्रकल्पाच्या डाव्या कालव्याची लांबी ८० किलोमीटर, तर उजव्या कालव्याची लांबी ७४ किलोमीटर आहे. या कालव्यांद्वारे ११ हजार ६१० हेक्टर क्षेत्राला प्रवाही पद्धतीने सिंचनाचा लाभ मिळतो. याशिवाय तेरणा नदीवरील नऊ बॅरेजेसमधूनही सिंचनासाठी पाणी उपलब्ध होते. कालव्यांच्या लाभक्षेत्रातील २ हजार ७८८ हेक्टर क्षेत्र बॅरेजेसच्या लाभक्षेत्राशी आच्छादित होत असल्याने ११.८० दलघमी पाण्याची बचत होत होती. याच बचतीतून बेलकुंड उपसा जलसिंचन योजनेसाठी पाणी आरक्षित करण्यात आले आहे. त्यामुळे विद्यमान सिंचन व पाणीपुरवठा योजनांच्या पाणीवाटपावर परिणाम न करता नव्या योजनेसाठी पाणी उपलब्ध होणार आहे.

१९९३ मधील भूकंपानंतर पुनर्वसित झालेल्या बेलकुंड परिसरातील हिप्परगा, तावशी ताड, वांगजी, कवळी, माळकोंडजी, माळुंद्रा आणि देवताळा या गावांसह परिसरातील अन्य गावांमध्ये सिंचनाची पुरेशी सुविधा उपलब्ध नाही. निम्न तेरणा जलाशय जवळ असूनही भौगोलिक उंचीमुळे या गावांना प्रवाही पद्धतीने पाणी मिळणे शक्य होत नाही. त्यामुळे या भागात उपसा सिंचन योजना राबविण्याची मागणी अनेक वर्षांपासून केली जात होती. प्रस्तावित योजनेमुळे परिसरातील सुमारे २,८०० हेक्टर शेतीला सिंचनाची सुविधा मिळण्याची अपेक्षा आहे.गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळानेही या योजनेचा निम्न तेरणा प्रकल्पात समावेश करण्यास मान्यता दिली आहे. शासनाच्या निर्णयानुसार लाभक्षेत्र अधिसूचित अथवा निरधिसूचित करण्याची आवश्यकता तपासून पुढील कार्यवाही करावी लागणार आहे. योजनेचा समावेश करून सुधारित प्रशासकीय मान्यता मिळविणे, निविदा प्रक्रिया पूर्ण करणे आणि प्रत्यक्ष काम सुरू करणे हे पुढील महत्त्वाचे टप्पे असणार आहेत.

शेतकऱ्यांची अपेक्षा पूर्ण
-आ. अभिमन्यू पवार

सिंचनाची सुविधा मिळावी.अशी गेल्या अनेक वर्षांपासून बेलकुंड व परिसरातील शेतकऱ्यांची मागणी आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या योजनेला विशेष बाब म्हणून मान्यता दिल्यानंतर पाणी आरक्षणासाठी सातत्याने पाठपुरावा केला. आता फेरजलनियोजनास मंजुरी मिळाल्याने महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला आहे. उर्वरित प्रशासकीय प्रक्रिया लवकर पूर्ण करून प्रत्यक्ष काम सुरू व्हावे. यासाठी प्रयत्न सुरूच ठेवणार आहे. या योजनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल.अशी अपेक्षा आमदार अभिमन्यू पवार यांनी यावेळी व्यक्त केली.

बस्वराज मठपती यांचा पुढाकार विस्कळीत पाणीपुरवठा सुरळीत; नागरिकांना दिलासा

तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. ३० ऑक्टोबर : शहरात गेल्या अनेक दिवसांपासून निर्माण झालेल्या तीव्र पाणीटंचाईमुळे नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. अशा परिस्थितीत भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे शहराध्यक्ष बस्वराज मठपती यांनी पुढाकार घेत प्रभाग क्रमांक ६ व १५ मधील विस्कळीत झालेला पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या पुढाकारामुळे नागरिकांची पाण्यासाठी होणारी गैरसोय दूर करण्यास मदत झाली.

शहरातील काही भागांत पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याने नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. या परिस्थितीकडे सत्ताधारी लोकप्रतिनिधींकडून अपेक्षित लक्ष दिले जात नसल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत होती. या पार्श्र्वभूमीवर बस्वराज मठपती यांनी शिरूर अनंतपाळ नगरपंचायतीचे मुख्याधिकारी व संबंधित कर्मचाऱ्यांना सोबत घेत प्रभाग क्रमांक ६ व १५ मधील पाणीपुरवठ्याची पाहणी करून तो सुरळीत करण्यासाठी पुढाकार घेतला.

शहरातील नागरिकांना नियमित व सुरळीत पाणीपुरवठा मिळणे आवश्यक असताना निर्माण झालेली पाणीटंचाई दूर करण्यासाठी नगरपंचायत प्रशासनाने प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. दरम्यान, पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी बस्वराज मठपती यांनी घेतलेल्या पुढाकाराबद्दल नागरिकांतून समाधान व्यक्त होत आहे.

मीटरमध्ये छेडछाड करून चार लाखांची वीज चोरी



तभा वृत्तसेवा

उदगीर दि. ३० ऑक्टोबर : अहमदपूर शहरातील भाजीमार्केट-आझाद चौक आणि एमआयडीसी परिसरात वीजमीटरमध्ये अनधिकृतपणे छेडछाड करून वीजचोरी केल्याप्रकरणी तिघांविरुद्ध उदगीर शहर पोलीस ठाण्यात भारतीय विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १३५ अन्वये दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या दोन्ही प्रकरणांत एकूण ४ लाख ८ हजार २५० रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचे तक्रारीत नमूद आहे.

पहिल्या प्रकरणात अहमदपूर येथील भाजीमार्केट-आझाद चौक परिसरातील अब्दुल सत्तार इस्माईल शेख आणि शेख अस्लम अब्दुल सत्तार यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधितांनी वीजमीटरमध्ये छेडछाड करून एका वर्षाच्या कालावधीत १,६४३ युनिट वीजचोरी केल्याचा आरोप असून, त्यामुळे ६९ हजार ३०० रुपयांचे नुकसान झाल्याचे तक्रारीत म्हटले आहे. या प्रकरणी उदगीर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

दुसऱ्या प्रकरणात अहमदपूर एमआयडीसी परिसरातील शिवशंकर श्रीरंग कावळे यांच्याविरुद्ध वीजचोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधितांनी दोन वर्षांच्या कालावधीत १२ हजार ८१ युनिट वीजचोरी केल्याचा आरोप आहे. यामुळे ३ लाख ३८ हजार ९५० रुपयांचे नुकसान झाल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी गुरनं. ४३१/२०२६ असा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. दोन्ही प्रकरणांत महावितरणचे सहायक अभियंता मारुती खंडू कळवंडे यांनी दिलेल्या तक्रारींवरून उदगीर शहर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले. संबंधित रक्कम आजपर्यंत भरली नसल्याचेही तक्रारीत नमूद आहे.

एकनाथ शिंदे फाउंडेशन तर्फे गुराळ येथील शेतकऱ्यांना जीवनावश्यक वस्तूंचे किट वाटप

तभा वृत्तसेवा

निलंगा दि. ३० ऑक्टोबर : दुष्काळाच्या संकटात शेतकऱ्यांची दिवाळी गोड करण्यासाठी एकनाथ शिंदे फाउंडेशनचा मदतीसाठी पुढाकार घेतला असून निलंगा तालुक्यातील गुराळ येथील

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना जीवनावश्यक वस्तूंच्या किटचे व जनावरांसाठी चाऱ्याचे वाटप करण्यात आले.

यंदा दुष्काळामुळे शेतकरी बांधवांवर मोठे अस्मानी संकट ओढवले असून, अनेक शेतकरी कुटुंबांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अशा कठीण परिस्थितीत शेतकरी बांधवांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहत त्यांच्या कुटुंबीयांची दिवाळी गोड व्हावी, या संवेदनशील भावनेतून एकनाथ शिंदे फाउंडेशनच्या वतीने मदतकार्याचा दुसरा टप्पा सुरू करण्यात आला आहे. या टप्प्याअंतर्गत लातूर जिल्ह्यासह मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांमध्ये दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबांना जीवनावश्यक साहित्य आणि वस्तूंचे किट तसेच जनावरांसाठी चारा उपलब्ध करून देण्यात येत आहे.

या मदतकार्यांतर्गत निलंगा तालुक्यातील गुराळ, येथील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना जीवनावश्यक वस्तूंच्या किटचे आणि जनावरांसाठी चाऱ्याचे वाटप करण्यात आले. दुष्काळाच्या संकटात सापडलेल्या शेतकरी कुटुंबांना दिलासा मिळावा, त्यांच्या घरातील चूल पेटती राहावी आणि दिवाळीच्या सणात त्यांच्या चेहऱ्यावरही आनंद फुलावा, या उद्देशाने फाउंडेशनच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. संकटाच्या काळात शेतकऱ्यांना केवळ आश्र्वासन नव्हे, तर प्रत्यक्ष मदतीचा आधार देण्याची भूमिका या उपक्रमातून अधोरेखित होत आहे.

यावेळी गावचे सरपंच दीपक भास्कर, शिवसेना तालुकाप्रमुख भगवान जाधव, युवा सेना लातूर जिल्हाप्रमुख कुलदीप सूर्यवंशी यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित होते. तसेच अमर दादा घुले, पंकज कोद्रे, दत्ता खवळे, दीपक कुलाळ, अक्षय तारू, खंडू गाडे, सुमित खवळे आणि रोहन उजागरे यांनी या मदतकार्यात सहभाग घेतला. शेतकरी हा समाजाचा अन्नदाता असून, त्याच्यावर संकट ओढवले असताना त्याच्या कुटुंबाला आधार देणे ही सामाजिक बांधिलकी आहे, या भावनेतून एकनाथ शिंदे फाउंडेशनच्या माध्यमातून मदतीचा हा उपक्रम पुढे नेण्यात येत

दिव्यांग विद्यार्थ्यांच्या कौशल्याला बाजारपेठ; श्रमातून मिळवली खरी कमाई !

तभा वृत्तसेवा

वलांडी दि. ३० ऑक्टोबर : स्वतःच्या हातांनी वस्तू तयार करायच्या, त्या बाजारपेठेत विक्रीसाठी मांडायच्या आणि आपल्या श्रमातून कमाईचा आनंद अनुभवायचा... असा अनोखा अनुभव देवणी तालुक्यातील वलांडी येथील छत्रपती शिवाजी महाराज निवासी मतिमंद विद्यालयातील दिव्यांग विद्यार्थ्यांनी घेतला. दिवाळीनिमित्त विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या पणत्या, आकाशकंदील, मेणबत्त्या आणि सजावटीच्या साहित्याच्या विक्रीसाठी गुरुवारी (ता. २९) वलांडी येथील बाजारपेठेत स्टॉल उभारण्यात आला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळण्यासह त्यांच्या कौशल्याला आर्थिक मूल्य मिळवून देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

दिवाळीच्या पार्श्र्वभूमीवर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या पणत्या, आकर्षक आकाशकंदील, मेणबत्त्या आणि सजावटीच्या वस्तू तयार केल्या होत्या. सुमारे ४० विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग घेतला. त्यांनी तयार केलेल्या वस्तू बाजारपेठेत विक्रीसाठी ठेवल्याने नागरिकांनाही विद्यार्थ्यांच्या कलाकौशल्याची ओळख झाली.

दिव्यांग विद्यार्थ्यांमध्येही अनेक कलागुण आणि कौशल्ये असतात. योग्य मार्गदर्शन आणि संधी मिळाल्यास ते स्वतःच्या मेहनतीतून सुंदर वस्तू तयार करू शकतात, हे या उपक्रमातून अधोरेखित झाले. केवळ वस्तू तयार करण्यापुरता हा उपक्रम मर्यादित न राहता, स्वतः तयार केलेल्या वस्तूंची विक्री करण्याचा अनुभव विद्यार्थ्यांना मिळाला. आपल्या श्रमातून मिळणारी कमाई हीच त्यांच्यासाठी आनंदाची आणि आत्मविश्र्वास वाढवणारी बाब ठरली.

विद्यार्थ्यांना स्वावलंबनाची जाणीव व्हावी, त्यांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन मिळावे आणि समाजाने त्यांच्या कौशल्याची दखल घ्यावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. दिव्यांगत्वापेक्षा कौशल्य, मेहनत आणि जिद्द महत्त्वाची असल्याचा संदेशही या उपक्रमातून मिळाला.

या उपक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष शिवराज आष्टुरे आणि मुख्याध्यापक वैजनाथ घुगे यांचे मार्गदर्शन लाभले. सहशिक्षक राम शिंदे, अमोल म्हेत्रे, धर्मराज बंडगर, सिताराम जाधव, गंगाधर राजुरे, दिलीप बिरादार, संतोष गायकवाड आदींनी सहकार्य केले.

कराटे स्पर्धेत प्रथमेश पाटील चे यश

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ३० ऑक्टोबर : नुकत्याच झालेल्या जिल्हास्तरीय कराटे स्पर्धेत प्रथमेश प्रशांत पाटील याने यश मिळविले असून त्याने या स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकाविला आहे

या यशाबद्दल त्याचे क्रीडा शिक्षक देवानंद गुजर, आदित्य शिंदे तसेच कराटे शिक्षक, कर्मचारी, मित्र परिवार यांनी कौतुक करून अभिनंदन केले आहे .

प्रथमेश चे सर्वत्र कौतुक होत आहे

शास्त्री विद्यालयातील खो -खो चा संघ विभागातून दुसरा

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. ३० ऑक्टोबर :येथील संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे जिल्हा क्रीडा परिषद धाराशिव तथा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित विभाग स्तरीय खो-खो स्पर्धा धाराशिव येथे संपन्न झाल्या. या स्पर्धेमध्ये लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालय उदगीरच्या १४ वर्षे मुले १७ वर्षे मुले व १७ वर्षे मुली या तिन्ही संघाने द्वितीय क्रमांक पटकावला.

या तिन्ही संघांना क्रीडाशिक्षक संतोष कोले यांचे मार्गदर्शन लाभले. यामध्ये नांदेड धाराशिव व लातूर या तीन जिल्ह्यांचा समावेश होता. यामधून नांदेड संघास पराजित करून धाराशिव संघा सोबत तिन्ही संघ द्वितीय क्रमांकावर राहिले. संघ खालीलप्रमाणे आहेत

१४ वर्षाखालील खेळाडू मुले - चैतन्य येणगे, प्रतीक काळगापुरे, हरीओम केंद्रे, अमरनाथ कदम, रोहित कांबळे, प्रज्वल शिरसे, अंकित भालके, कृष्णा राठोड, यश सुडे पाटील, अमरनाथ पोगले, वीरेंद्र तेलंगे, किरण आडे, आर्यन पताळे, तरुण बिरादार, अरुण जळकोटकर

१७ वर्षाखालील खेळाडू मुली - हर्षदा कोले, सायली देशमुख, नंदिनी मुसळे, प्रगती निलेवाड, श्रेया बिरादार, दिव्या चवळे, साक्षी बिरादार, श्र्वेता पाटील, स्नेहा पटणे, सृष्टी हरणे, श्रावणी जगळपुरे, नंदनी चव्हाण,अनन्या फुले, सृष्टी मुतंगे, वैदेही कासले.

१७ वर्षाखालील खेळाडू मुले - नागेश संगमवाड,सुशांत येणगे, श्रीशैल्य बिरादार, अथर्व बोटवे, कृष्णा ढवळे, प्रवीण चिलपिपरे, आदित्य मुळे, लिंगराज घाळे, स्वरूप काटेवार, शिवम मोरे, पृथ्वीराज यसमोडे, वेदांत मुंडे श्रीनिवास संमुखे, विवेक लंगोटे, आदित्य केंद्रे.

या यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार कार्यवाह शंकरराव लासूणे शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष सतनप्पा हुरदळे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे उपमुख्याध्यापक वसंत वाघमारे पर्यवेक्षक कृष्णा मारावार किरण नेमट माधव मठवाले तानाजी खोकले यांसह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केले.

कोट्यावधीचा निधी बँकत पडून शेतकरी कर्जाच्या प्रतिक्षेत

अहिल्याबाई होळकर कर्जमुक्ती योजनेचा लाभ मिळेना, भाजपा किसान मोर्चाचे पदाधिकारी आक्रमक

परभणी (प्रतिनिधी): शासनाकडून शेतकऱ्यांसाठी ८ ते १० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होऊनही बडोदा बँकेच्या शाखेत पात्र शेतकऱ्यांचे कर्जवाटप रखडल्याचा गंभीर आरोप भाजपा किसान मोर्चाचे रंगनाथ सोळंके यांनी केला आहे. अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेअंतर्गत ८०० हून अधिक शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यांमध्ये रक्कम जमा झाल्याचे सांगण्यात येत असताना प्रत्यक्ष कर्जवाटपासाठी शेतकऱ्यांना बँकेच्या चकरा माराव्या लागत आहेत. या प्रकारावरून रंगनाथ सोळंके आणि बाजार समितीचे उपसभापती अजयराव चव्हाण यांनी आक्रमक भूमिका घेत बँक प्रशासनाला जाब विचारला.

मिळालेल्या माहितीनुसार, या योजनेअंतर्गत बडोदा बँकेच्या शाखेत शासनाकडून सुमारे ८ ते १० कोटी रुपयांचा निधी जमा झाला आहे. तसेच दीडशेहून अधिक शेतकऱ्यांचे कर्जप्रस्ताव बँकेने स्वीकारले आहेत. मात्र, निधी उपलब्ध असूनही पात्र शेतकऱ्यांना कर्जाची रक्कम मिळत नसल्याने बँकेच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून कर्जप्रस्ताव सादर केले आहेत. तरीही कर्जाची रक्कम खात्यावर जमा होत नसल्याने बियाणे, खते, औषधे आणि शेतीच्या इतर

खर्चासाठी शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी होत आहे. शासनाने निधी उपलब्ध करून दिल्यानंतरही कर्जवाटपासाठी विलंब का केला जात आहे, असा सवाल सोळंके यांनी उपस्थित केला. बँक प्रशासनाने प्रलंबित कर्जप्रकरणांची तातडीने तपासणी करून पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर कर्जाची रक्कम जमा करावी. कर्जवाटप रखडण्यामागील नेमकी कारणे स्पष्ट करावीत, अशी मागणी भाजपा किसान मोर्चाच्या वतीने करण्यात आली. वरिष्ठ बँक अधिकाऱ्यांनी या प्रकरणात लक्ष घालून शेतकऱ्यांना तातडीने दिलासा द्यावा, अन्यथा शेतकऱ्यांच्या नाराजीला सामोरे जावे लागेल, असा आक्रमक पवित्राही यावेळी व्यक्त करण्यात आला.

यावेळी भाजपा किसान युवा मोर्चाचे रंगनाथ सोळंके, बाजार समितीचे उपसभापती अजयराव चव्हाण, दशरथ सुक्रे, बाबासाहेब मोरे, दत्तराव शिंदे, विकास चव्हाण, कल्याण वाळवंटे, दयानंद सुक्रे, पांडुरंग वाळवंटे, भारत चव्हाण, बालाजी वैद्य, शकील पठाण यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

सुरक्षित क्लिक, सुरक्षित बचपन अभियानातुन जनजागृती

पालम (प्रतिनिधी): तालुका विधी सेवा समिती व तालुका वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने 'सुरक्षित बचपन अभियान' अंतर्गत 'सुरक्षित क्लिक, सुरक्षित बचपन' हा कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम पूयनी येथील जिल्हा परिषद प्रशालेत उत्साहात संपन्न झाला.

दिवाणी न्यायाधीश मनीषा महादेव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या कार्यक्रमास पालम तालुका वकील संघाचे अध्यक्ष एस. आर. रोकडे, ॲड.व्ही. डी.शिंदे, सहायक सरकारी वकील शिवराज डाखोरे, शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते. यावेळी विधिज्ञ के. बी. झुंजारे यांनी विद्यार्थ्यांना बालकांचे लैंगिक गुन्ह्यांपासून संरक्षण कायदा २०१२याबाबत सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. मोबाईलच्या अतिवापराचे दुष्परिणाम, इंटरनेट वापरताना घ्यावयाची काळजी आणि ऑनलाइन सुरक्षिततेचे महत्त्व त्यांनी विशद केले. विद्यार्थ्यांनी आपल्या समस्या पालक व शिक्षकांशी मोकळेपणाने मांडाव्यात, असा सल्लाही त्यांनी दिला.अध्यक्षीय मार्गदर्शनात न्यायाधीश मनीषा पाटील यांनी सायबर गुन्ह्यांबाबत माहिती देत बालकांचे हक्क, सुरक्षितता आणि चांगल्या संस्कारांचे महत्त्व स्पष्ट केले. कोणत्याही अनुचित प्रसंगाला सामोरे जावे लागल्यास न घाबरता विश्वासू व्यक्ती, शिक्षक किंवा संबंधित यंत्रणेशी संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी शाळेतील सुमारे ५० ते ५५ विद्यार्थिनी आणि शिक्षकांनी सहभाग घेतला. सूत्रसंचालन व आभार विधिज्ञ अर्जुन डुकरे यांनी मानले.

अपघातप्रवण चौकात गतिरोधक बसवणार

परभणी (प्रतिनिधी): शहरातील न्याय निवाससमोरील कल्याण मंडपमच्या कोपऱ्यावर अपघातांचे प्रमाण वाढत असल्याने या ठिकाणी गतिरोधक बसविण्याची मागणी करण्यात आली होती. या मागणीची सार्वजनिक बांधकाम विभागाने दखल घेतली असून, येत्या तीन ते चार दिवसांत गतिरोधक बसविण्याची कार्यवाही करण्यात येईल, असे लेखी आश्वासन कार्यकारी अभियंत्यांनी दिले आहे.

नगरसेवक गणेश टाक, रितेश झांबड, डॉ. केदार खटींग, विश्वजीत बुधवंत यांच्यासह इतरांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निवेदन दिले होते.

नगरसेवकांच्या मागणीची दखल

न्याय निवाससमोरील कल्याण मंडपमच्या कोपऱ्यावर गतिरोधक नसल्यामुळे वाहनांचा वेग नियंत्रित होत नाही. परिणामी, हा परिसर अपघातांचा हॉटस्पॉट बनत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले होते. याशिवाय सुपर मार्केट ते देशमुख हॉटेल या रस्त्यावरील पथदिवे बंद असल्याचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला होता. यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने २९ रोजी पत्राद्वारे उत्तर दिले.गतिरोधक बसविण्याबाबत तीन ते चार दिवसांत कार्यवाही केली जाईल, तर पथदिव्यांच्या हस्तांतरणाची प्रक्रिया लवकरच पूर्ण करण्यात येईल, असे स्पष्ट केले आहे. दरम्यान, परभणी शहरातील काही रस्त्यांवर सार्वजनिक बांधकाम विभागाने बसविलेल्या पथदिव्यांचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यासाठी महानगरपालिकेने संबंधित पथदिव्यांची पाहणी करून ते हस्तांतरित करून घ्यावेत, अशी विनंतीही विभागाने केली आहे. प्रशासनाने मागण्यांवर कार्यवाही करण्याचे आश्वासन दिल्याने नगरसेवकांनी बांधकाम विभागासमोरील आंदोलन मागे घेऊन प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन कार्यकारी अभियंत्यांनी पत्राद्वारे केले आहे.

महानंदा केंद्रे व एसटी वाहक पठाण यांचा सन्मान

पालम (प्रतिनिधी): सामाजिक बांधिलकी जपत सार्वजनिक सेवेत योगदान देणाऱ्या व्यक्तींच्या कार्याचा गौरव करण्याच्या उद्देशाने बहुजन विकास सांस्कृतिक कला मंचचे राज्य सल्लागार सूर्यकांत रायभोळे यांच्या निवासस्थानी एसटी महामंडळाच्या महिला वाहक महानंदा केंद्रे आणि वाहक शेरखान पठाण यांचा सत्कार करण्यात आला.

महानंदा केंद्रे या बहुजन विकास सांस्कृतिक कलामंचच्या जिल्हाध्यक्ष म्हणून कार्यरत असून,त्यांच्या सामाजिक व संघटनात्मक कार्याची दखल घेऊन रायभोळे कुटुंबीयांच्या वतीने त्यांचा गौरव करण्यात आला. तसेच एसटी महामंडळात वाहक म्हणून कार्यरत असलेले शेरखान पठाण यांचाही कर्तव्यनिष्ठ सेवेबद्दल सत्कार करण्यात आला.यावेळी माजी सैनिक नितीन रायबोले, आशादेवी रायबोले, सूर्यकांत रायभोळे यांच्यासह कुटुंबीय उपस्थित होते. सार्वजनिक सेवेत प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्याच्या या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

पालम तालुका विधी सेवा समिती व तालुका वकील संघाच्या संयुक्त विद्यमाने सुरक्षित बचपन अभियानातंर्गत सुरक्षित क्लिक, सुरक्षित बचपन हा कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम पुयनी येथील जिल्हा परिषदेत झाला. यावेळी न्यायाधीश मनिषा पाटील, वकील संघाचे अध्यक्ष एस.आर.रोकडे, ॲड. व्ही.डी. शिंदे, सहाय्यक सरकारी वकील शिवराज डाखोरे, मुख्याध्यापक आदी.

कोजागिरी पौर्णिमेनिमित्त आज परभणीत 'स्वरमैफल'चे आयोजन

परभणी (प्रतिनिधी): कोजागिरी पौर्णिमेनिमित्त दत्तनगर गार्डन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने शनिवार दि.३१ रोजी रात्री ८.३० वाजता त्रिमूर्तीनगर येथील पार्वती मंगल कार्यालयात 'स्वरमैफल' या संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या संगीत मैफलीत प्रसिद्ध गायक योगेश पिंपळगावकर हे भावगीते, भक्तिगीते, हिंदी गीते तसेच ज्येष्ठ गायक किशोर कुमार यांची एकाहून एक सरस आणि सदाबहार गीते सादर करणार आहेत. सुरेल गीतांच्या माध्यमातून रसिकांना संगीताची अनोखी मेजवानी अनुभवता येणार आहे.

या कार्यक्रमाचा परभणीतील संगीतप्रेमी आणि रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आनंद घ्यावा, असे आवाहन दत्तनगर गार्डन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने पंजाबराव शिंदे देशमुख, मुळे, अंकुशराव बोचरे, प्रवीण जाधव, जयेश गजरे, हनुमान गायकवाड, दत्तराव पवार, पंडितराव विखे यांच्यासह शिंदे, तेलभरे, डुकरे, वसिकभाई,दीपकभाऊ व काळदाते यांनी केले आहे.

माजलगाव व जायकवाडी धरणातुन पाणी सोडण्याची मागणी

सोनपेठ (प्रतिनिधी): जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता रब्बी पिकांच्या सिंचनासाठी माजलगाव व जायकवाडी धरणातून कालव्याद्वारे पाणी सोडण्यात यावे, अशी मागणी भाजपचे जिल्हा सरचिटणीस शिवाजीराव मव्हाळे यांनी मंगळवारी त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस आणि भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची भेट घेऊन शेतकरी, शेतमजूर व सर्वसामान्य नागरिकांच्या विविध समस्या मांडल्या.

जिल्ह्यात पावसाअभावी दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून रब्बी हंगामातील ज्वारी, बाजरी, मका, हरभरा आणि गहू या पिकांच्या पेरण्या

शेतकऱ्यांनी केल्या आहेत. मात्र, जमिनीत पुरेसा ओलावा नसल्याने आगामी काळात पिकांना पाण्याची आवश्यकता भासणार आहे. त्यामुळे माजलगाव उजव्या कालव्यातून तसेच जायकवाडीच्या डाव्या कालव्यातून परभणी जिल्ह्याला आवश्यकतेनुसार पाणी सोडावे, अशी आग्रही मागणी मव्हाळे यांनी केली. याशिवाय दुष्काळ निवारणासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, शेतकरी व शेतमजुरांना आर्थिक मदत द्यावी आणि ग्रामीण भागातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी तातडीने निर्णय घ्यावेत, अशी मागणीही त्यांनी केली.

दरम्यान, सोनपेठ तालुक्यातील खडका येथे कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी मागासवर्गीय सहकारी सूतगिरणीला मंजुरी मिळवून तिचे उद्घाटन करण्यात आले असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले. जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर मव्हाळे यांचा शासनदरबारी पाठपुरावा सुरू असल्याचे सांगण्यात आले. आता पाणी सोडण्याच्या मागणीवर शासन काय निर्णय घेते, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

वाढदिवसानिमित्त मुरूम खेडा शाळेला संगणत भेट

जिंतुर (प्रतिनिधी): ध्रुवा साकोरे बोर्डीकर यांच्या वाढदिवसानिमित्त प्रमोद चव्हाण मित्र मंडळाच्या वतीने मुरूमखेडा येथील शाळेला तीन संगणक भेट देण्यात आले.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञान मिळावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

संगणक भेटीमुळे विद्यार्थ्यांना संगणकाचे प्राथमिक ज्ञान, टायपिंग तसेच डिजिटल शिक्षणाचा प्रत्यक्ष अनुभव घेता येणार असून त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला मदत होणार आहे. वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत शिक्षणासाठी केलेल्या या उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे. यावेळी केंद्रप्रमुख के. सी. घुगे, प्रमोद चव्हाण, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक ब्रिजगोपाल तोष्णीवाल, जि.प.अध्यक्ष विजयकुमार वाकळे, बाळू अण्णा माकोडे, सरपंच माकोडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

विवेकानंद विद्यालयात कोजागिरी पौर्णिमा उत्साहात

सेलू (प्रतिनिधी): विवेकानंद प्राथमिक विद्यालयात कोजागिरी पौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली.यानिमित्त शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, संस्कार केंद्राचे सभासद आणि त्यांच्या कुटुंबीयांचा स्नेहमेळावा आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ. विजया कोठेकर होत्या. यावेळी शालेय समिती अध्यक्षा करुणा कुलकर्णी, स्थानिक कार्यवाह उपेंद्र बेल्लूरकर, मेघना बेल्लूरकर, डॉ. किशोर जवळेकर, डॉ. अनुपमा जवळेकर आणि मुख्याध्यापक नामदेव एकशिंगे उपस्थित होते. सहशिक्षक विनोद मंडलिक यांनी कोजागिरी पौर्णिमेचे धार्मिक व भौगोलिक महत्त्व स्पष्ट करून पंचपरिवर्तन आणि कुटुंब प्रबोधन या विषयांवर मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक नामदेव एकशिंगे व विनोद मंडलिक यांनी श्रीसूक्त पठण केले. यानंतर उपेंद्र बेल्लूरकर यांनी कविता, तर हर्ष जोशी, गजानन साळवे, विजय चौधरी, विजय जोशी यांनी भक्तिगीते सादर केली. रेणुका बोठे, अनिल कौसडीकर आणि भार्गव जोशी

यांनी कविता सादर केल्या. उत्कर्षा कुलकर्णी व अरणा पवार यांनी स्तोत्रपठण केले. स्नेहमेळाव्याच्या माध्यमातून शिक्षक व त्यांच्या कुटुंबीयांना संवाद साधण्याची आणि परस्परांतील स्नेहबंध दृढ करण्याची संधी मिळाली. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांना दूध वाटप करण्यात आले. प्रास्ताविक अनिल कौसडीकर यांनी केले. सूत्रसंचालन विजय चौधरी, पद्य सादरीकरण सीमा आष्टीकर यांनी केले, तर गजानन साळवे यांनी आभार मानले. विनोद मंडलिक यांच्या एकात्मता मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.

अक्षर आनंद अभ्यास सहल व जनजागृती सायकल प्रवासाचे स्वागत

पालम (प्रतिनिधी): जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या वतीने आयोजित 'अक्षर आनंद अभ्यास सहल व जनजागृती सायकल प्रवास' या उपक्रमांतर्गत अक्षर आनंद वाचन संस्कार केंद्राचे विनोद शेंडगे यांचे पालम येथे आगमन झाले. यानिमित्त श्री चक्रधर स्वामी वाचनालयात वाचन संस्कृतीच्या प्रसारासाठी मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

अध्यक्षस्थानी ममता उच्च माध्यमिक विद्यालयाचे माजी प्राचार्य माधवराव कानगुले होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून विनोद शेंडगे, तर प्रमुख पाहुणे म्हणून अत्तम गेंदे व पत्रकार धोंडीराम कळंबे उपस्थित होते. यावेळी विनोद शेंडगे यांनी वाचनाचे महत्त्व, विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे आणि समाजात वाचन संस्कृती रुजविण्याबाबत मार्गदर्शन केले. नियमित वाचनामुळे ज्ञानात भर पडते, विचारशक्ती विकसित होते आणि व्यक्तिमत्त्व घडण्यास मदत होते. त्यामुळे प्रत्येकाने नियमित वाचनासोबतच कुटुंबासह वाचनाची सवय जोपासावी, असे आवाहन त्यांनी केले. सचिव डॉ. रघुराज गाडगीळ यांच्या वतीने विनोद शेंडगे यांचा सत्कार केला.

रेल्वे व्यवस्थापकांकडून पुर्ण रेल्वे स्थानकाची पाहणी

पुर्णा (प्रतिनिधी): नांदेड विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक प्रदीप कामले यांनी शुक्रवार, दि.३० रोजी पूर्णा येथे भेट देऊन रेल्वेच्या विविध सुविधा आणि पायाभूत सुविधांची सविस्तर पाहणी केली.या पाहणीदरम्यान त्यांनी रेल्वे मार्गाची स्थिती, सुरक्षितता, देखभाल व्यवस्था तसेच आपत्कालीन परिस्थितीतील सज्जतेचा आढावा घेतला.

कामले यांनी हुजूर साहिब नांदेड ते पूर्णा या रेल्वे मार्गावर मागील खिडकीतून पाहणी करून मार्गावरील पायाभूत सुविधा आणि रेल्वे परिचालन व्यवस्थेची माहिती घेतली.पूर्णा येथे त्यांनी पूल क्रमांक ३४० आणि वळण क्रमांक ४३-अ यांची प्रत्यक्ष पाहणी करून त्यांच्या सद्यस्थितीची तसेच देखभाल व्यवस्थेची तपासणी केली.यावेळी अपघात निवारण रेल्वेगाडी आणि स्वयंचलित वैद्यकीय मदत वाहन यांचीही पाहणी करण्यात आली.आपत्कालीन परिस्थितीत तातडीने मदत उपलब्ध करून देण्यासाठी या यंत्रणांची सज्जता आणि कार्यक्षमतेचा त्यांनी आढावा घेतला. क्रू

लॉबी आणि रनिंग रूमला भेट देऊन लोको पायलट व अन्य रेल्वे कर्मचाऱ्यांना उपलब्ध असलेल्या सुविधा, विश्रांतीची व्यवस्था आणि कामकाजाच्या सोयींची माहिती घेतली. यावेळी सिव्हिल इंजिनीअरिंग, इलेक्ट्रिकल, मेकॅनिकल, सिग्नल व दूरसंचार आणि परिचालन विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. संबंधित अधिकाऱ्यांकडून विविध विभागांच्या कामकाजाचा आढावा घेत कामले यांनी रेल्वे मालमत्तेची वेळेवर देखभाल करणे, सुरक्षिततेचे उच्च मानदंड कायम राखणे आणि आवश्यक त्या सुधारणा करण्याबाबत सूचना दिल्या.

पुयणीच्या जिल्हा परिषद शाळेत शेळ्यांचा मुक्काम

पालम (प्रतिनिधी): विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शिक्षणाचे मंदिर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद शाळेतच शेळ्या बांधल्या जात असल्याचा धक्कादायक प्रकार तालुक्यातील पुयणी येथे समोर आला आहे. बुधवार दि.२८ रोजी तालुका विधी सेवा प्राधिकरणाच्या उपक्रमादरम्यान न्यायालयाच्या न्यायाधीश मनीषा एम. पाटील यांच्या निदर्शनास हा प्रकार आला.या घटनेमुळे शाळेच्या व्यवस्थापनासह संपूर्ण शिक्षण यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पुयणी येथील जिल्हा परिषद शाळेच्या आवारात शेळ्या बांधल्या जात असल्याचे निदर्शनास आल्याने शाळेच्या परिसराचा वापर नेमका कोणत्या कारणासाठी होत आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी पोषक वातावरण उपलब्ध करून देणे,शाळेची स्वच्छता आणि शिस्त राखणे ही संबंधित शाळा व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. मात्र, शाळेच्या आवारातच शेळ्यांचा मुक्काम होत असेल तर शाळेच्या दैनंदिन व्यवस्थापनावर प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

विशेष म्हणजे, काही दिवसांपूर्वी जिल्हा परिषदेच्या

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रश्मी खांडेकर यांनी देखील या शाळेला भेट दिली होती.वरिष्ठ अधिकाऱ्यांनी भेट देऊनही शाळेच्या परिसरातील परिस्थिती बदलली नसेल, तर या भेटीचा नेमका परिणाम काय झाला, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. अधिकाऱ्यांच्या भेटी दरम्यान हा प्रकार त्यांच्या निदर्शनास आला होता का आणि त्यानंतर काही सूचना किंवा कारवाई करण्यात आली होती का, याबाबतही स्पष्टता येणे आवश्यक आहे.

शाळेच्या व्यवस्थापनाची प्राथमिक जबाबदारी मुख्याध्यापकांवर असते. तसेच केंद्रप्रमुख आणि गटशिक्षणाधिकारी यांच्यावर शाळांच्या कामकाजावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी आहे.असे असताना शाळेच्या आवारात शेळ्या बांधण्याचा प्रकार सुरू असताना संबंधित यंत्रणेचे लक्ष याकडे कसे गेले नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे. हा प्रकार किती दिवसांपासून सुरू आहे, शेळ्या कोणी बांधल्या, त्यासाठी कोणाची परवानगी घेण्यात आली होती का आणि शाळा व्यवस्थापनाला याची माहिती होती का, या बाबींची चौकशी होणे गरजेचे आहे.

तालुका विधी सेवा प्राधिकरणाच्या उपक्रमादरम्यान न्यायाधीश मनीषा एम.पाटील यांच्या निदर्शनास हा प्रकार आल्याने या प्रकरणाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाशी संबंधित शाळेच्या परिसरात अशा प्रकारे शेळ्या बांधल्या जात असतील, तर ग्रामीण भागातील शाळांच्या व्यवस्थापनाचा प्रश्न ऐरणीवर येतो. या प्रकरणाची वरिष्ठ स्तरावर सखोल चौकशी करून संबंधितांची जबाबदारी निश्चित करावी आणि दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

अ.भा.मराठी शाहीर परिषदेच्या जिल्हा समन्वयकपदी रामदास कदम

परभणी : महाराष्ट्रातील पारंपरिक लोककला, पोवाडा,शाहिरी परंपरेचे जतन,संवर्धन, आणि संगोपन करणाऱ्या अखिल भारतीय मराठी शाहीर परिषदेच्या परभणी जिल्हा समन्वयकपदी रामदास दिगंबर कदम यांची निवड करण्यात आली.परिषदेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष शाहीर सम्राट डॉ.देवानंद माळी आणि प्रमुख कार्यवाह विनोद ढगे यांच्या प्रमुख उपस्थित त्यांना निवड पत्र देण्यात आले. परिषदेची संघटनात्मक बैठक नुकतीच पार पडली. रामदास कदम हे जगविख्यात गोंधळ महर्षी राजारामबापू कदम यांचे पंतू असून ते अनेक वर्षापासून जिल्ह्यासह राज्यातील सांस्कृतिक चळवळीत सक्रिय सहभाग घेऊन कलावंताच्या न्याय हक्कासाठी सामाजिक आर्थिक परिस्थिती बळकट करून कलावंतांना मुख्य प्रवाहात आणण्याचे सातत्याने काम करत आहेत.तसेच कदम हे राज्य शासनाच्या जिल्ह्यातील कलवंत मानधन निवड समितीत अशासकीय सदस्य असून त्यांनी अनेक खऱ्या लोककलावंतांना या योजनेचा लाभ मिळवून दिला आहे.

जाहिर प्रगटन

पाथरी येथील कु. शुमायला एस.एस.ए. दिवाणी न्यायाधीश क. स्तर पाथरी ता.पाथरी जि.परभणी यांचे न्यायालयात

नि.क्र. दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१८३/२०२६

भागवत शिंदे व ईतर विरूध्द निरंक

अर्जदार : १.भागवत पि आप्पासाहेब शिंदे वय ४३ वर्षे, धंदा शेती, २.शिवाजी आप्पासाहेब शिंदे वय ५५ वर्षे धंदा शेती. अर्जदार क्रमांक १ व २ रा. कानसुर ता. पाथरी जि.परभणी.३.कमलबाई महादू रेंगे वय ५४ वर्षे धंदा-घरकाम. रा.पोस्ट जाम ता.जि.परभणी.४. मीरा उध्दव पायघन वय ५३ वर्षे धंदा घरकाम रा. खतगव्हाण पोस्ट पोहनेर ता. माजलगाव जि. बीड. ५.विमल भगवान रनेर वय ५८ वर्षे धंदा घरकाम रा. बाभळगाव ता. पाथरी जि. परभणी.

गैरअर्जदार - निरंक

दावा:बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी, अर्जदार यांनी या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत ॲड. श्री.पी.पी. गायकवाड यांचे मार्फत अर्ज दाखल केला आहे की,**रुक्मीण आप्पासाहेब शिंदे** यांचा मृत्यु मौजे रा.कानसुर ता. पाथरी जि. परभणी येथे दि.१७/०९/२०२५ रोजी झाला आहे. मयतास अर्जदारांशिवाय ईतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत असे अर्जात नमुद केले आहे.अर्जदार हेच मयतांचे कायदेशीर वारस आहेत असे अर्जात नमुद केले आहे.अर्जदारांनी कायदेशीर कामासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयात अर्ज केला आहे.

ज्या अर्थी कोणास सदर अर्जाबाबत आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन आपला आक्षेप तिस दिवसाचे आत किंवा दि.०८/१२/२०२६ रोजी या न्यायालयात दाखल करावा अन्यथा अर्जदाराचे म्हणने ऐकुन एकतर्फी निर्णय दिला जाईल.आज दि.२८ माहे ऑक्टोबर २०२६ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्यानी दिले

कनिष्ठ लिपीक **आदेशावरून**

सहाय्यक अधिक्षक (आस्था)

दिवाणी न्यायालय क. स्तर पाथरी

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

वाडी येथील उपजिल्हा रुग्णालयाचे उद्या उद्घाटन

तभा वृतसेवा
नांदेड, दि.३० ऑक्टोबर -

नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातील वाडी (बु.) येथे नव्याने उभारण्यात आलेल्या १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाचे उद्या, रविवार, दि. १ नोव्हेंबर रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या हस्ते लोकार्पण होणार आहे. या कार्यक्रमात विविध विकासकामांचे लोकार्पण व भूमिपूजन करण्यासोबतच दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना चारा, विधवा महिलांना शिलाई मशीन आणि आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांतील गरजू विद्यार्थिनींना सायकलींचे वाटप करण्यात येणार आहे. अशी माहिती नामदार हेमंत पाटील आणि नांदेड उत्तरचे आमदार बालाजीराव कल्याणकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पत्रकार परिषदेला शिवसेनेचे नांदेड जिल्हा संपर्कप्रमुख रमाकांत मढवी, नामदार हेमंत पाटील, आमदार बालाजीराव कल्याणकर, आमदार आनंदराव बोंढारकर, आमदार बाबुराव कोहळीकर, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गंगाधर बडूरे, उमेश मुंडे, विनय गिरडे पाटील आणि विवेक देशमुख यांच्यासह शिवसेनेचे आजी-माजी लोकप्रतिनिधी आणि पदाधिकारी उपस्थिती होती.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर राहणार असून, सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे, खासदार अशोकराव चव्हाण, राज्यसभा खासदार डॉ. अजित गोपछडे, हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर, विधानपरिषद आमदार हेमंत पाटील, आमदार राजेश पवार, बाबुराव कोहळीकर, प्रतापराव पाटील चिखलीकर, भीमराव केराम, जितेश अंतापूरकर, डॉ. तुषार राठोड, आनंदराव पाटील बोंढारकर, ॲड. जयाताई चव्हाण यांच्यासह विविध लोकप्रतिनिधी व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना चारा वाटप

जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन शेतकऱ्यांच्या जनावरांसाठी चारा वाटप करण्यात येणार आहे. तसेच पाण्याच्या टँकरचा प्रारंभ करण्यात येईल. आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांतील गरजू विद्यार्थिनींना सायकली, तर विधवा महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी शिलाई मशीनचे वाटप केले जाणार आहे. दुष्काळाच्या संकटात सापडलेल्या शेतकरी कुटुंबांना आधार देण्यासोबतच महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे आणि विद्यार्थिनींच्या शिक्षणाला हातभार लावणे, हा या उपक्रमांचा उद्देश आहे.

नर्सिंग महाविद्यालय, वसतिगृहाचे भूमिपूजन

वाडी (बु.) येथे उभारण्यात आलेल्या १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयामुळे नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघासह परिसरातील ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्य सुविधा उपलब्ध होणार आहेत. रुग्णालयाच्या मुख्य इमारतीचे लोकार्पण होणार असून, याच परिसरात नर्सिंग महाविद्यालयाची मुख्य इमारत आणि नर्सेस वसतिगृहाच्या बांधकामाचे भूमिपूजन करण्यात येणार आहे. तसेच रुग्णालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी निवासी इमारतीच्या बांधकामाचाही शुभारंभ होणार आहे.

बाह्यवळण रस्त्यांसह विविध विकासकामांचे लोकार्पण

या कार्यक्रमात रा.म.मा.-७५२ आयपासून चोंडी, कुरुंदा, मालेगाव आणि तरोडा नाका या मार्गाशी संबंधित रस्त्याच्या कामाचे लोकार्पण करण्यात येणार आहे. पूर्णा रोड ते मालेगाव रोड ते हिंगोली रोड या नांदेड शहर उत्तर बाह्यवळण रस्त्याचे तसेच नांदेड शहर पश्चिम बाह्यवळण रस्त्याचेही लोकार्पण होणार आहे.

याशिवाय शासकीय विश्रामगृह, पावडेवाडी नाका, मोर चौक ते छत्रपती चौक या मार्गावरील रामा-६१ च्या लिंक रोडच्या डांबरी नूतनीकरणाचे लोकार्पण करण्यात येणार आहे. नांदेड शहर पश्चिम बाह्यवळण रस्त्यावरील रेल्वे उड्डाणपुलाच्या पोहोचमार्गासह बांधकामाचे भूमिपूजनही होणार आहे. या कामांमुळे शहरातील वाहतूक व्यवस्था आणि परिसरातील दळणवळण अधिक सुलभ होण्यास मदत होणार आहे.

नांदेड उत्तरच्या विकासाला चालना

आमदार बालाजीराव कल्याणकर यांच्या पुढाकारातून नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघात आरोग्य, रस्ते आणि पायाभूत सुविधांशी संबंधित विविध विकासकामे हाती घेण्यात आली आहेत. या कामांसाठी राज्य शासनाकडून निधी उपलब्ध झाल्याने मतदारसंघातील विकासाला गती मिळत असल्याचे पत्रकार परिषदेत सांगण्यात आले. विकासकामांसोबतच दुष्काळग्रस्त शेतकरी, महिला आणि विद्यार्थिनींना मदतीचा हात देण्याचा प्रयत्न या कार्यक्रमाच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

रविवार, दि. १ नोव्हेंबर रोजी वाडी (बु.) येथील उपजिल्हा रुग्णालय परिसरात होणाऱ्या या कार्यक्रमाला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

रोबोटिक ड्रग डिलिव्हरी सिस्टम ते महिला सुरक्षा अ‍ॅप; संशोधक विद्यार्थ्यांशी साधला कुलगुरुंनी संवाद

तभा वृतसेवा
नांदेड, दि.३० ऑक्टोबर -

रोबोटिक ट्रक डिलिव्हरी सिस्टम, सोशल मीडिया मार्केटिंग, फिश म्युकस बायो इनोव्हेशन, कोकोनट शेल फॉर क्लीन वॉटर, डिजिटल लेबर आयडेंटिटी, जलरक्षक वॉटर क्वालिटी सेंसर, इमेज रिस्टोरेशन, स्मार्ट की प्रोटेक्टिंग डिव्हाईस, स्टुडंट सेंट्रीक प्लॅटफॉर्म फॉर कनेक्टिंग आयडिया, डिजिटल जनरेशनसाठी इंग्रजी, बालकांसाठी पालेभाज्या चूर्ण, वुमन सेफ्टी प अशा एक ना दहा संकल्पना मांडणाऱ्या महाविद्यालयीन संशोधक विद्यार्थ्यांशी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी मनमोकळा संवाद साधला.

निमित्त होते विद्यापीठस्तरीय 'आविष्कार' संशोधन महोत्सवाचे. दि.३० ऑक्टोबर रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील औषधनिर्माणशास्त्र संकुलामध्ये आयोजित 'अविष्कार' महोत्सवात चार जिल्ह्यामधून आलेल्या १६४ संशोधक विद्यार्थ्यांनी मानव्यविज्ञान, मूलभूत विज्ञान, वाणिज्य व्यवस्थापन आणि विधी, कृषी व पशु विज्ञान, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, वैद्यक आणि औषधनिर्माण अशा श्रेणींमध्ये शंभरावर नव्या संकल्पना पोस्टर आणि प्रकल्पांद्वारे सादर केल्या. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांनी संशोधक विद्यार्थ्यांशी संवाद साधत विविध प्रश्नोत्तरे केली. 'विद्यार्थ्यांच्या अभिनव संकल्पना कागदावरच न राहता त्यांचे उपयोजन झाले पाहिजे व त्यातून उद्योग निर्मिती झाली पाहिजे.' अशी अपेक्षा डॉ. मनोहर चासकर यांनी यावेळी व्यक्त केली.

तत्पूर्वी विद्यापीठ संशोधनाला चालना देणाऱ्या आविष्कार महोत्सवाचे उद्घाटन फित कापून कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते झाले. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, व्यवस्थापन परिषद सदस्य इंजिनीयर नारायण चौधरी, डॉ. हनुमंत कंधारकर, अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, डॉ. हरिश्चंद्र पतंगे, डॉ. चंद्रकांत बाविस्कर, वित्त व लेखा अधिकारी डॉ. राजेश शिंदे, 'आयआयएल' संचालक डॉ. शैलेश वाढेर, भाषा संकुलाचे संचालक डॉ. पृथ्वीराज तौर, औषधनिर्माणशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. संजय पेकमवार, 'आयक्यूएसी' संचालक डॉ. सुरेंद्र रेड्डी, संयोजक डॉ. पी. विठ्ठल, विद्यापीठ समन्वयक डॉ. काशिनाथ बोगले, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम यांच्यासह अधिकारी, शिक्षक, परीक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिवसभर चाललेल्या या महोत्सवात सकाळच्या सत्रात पोस्टर प्रदर्शन आयोजित करण्यात आले. तर दुपारी 'पोडियम'चे आयोजन करण्यात आले. देशभरातून आलेल्या तज्ज्ञ परीक्षकांनी संशोधकांचे मूल्यांकन केले.

भाषा वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुलाने या महोत्सवाचे आयोजन केले होते. आविष्कार महोत्सवातील संशोधन प्रकल्प पाहण्यासाठी विद्यापीठामध्ये दिवसभर मोठी गर्दी पाहायला मिळाली.

काँग्रेस पक्षाचा शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर तहसीलवर धडक मोर्चा

तभा वृतसेवा
हदगाव, दि.३० ऑक्टोबर -

दुष्काळामूळे होरपळून जाणाऱ्या शेतकरी बांधवांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम केले असून राज्य सरकारने अग्रीम रक्कम म्हणून ५००० रु. ची तोकडी मदत दिली व मत चोरी च्या प्रकरणात देशात गदरोळ माजला असून लोकशाही ही धोक्यात आली आहे. यासह शेतकरी बांधवांच्या प्रलंबित असलेल्या विविध मागण्यांसाठी आज दि.३० ऑक्टोबर रोजी हदगाव तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने भव्य अशी शहरातून मोटरसायकल रॅली काढून केंद्र व राज्य सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणांच्या आणि निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेबद्दल जोरदार घोषणाबाजी करत ही रॅली हदगाव तहसील कार्यालयावर धडकली.

या भव्य रॅलीचे व आंदोलनाचे नेतृत्व लोकनेते तथा माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर, नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष डॉ. विठ्ठल पावडे आणि हदगाव तालुका काँग्रेस कमिटीचे प्रमुख पदाधिकारी, नगरसेवक व कार्यकर्त्यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. दुष्काळामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना शासनाकडून मदत अपुरी असून प्रति एकरी ५० हजार रुपयांची तात्काळ आर्थिक मदत जाहीर करावी. पीक नुकसानीमुळे बाधित झालेल्या सर्व शेतकऱ्यांना नियमानुसार पिक विमा ची शंभर टक्के भरपाई तात्काळ द्यावी. जनावरांसाठी तात्काळ चारा छावण्या सुरू करून चारा व पिण्याचा पाण्याची योग्य व्यवस्था करावी तसेच वोट चोरी रोखण्यासाठी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी तात्काळ आपल्या पदाचा राजीनामा द्यावा अशाप्रकारे विविध मागण्या या आंदोलन दरम्यान लावून धरण्यात आले होते.

द्रष्टीबाधितांच्या स्वावलंबनासाठी पांढऱ्या काठी चे वाटप

बाऱ्हाळी -दृष्टी बाधित व्यक्तींना स्वावलंबी जीवन जगता यावे त्यांच्यात आत्मविश्वास वाढावा आणि दैनंदिन जीवनात येणाऱ्या अडचणीवर मात करता यावी या हेतूने जागतिक पांढरी काठी दिन व जागतिक दृष्टी बाधित दिनानिमित्त बाऱ्हाळी येथील एकलव्य निवासी अंध विद्यालयात पांढरीकाठी वितरण व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रोटरी क्लब ऑफ लातूर,होरायझन क्लब बियाँड व्हिजन फाउंडेशन, पी पी पटेल फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्ट आणि रोटरी क्लब ऑफ मुखेड सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. श्रीहरी बुडगेवार (अध्यक्ष रोटरी क्लब मुखेड सिटी)प्रमुख पाहुणे म्हणून डॉ . माधव गोरे (रोटरी क्लब ऑफ लातूर व बियाँड व्हिजन फाउंडेशन लातूर)।डॉ. घनश्याम ताडेवार ,मुखेडचे माजी उपनगराध्यक्ष जगदीश सेट बियाणी ,बस्वराज शिवपुजे उपस्थित होते यावेळी विद्यार्थ्यांना भविष्यातील येणाऱ्या अडचणी व समस्या यावर मान्यवरांनी मार्गदर्शन केले आणि विद्यार्थ्यांना पांढरी काठीचे वाटप करण्यात आले . प्रास्ताविक, सूत्रसंचलन नरसिंग अवधूते यांनी केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोहन कोंडेवाड,बालाजी जाधव,बारसोळे, मनोज अष्टुरे,सारंग दोसलवार,पांडुरंग रेणुगुंटवार,संदीप सुडके,ज्ञानेश्वर कोतवाले,गजानन शिंगटवार यांच्यासह कर्मचारी वर्गाने परीश्रम घेतले.

सहशिक्षक गणेश गव्हाणे प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त

नवीन नांदेड -कुसुमताई प्राथमिक शाळा सिडको नांदेड येथील ज्येष्ठ शिक्षक गणेश शिवराम गव्हाणे हे ३४ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर दिनांक ३१ ऑक्टोंबर २०२६ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. त्याबद्दल त्यांच्या सेवापुर्ती सोहळ्याचे आयोजन करून त्यांना पुढील निरोगी आयुष्यासाठी कुसुमताई विद्यालय येथील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी शुभेच्छा दिल्या. कुसुमताई प्राथमिक शाळा

सिडको नांदेड येथे गणेश शिवराम गव्हाणे मन्ना उमरगेकर हे शिक्षक म्हणून दिनांक १० जून १९९२ रोजी रुजू झाले. त्यांनी आपल्या कार्यकाळात विद्यार्थ्यांना शिस्तबद्ध शिक्षणाचे धडे देऊन त्यांच्या पुढील आयुष्यात डॉक्टर, इंजिनिअर, शिक्षक, उद्योजक व समाज उपयोगी पडणारे पदाधिकारी घडविण्याचे मोलाचे कार्य केले आहे.त्याचबरोबर आपल्या शाळेचे नाव उज्वल व्हावे यासाठी नेहमी प्रयत्नशील असायचे व सर्वांशी जिव्हाळ्याचे संबंध जपत आपल्या प्रदीर्घ सेवेचे ३४ वर्ष ४ महिने २१ दिवस पूर्ण करत दिनांक ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी ते सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांच्या या सेवानिवृत्ती बदलसंस्थेचे संचालक ,अध्यक्ष ,सचिव संभाजी बिरादार यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी या सेवापूर्ती सोहळ्या निमित्य पुढील आयुष्य भरभराटीचे व निरोगी जावो अशा शुभेच्छा दिल्या.

खतगांव प्रा.आ.केंद्रात कार्यरत तीन आरोग्य सेविका शासकीय सेवेत कायम

आदमपूर -बिलोली तालुक्यातील खतगांव प्राथमिक आरोग्य केंद्रातर्गंत असलेल्या आदमपूर प्राथमिक आरोग्य उपकेंद्रातील सोनी चोंडे, अजनी आरोग्य उपकेंद्रातील वहिदा शेख व बडूर उपकेंद्रातील भारती कोटलोड या ३ नियमित कार्यरत असलेल्या कंत्राटी आरोग्य सेविकांचे (एनएचएम) अंतर्गत शासनकडून पदस्थापित कायमस्वरूपी शासकीय सेवेत आरोग्य सेविका म्हणून नियुक्त करण्याचे आदेश प्राप्त झाले आहेत. ज्यांची सेवा १० वर्ष व त्याहून अधिकचे वर्ष नियमित झालेली आहे. कंत्राटी आरोग्य सेविकांना महाराष्ट्र शासनाकडून कायमस्वरूपी शासकीय सेवेत सामावून घेण्याचा निर्णय नुकताच घेण्यात आला असल्याने त्यामध्ये बिलोली तालुक्यातील खतगांव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत कार्यरत असलेल्या आदमपूर उपकेंद्रातील आदमपूर ची बाईलेक सोनी हाणमंत चोंडे, अजनी उपकेंद्रातील खतगांव येथील बाईलेक वहिदा खाज्यमियाँ शेख, बडूर उपकेंद्रातील भारती नारायणराव कोटलोड यांची कंत्राटी आरोग्य सेविका पदावरून कायमस्वरूपी शासकीय सेवेत आरोग्य सेविका म्हणून पदस्थापना करण्यात आली.

दर्गाह शाह रहमान आणि मस्जिदचे तात्पुरते मुतवल्ली बरखास्त

तभा वृतसेवा
नांदेड, दि.३० ऑक्टोबर -

येथील प्रसिद्ध वक्फ संस्था दर्गाह शाह रहमान आणि मस्जिद, वजीराबाद, खडकपुरा येथील गैरव्यवहार आणि दुर्लक्षाच्या प्रकरणात महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाने मोठी कारवाई केली आहे. वक्फ मंडळाने संस्थेचे तात्पुरते मुतवल्ली रहेमतुल्लाह शाह याकुब शाह यांची नियुक्ती रद्द करून त्यांना पदावरून बरखास्त केले आहे. वक्फ कायद्याच्या कलम ६४ अन्वये ही कारवाई करण्यात आली असून, वक्फ मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी फैय्याझ खान यांनी २५ ऑगस्ट २०२६ रोजी याबाबतचा अधिकृत आदेश जारी केला. या आदेशानुसार, दर्गाह व मशिदीचे संपूर्ण व्यवस्थापन आता जिल्हा वक्फ अधिकारी, नांदेड यांच्यामार्फत थेट महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या नियंत्रणाखाली घेण्यात आले आहे.

जिल्हा वक्फ अधिकारी, नांदेड यांनी ५ सप्टेंबर २०२३ रोजी सादर केलेल्या चौकशी अहवालात स्पष्ट नमूद केले होते की, तात्पुरते मुतवल्ली रहेमतुल्लाह शाह हे हैदराबाद येथे वास्तव्यास असून ते वक्फ संस्थेत नियमित येत नव्हते व प्रत्यक्ष व्यवस्थापनाकडे दुर्लक्ष करत होते. तसेच, कोणताही वैधानिक अधिकार नसताना त्यांनी २ जानेवारी २०१७ रोजी शेख शमीम शेख इसाक यांची गैरकायदेशीररीत्या नायब मुतवल्ली म्हणून नियुक्ती केली होती.

हजरत अब्दुल्ला शाह गाझी उर्फ दुल्हा शाह रहमान शहीद यांच्या दर्गाह व मशिदीसाठी हैदराबादच्या निजामाने सुमारे ३६ बिघा म्हणजे अंदाजे ३५ एकर जमीन सेवा शर्तीवर इनामी दिली होती. १९५० च्या दशकात स्थानिक रहिवाशांनी मशिदीचा विस्तार केला आणि ती जामिया मशीद म्हणून प्रसिद्ध झाली. १९७७ मध्ये वाढत्या लोकसंख्येनुसार दफनभूमीसाठी म्हणजेच कब्रस्तानसाठी ३ एकर जमीन नगरपालिकेने वक्फ बोर्डाकडून खरेदी केली होती. काळाच्या ओघात जमिनीचे भाव वाढल्याने भू-माफियांनी या मौल्यवान वक्फ जमिनीवर डोळा ठेवून गैरव्यवहार सुरू केले होते. स्थानिक दर्गाह व मस्जिद समितीने २०१५ पासून वक्फ बोर्डाकडे ठोस पुराव्यांसह तक्रारी केल्या होत्या. अखेर रहिवाशांच्या सततच्या ११ वर्षांच्या संघर्षाला यश आले असून ३५ एकर इनामी जमीन सुरक्षित झाली आहे.

तात्पुरता मुतवल्ली बरखास्त करून जमीन वक्फ बोर्डाच्या थेट ताब्यात घेतल्याबद्दल स्थानिक रहिवाशांनी वक्फ मंडळाचे अध्यक्ष समीर काझी, मुख्य कार्यकारी अधिकारी फैय्याझ खान,भारतीय जनता पार्टीचे नेते चैतन्य बापू देशमुख व सर्व अधिकाऱ्यांचे आभार मानले आहेत.

भूमीहीन शेतकऱ्याच्या कुटुंबाला माणुसकीचा आधारवड

तभा वृतसेवा
मुदखेड, दि.३० ऑक्टोबर -

मुदखेड तालुक्यातील मळकौठा येथील भूमिहीन शेतकरी चंद्रकांत दगडू शिंदे यांचा खाजगी सावकाराने घात केला असून कुटुंबप्रमुख हिरावल्याने कुटुंबावर दुःखाचा कोसळला असताना केवळ सांत्वन न करता आर्थिक संकटातील कुटुंबांला उद्योगपती सर्जेराव ढगे यांनी ५१ हजार रुपयांची आर्थिक मदत करून आधार दिला असून सामाजिक बांधिलकीतून संवेदनशीलता जोपासली आहे .

नांदेडच्या खाजगी सावकाराने अवघ्या सात हजार रुपयांच्या फायनान्सच्या वसुलीसाठी अपहरण करून चंद्रकांत दगडू शिंदे यांची हत्या केल्याची दुर्देवी घटना घडली आहे . या घटनेने गाव सुन्न झाले होते.कुटुंबप्रमुख व घरातील कर्ता पुरुष हिरावल्याने छत्र हरवलेल्या कुटुंबासमोर उदरनिर्वाह सह मुला बाळांच्या भविष्याचा व आर्थिक व कौटुंबिक अडचणीचा मोठा प्रश्न निर्माण झाला होता. या कठीण परिस्थितीत परिस्थितीत भूमिहीन आर्थिकदृष्ट्या दुर्बल शिंदे कुटुंबीयांना प्रत्यक्ष आर्थिक मदतीतून सामाजिक संवेदनशीलता जोपासण्याची गरज होती .उद्योगपती सर्जेराव ढगे यांनी सांत्वन पर कुटुंबाची भेट घेऊन दुःखात सहभाग नोंदविला . यानंतर आर्थिक दिलासातून ५१ हजार रुपयांची मदत केली . या मदतीमुळे दुःखात सापडलेल्या शिंदे कुटुंबीयांना आर्थिक आधारवड मिळाला आहे.

कठोर कायदा लागू करण्याची गरज : उद्योगपती सर्जेराव ढगे

मायक्रो फायनान्स कंपन्या आणि खासगी सावकारांकडून कर्जवसुलीच्या नावाखाली सर्वसामान्य नागरिकांचा होणारा जाच थांबविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने कर्नाटक राज्याच्या धर्तीवर कठोर कायदा लागू करण्याची गरज आहे. कर्जवसुलीच्या अमानवी पद्धतींमुळे एखाद्या कुटुंबाचे जीवन उद्ध्वस्त होत असेल, तर शासनाने याची गंभीर दखल घेतली पाहिजे. भूमिहीन शेतकरी चंद्रकांत शिंदे यांच्या मृत्यूमागील संपूर्ण सत्य समोर येऊन दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे. अशी प्रतिक्रीया उद्योगपती सर्जेराव ढगे यांनी दिली.

एनसीएमसी कार्डच्या सक्तीमुळे प्रवासी संख्येला फटका पण बोगस आधारावर प्रवास करणारे हद्दपार

तभा वृतसेवा
लोहा, दि.३० ऑक्टोबर -

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) सवलतीच्या दरात प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी राष्ट्रीय सामायिक गतिशीलता कार्ड (NCMC) व्यवस्था लागू केली आहे. या व्यवस्थेचा मुख्य उद्देश सवलतींच्या वितरणात पारदर्शकता आणणे, बनावट आधार ओळखपत्रांचा वापर रोखणे आणि शासनाच्या विविध सवलत योजनांचा गैरवापर थांबवणे हा उद्देश आहे. मात्र ज्यांचे वय नाही अशा लाभधारकांनी आधार कार्डावर बोगस वय वाढवून प्रवास करत होते एन.सी.एम.सी कार्ड सक्तीचीअंमलबजावणी केल्यामुळे अनेक बोगस प्रवाशी हद्दपार झाले आहेत. यामुळे बसने प्रवाश करणा-या काही प्रवाशाला तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत आहे

महिलेला प्रवाशी अर्धे तिकिट आणि जेष्ठ नागरिकाना मोफत प्रवास होता पण आधार कार्डावर बोगस वय वाढवून अनेकांनी प्रवास केला एन.सी.एम.सी कार्डामुळे प्रवास भाडे भरावे लागत पुर्वी दोन रुपयाच्या प्रवास करत होता आता अर्धे प्रवास भाडे भरावे लागत आहे. आधार कार्डावर बोगस वय वाढवून प्रवास करणारे बंद झाले आहेत आणि खरे प्रवाशी समोर आले आहेत काही रिचार्ज समस्यांमुळे प्रवाशांना सवलतीचा लाभ घेता येत नसल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. करण एन.सी एम.सी.कार्डामध्ये रिचार्ज करणे शक्तीचे केल्याने काही प्रवाशी पुर्ण प्रवास भाडे भरावे लागते यामुळे काही प्रवाशी वेळेचा विचार करुन एस.टी.बस ऐवजी खासगी वाहनाच्या पर्याय शोधत आहेत

एसटीच्या प्रवासी संख्येवर आणि उत्पन्नावर परिणाम होत असल्याची चर्चा परिवहन क्षेत्रात सुरू आहे. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने एन.एम.सी कार्ड ज्याच्याकडे आहे. अशा प्रवाशी धारकाला मशिनवर कार्ड धरुन सरसकट सवलतीचे तिकीट द्या जनेकरुन एन.सी.एम.सी कार्डावरील त्रांतिक आडचन दुर होईल असे अनेक प्रवाशांचे म्हणने आहे. आधार कार्डातील कथत हेराफेरीला आळा बसला आहे. यापूर्वी काही ठिकाणी वय, ओळख आणि पात्रतेसंदर्भात चुकीची किंवा संशयास्पद कागदपत्रे दाखवून प्रवास सवलतींचा लाभ घेतला जात होता आता विशेषतः बनावट किंवा फेरफार केलेल्या आधार कार्डांच्या आधारे प्रवाशी सवलती मिळविण्याच्या प्रकारांवर आळा बसला आहे बोगस आधारावरील प्रवाशांना आळा बसला आहे.

विष्णुपूरी प्रकल्पाचे पाणी केवळ पिण्यासाठी आरक्षित

तभा वृतसेवा
नांदेड, दि.३० ऑक्टोबर -

अपुऱ्या पर्जन्यमानामुळे निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शंकररावजी चव्हाण विष्णुपुरी प्रकल्पातील उपलब्ध पाणीसाठा सन २०२६-२७ या वर्षासाठी ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत पिण्याच्या पाण्यासाठी आरक्षित करण्यात आला आहे. त्यामुळे चालू वर्षात प्रकल्पाच्या कालव्याद्वारे रब्बी हंगामासाठी सिंचनाचे पाणी उपलब्ध करून देणे शक्य होणार नाही. शेतकऱ्यांनी कालव्याच्या पाण्यावर अवलंबून राहून रब्बी पिकांची पेरणी किंवा लागवड करू नये, असे आवाहन नांदेड पाटबंधारे विभाग (उत्तर) यांनी केले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाने ५ ऑक्टोबर २०२६ रोजी जारी केलेल्या आदेशानुसार विष्णुपुरी प्रकल्पातील सर्व पाणीसाठ्यातून उपलब्ध होणारे पाणी पिण्यासाठी आरक्षित करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी यांनी नांदेड महानगरपालिका तसेच ग्रामीण पाणीपुरवठा योजनांसाठी या प्रकल्पातील पाणी आरक्षित ठेवले आहे.

या निर्णयामुळे सन २०२६-२७ मध्ये विष्णुपुरी प्रकल्पाच्या कालव्याद्वारे रब्बी हंगामातील पिकांना सिंचनासाठी पाणी सोडणे शक्य होणार नाही. त्यामुळे लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनी कालव्याद्वारे प्रवाही पाणी उपलब्ध होईल, या अपेक्षेने रब्बी पिकांची पेरणी, लागवड अथवा अन्य पीक उत्पादनाची कामे करू नयेत. कालव्याच्या पाण्याच्या अपेक्षेने पीक पेरणी किंवा लागवड केल्यास होणाऱ्या संभाव्य नुकसानीची जबाबदारी जलसंपदा विभागाची राहणार नाही, असेही विभागाने स्पष्ट केले आहे.

दुष्काळसदृश परिस्थितीत उपलब्ध पाणीसाठ्याचे नियोजन करणे आणि नागरिकांना पिण्यासाठी पाणी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेऊन विष्णुपुरी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील सर्व शेतकरी बांधवांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून जलसंपदा विभागास सहकार्य करावे, असे आवाहन नांदेड पाटबंधारे विभाग (उत्तर) चे कार्यकारी अभियंता सी. आर. बनसोड यांनी सार्वजनिक निवेदनाद्वारे केले आहे.

औंढ्यात भीषण आगीत सहा दुकाने जळून खाक

लाखोंचे नुकसान, कोणतीही जिवीत हानी नाही, आ. संतोष बांगर यांचेकडून ५० हजारांची आर्थिक मदत

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ३० ऑक्टोबर

औंढा शहरातील जुन्या बसस्थानक परिसरात असलेल्या दुकानांना आग लागून सहा दुकाने जळून खाक झाली आहेत. शुक्रवारी (ता. ३०)सकाळी हि घटना घडली आहे. औंढा नागनाथ व हिंगोलीच्या अग्नीशमनदलाने दोन तासांमध्ये आगीवर नियंत्रण मिळविल्याने मोठा अनर्थ टळला आहे. शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. या आगीमध्ये लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

औंढा नागनाथ शहरातील जुन्या बसस्थानकाच्या परिसरात मोबाईल विक्री व दुरुस्ती, बॅटरी दुरुस्ती, इलेक्ट्रीकल्स साहित्य विक्री व दुरुस्तीची दुकाने आहेत. आज सकाळी सात वाजण्याच्या सुमारास एका दुकानातून अचानक धुर निघू लागला होता. या परिसरात असलेल्या हॉटेल चालकांनी दुकानातून धुर निघत असल्याचे लक्षात येताच मदतीसाठी आरडा ओरड केली. त्यानंतर परिसरातील नागरीक मदतीसाठी धावले. पोलिस निरीक्षक श्यामकुमार डोंगरे, सहाय्यक पोलिस निरीक्षक आयुब शेख, उपनिरीक्षक शेख खुद्दूस, जमादार ज्ञानेश्वर सावळे, रविकांत हरकाळ, किशोर पारीसकर, अमोल चव्हाण, अनिल नागुलवार, विजय कालवे,दिनकर पोले, वसंत चव्हाण यांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी या मार्गावरील वाहतुक काही काळ थांबवून तातडीने हिंगोली व औंढा नागनाथ येथील अग्नीशमनदलास पाचारण केले.दरम्यान, दोन तासानंतर म्हणजेच सुमारे नऊ वाजण्याच्या सुमारास आग आटोक्यात आली. मात्र तो पर्यंत सहा दुकाने जळून खाक झाली होती. या आगीमध्ये सरफराज पठाण, अखिल पठाण, नामदेव कोकाटे, सतीष बेदरे, अब्दुल कदिर, रामभाऊ साळुंके यांच्या दुकानांचे नुकसान झाले असून लाखों रुपयांचे साहित्य

जळून खाक झाले आहे. शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. पोलिस व नागरीकांनी तातडीने मदतीसाठी धावाधाव केल्याने आगीवर वेळीच नियंत्रण मिळविता आहे. त्यामुळे मोठा अनर्थ टळला असून जीवितहानी नाही.महसूल विभागाने पंचनामा करून तात्काळ आर्थिक मदत देण्याची मागणी दुकान जळालेल्या दुकानदाराकडून होत आहे.

औंढा नगरपंचायतची अग्निशामन गाडी उशिराने घटनास्थळी दाखल झाल्याने व गाडीत पाणी नसल्याने नागरिकांनी रोष व्यक्त केली. तोपर्यंत सहा दुकाने आगीत जळून खाक झाली. आग विझल्या नंतर दहाच्या सुमारास नगरपंचायत समोर जाऊन नगरपंचायत प्रशासनाविरोधात जमावाने जोरदार घोषणाबाजी केली.

घटनास्थळी आमदार संतोष बांगर यांनी भेट देऊन नुकसानग्रस्त दुकानदारांना आर्थिक मदत केली तसेच महसूल विभागाचे मंडळ अधिकारी आशा गीते, तलाठी गजानन गुंजकर, मुख्याधिकारी धनंजय उपलवाड यांनी पंचनाम्यास सुरुवात केली आहे. यावेळी पोलीस निरीक्षक श्यामकुमार डोंगरे, नगराध्यक्ष कपिल खंदारे, उपनगराध्यक्ष मनोज देशमुख, माजी उपसभापती अनिल देशमुख, नगरसेवक साहेबराव देशमुख, अज्जू इनामदार, अजिज कादरी, शफी नदाफ, विष्णू पवार, रफिक कुरेशी, प्रदीप कनकुटे, राहुल दंतवार, दिलीप राठोड, संदीप गोबाडे, अनिल देव, गणेश पाटील, सुरेश जावळे, सुमेध मुळे, विजय महामुने, अनिल नागरे, विष्णू रणखांबे,राधा काळे, नलिनी मलमवार आदी होते.

शिवसेनेच्यावतीने आमदार संतोष बांगर यांनी तात्काळ नुकसानग्रस्त दुकानदाराला प्रत्येकी ५० हजार प्रमाणे ३ लाखाची मदत सहा दुकानदारांना मदत दिली. संकटकाळात आमदार संतोष बांगर नुकसानग्रस्त दुकानदारांच्या मदतीला धावले. यावेळी औंढा नागनाथ नगर पंचायतीचे नगरसेवक तसेच शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

भारतीय जनता पक्षाच्या माजी नगराध्यक्षा दिपाली पाटील यांनीही घटनास्थळी भेट दिली तसेच नुकसानग्रस्त दुकानदारांना प्रत्येकी १० हजार रूपयांची आर्थिक मदत दिली. यावेळी भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. या मदतीमुळे नुकसानग्रस्त दुकानदारांना धीर मिळाला आहे.

खून प्रकरणातील मुख्य सुत्रधार जेरबंद, स्थागुशाची कारवाई

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ३० ऑक्टोबर

हिंगोली शहरातील तलाबकट्टा परिसरात राहणाऱ्या सयद कलीम सयद सलीम या युवकावर ०६ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्रीच्या वेळी मेहराजुलूम मस्जिदजवळ मटन कापण्याचा चाकु व लोखंडी रॉडने मारहाण केल्याने त्याचा मृत्यू झाला होता. या घटनेप्रकरणी पोस्टे हिंगोली शहर येथे खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आलेला असुन चार आरोपींना अटक करण्यात आलेली असुन दोन मुख्य आरोपी घटना घडल्या पासुन फरार होते.

नमुद गुन्हयातील आठ महिन्या पासुन फरार आरोपींना अटक करणे बाबत पोलीस अधीक्षक कमलेश मिना यांनी आदेश दिल्याने, स्थागुशाचे पो.नि. मोहन भोसले, यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि. श्री व्ही. एस. आरसेवार यांचे पथक काम करीत होते. दिनांक २८/१०/२०२६ रोजी सपोनि व्ही. एस. आरसेवार यांचे पथकाने या गुन्हयाचा समांतर तपास करत असतांना तांत्रीक विश्लेषण व गोपनिय माहिती आधारे नमुद गुन्हयातील फरार आरोपी नामे कैफ युनूस कुरेशी रा. पेन्शनपुरा हिंगोली याचा पाथरी जिल्हा परभणी येथे जाऊन कसोसीने शोध घेवुन तो मिळून आल्याने त्यास नमुद गुन्हयाचे पुढील तपासकामी पोस्टे हिंगोली शहर येथे हजर करण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक कमलेश मिना, पोनि मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि व्ही.एस.आरसेवार, पोलीस अंमलदार गजानन पोकळे, पांडुरंग राठोड, लिंबाजी वाव्हळे, निरंजन नलवार, सतिष जाधव, नरेंद्र साळवे, मुनीर प्यारेवाले व दत्ता नागरे सर्व ने. स्था.गु.शा. यांनी केली आहे.

हिंगोली– भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांच्यावतीने मौजे सावा याठिकाणी वनराई बंधारा बांधण्यात आला. या बंधाऱ्यामुळे ८ लाख लिटर भूपृष्ठीय पाणीसाठा निर्माण होणार आहे. यावेळी अधिकारी, कर्मचारी तसेच ग्रामस्थांची उपस्थिती होती.

संक्षिप्त वृत्त

सावा येथे वनराई बंधाऱ्याची उभारणी

हिंगोली– सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांसह परिसरातील शेतकऱ्यांच्या जलस्रोतांना बळकटी मिळावी, या उद्देशाने भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, हिंगोली कार्यालयामार्फत मौजे सावा, ता. जि. हिंगोली येथे २९ ऑक्टोबर २०२६ रोजी वनराई (वसंत) बंधाऱ्याची उभारणी करण्यात आली. या बंधाऱ्यामुळे अंदाजे ८ लाख लिटर भू-पृष्ठीय पाणीसाठा निर्माण होणार असून, त्याचा उपयोग सार्वजनिक पिण्याच्या पाण्याचे स्रोत आणि काही सिंचन स्रोतांच्या बळकटीकरणासाठी होणार आहे. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे येथील आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. बंधाऱ्यासाठी १२ मीटर रुंद, ०.६० मीटर उंच आणि १२० मीटर लांबीपर्यंत पाणीसाठा निर्माण होऊ शकेल, असे योग्य स्थळ निवडण्यात आले होते. या ठिकाणी पावसाचे पाणी अडवून त्याचा स्थानिक पातळीवर उपयोग होण्यास मदत होणार आहे.

किशोर–किशोरी गट कबड्डी स्पर्धांचे आयोजन

हिंगोली– हिंगोली जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या वतीने किशोर गट व किशोरी गट निवड चाचणी व अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन सिद्धेश्वर विद्यालय वसमत येथे दिनांक ५ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता करण्यात येणार आहे. या निवड चाचणी स्पर्धेतून हिंगोली जिल्हा किशोर व किशोरी गट कब्बडी संघ निवड करण्यात येणार आहे. निवड झालेल्या संघ राज्यस्तरीय स्पर्धेत हिंगोली जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. राज्यस्तरीय स्पर्धा महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने व साई क्रीडा मंडळ खेडुळा यांच्या सोजन्याने पाथरी येथे दि.१९ ते २२ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा निवड चाचणी स्पर्धेत किशोर व किशोरी गट खेळाडूंसाठी असोसिएशनच्या मार्गदर्शक तत्वानुसार खेळाडूचा जन्म दिनांक किशोर गट (मुले) ३१/१२/२०१० किंवा त्यानंतरचा.वजन ६० किलो. किशोरी गट (मुली) जन्म दिनांक ३१/१२/२०१० किंवा त्यानंतरचा असावा. खेळाडूंचे वजन ६० किलो किंवा त्यापेक्षा कमी असावे.स्पर्धा मॅटवर होणार असल्याने सर्व खेळाडूंसाठी मॅट शुज आवश्यक राहतील.निवड चाचणी सकाळी ठीक १० वाजता सुरू होईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. या निवड चाचणीसाठी जिल्ह्यातील सर्व शाळांचे संघ, क्रीडा मंडळांनी सहभागी होण्याचे आवाहन हिंगोली जिल्हा कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष माजी खासदार ॲड शिवाजीराव माने , ॲड बाबा नाईक, सचिव प्रा.डॉ. नवनाथ लोखंडे, सहसचिव दिलीप बांगर, कोषाध्यक्ष मेजर पंढरीनाथ घुगे,सदस्य प्रा.एन.एस.बांगर, खंडबाराव नाईक सर्व सदस्य जिल्हा असोसिएशन यांनी केले आहे. व्यवस्थापक किंवा खेळाडूंनी अधिक माहितीसाठी संपर्क डॉ. शिवशंकर कापसे व सुनील बांगर यांना संपर्क करावा असे असे कळविण्यात येते.

१०८ वाहन चालकांवर पोलिसांची कार्यवाही

हिंगोली– अवैध वाहतुक करणाऱ्या तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १०८ वाहन चालकांवर पोलिसांनी कार्यवाही केली असून त्यांच्याकडून ९३ हजार ९५० रूपयांचा दंड वसुल करण्यात आला आहे. तसेच दारूबंदी कायद्यांतर्गत जिल्ह्यात दोन ठिकाणी अवैध दारू विक्री करणाऱ्यांवर छापे टाकून ७४४० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

हिंगोलीत निमंत्रित कवी संमेलनाचे थाटात उद्‌घाटन, निमंत्रित कवींच्या बहारदार कवितांनी श्रोते मंत्रमुग्ध

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ३० ऑक्टोबर

सार्वजनिक दसरा महोत्सव समिती हिंगोली व साहित्य सृष्टी फाउंडेशन हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने पहिल्यांदाच कवी संमेलनाचे शहरातील शिवाजीराव देशमुख सभागृह येथे ३० ऑक्टोबर रोजी दुपारी ४ वाजता निमंत्रित कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले. या वी संमेलनाचे उद्‌घाटन खा रामराव वडकुते यांचे हस्ते दिप प्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी निमंत्रित कवींनी सादर केलेल्या बहारदार कवितांनी श्रोते मंत्रमुग्ध झाले होते.

या कवी संमेलनाला प्रमुख कवी म्हणून प्रसिद्ध कवयित्री गुंजन पाटील जळगावकर, प्रसिद्ध कवयित्री सिंधुताई दहिफळे, प्रसिद्ध कवी नारायण पुरी, प्रसिद्ध साहित्यिक बबन शिंदे हे उपस्थित होते. कवी संमेलनाच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय अधिकारी तथा समाधान घुटुकुडे, ज्येष्ठ साहित्यिक अशोक अर्धापुरकर, जेष्ठ साहित्यिक प्रा नामदेव वाबळे, ज्येष्ठ साहित्यिक कलानंद जाधव, जेष्ठ कवी प्रा विलास वैद्य, कवी गणेश येवले, गोडाती काळे संचालक थवा प्रकाशन यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. जया करडेकर, प्रस्ताविक कवी रतन आडे यांनी केले. मान्यवरांचा परिचय कवी राजकुमार मोरगे यांनी करून दिला.

कवी संमेलनात सहभागी कवी राजकुमार नायक सवनेकर, वाकोडे मामा, राजाराम बनसकर, रतन आडे, दिलीप धामणे, राजकुमार मोरगे, बबन मोरे, डॉ राधिका देशमुख, सुमन दुबे, शिवाजी कराळे, प्रा. श्रीराम कऱ्हाळे मदन अंभोरे लक्ष्मण सूत प्राध्यापिका संध्या रंगारी डॉक्टर निखिल नायक, महारुद्र घेणेकर, विजय गुंडेकर, श्रीरंग थोरात, व्ही सी पाईकराव, समाधान लोणकर प्रा. मुरलीधर पंढरपूर, शिवचरण रटकलकर, शफी बोल्डेकर, प्रद्युम्न गिरीकर, डॉ.अभय भरतीया, डॉ. वंदना काबरा, डॉ. संजय नाकाडे, गणेश आघाव, रघुनाथ घुगे सविता देशमुख, पारिजात देशमुख, लीना जाधव, आबा पांचाळ, बालिका बरगळ, गंगाधर धामणे, विजय ठाकरे, गणेश मागणे, गायत्री दर्गा संदीप पाटील, कैलास कावरखे, गौरी गुंडेवार ज्ञानदा चौधरी शिवदास पोटे, अशोक गुट्टे नम्रता खिल्लारे रघुनाथ पतंगे, विलास भालेराव, मायादेवी सरवदे, बालाजी शेळके, ज्योती पतिंगराव, या.शी.काटकर, चां.रा.आघाडे, प्रकाश भालेराव, संगीता देशमुख, कुसुम होडबे, दिंगाबर जाधव, संगिता चौधरी, प्रदिप भालेराव, आरती पावडे, महासेन प्रधान, गजानन कष्टे, अक्षय बरडे, अहमद पठाण, साबेर बासमती, जमीर नजर, संगमेश्वर स्वामी, विजयकुमार ऐंगडे, बालाजी मोरे, प्रिया संगीत, रूपाली मोरे, दुर्गा पवार, कोंडीबा गायकवाड, अक्षय देशमुख, अमोल थिटे नामदेव ठोके,बंडू पुरी, दत्ता पुरी यांनी सहभाग नोंदविला. या कविसंमेलनांचे संयोजक तथा साहित्य सृष्टी फाऊंडेशनचे अध्यक्ष कवि विजय एस. भालेराव यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमासाठी शहरासह परजिल्ह्यातील साहित्यिक, रसिक, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माझी वसुंधरा अभियानांतर्गत जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांचेहस्ते कार्यालय परिसरात वृक्षारोपन

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ३० ऑक्टोबर

पर्यावरणाचे संरक्षण, हरित क्षेत्रात वाढ आणि स्वच्छ, सुंदर व पर्यावरणपूरक शहरनिर्मितीच्या उद्देशाने स्वच्छ सर्वेक्षण २०२६-२७ तसेच 'माझी वसुंधरा' अभियानांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या हस्ते वृक्षारोपण करून या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनीही वृक्षारोपणात सहभाग घेत पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.

नगरपरिषद हिंगोलीच्या वतीने आयोजित या उपक्रमातून शासकीय कार्यालयांच्या परिसरात हरित क्षेत्र विकसित करण्यासोबतच नागरिकांमध्ये वृक्षसंवर्धन आणि पर्यावरणाप्रती जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. वाढते शहरीकरण, पर्यावरणीय असमतोल आणि बदलते हवामान यांचा विचार करता वृक्षारोपणाबरोबरच लावलेल्या झाडांचे संगोपन व संवर्धन करणेही महत्त्वाचे आहे. या दृष्टीने नागरिकांनी पर्यावरणपूरक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवावा, असा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

'माझी वसुंधरा' अभियानाच्या माध्यमातून पृथ्वी, जल, वायू, अग्नी आणि आकाश या निसर्गाच्या पंचतत्त्वांचे संवर्धन करण्यावर भर दिला जात आहे. तसेच स्वच्छ सर्वेक्षणाच्या अनुषंगाने स्वच्छता, हरित परिसर आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीला प्रोत्साहन देणारे उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अभियानांतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून विविध पर्यावरणपूरक उपक्रम राबवून नागरिकांचा सहभाग वाढविण्यावर भर दिला जात आहे. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यु बोधवड, उपजिल्हाधिकारी (सामान्य) अनिल माचेवाड, नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी प्राजंली मुंडे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

शिरडशहापूर येथे हजरत जिंदाशाह मदार उर्सनिमित्त महाप्रसाद

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ३० ऑक्टोबर

औंढा नागनाथ तालुक्यातील शिरडशहापूर येथे हजरत जिंदाशाह मदार उर्सनिमित्त दि ३० ऑक्टोबर रोजी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी मोठ्या उत्साहात हजरत जिंदाशाह मदार उर्साचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त यात्रा भरते. सर्वधर्मीय लोक दर्शनासाठी हजरत जिंदाशाह मदार याठिकाणी येतात. सामाजिक ऐक्याचे प्रतीक म्हणूनही या ऊर्साकडे पाहीले जाते. ऊर्सानिमित्त शुक्रवारी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. याप्रसंगी मुजावर इमदात पठाण, जबी पठाण, रफीक पठाण, शेख गुलाब नबी, अहमद पठाण, शेख आगवान, इंजिनीअर पठाण, शेख जुबेर, रूस्तुम कुरूडे, शंकर काळे, दिगंबर अकमार, सिध्दी पठाण, अमन पठाण आदींनी परिश्रम घेतले.